




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार ५ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# संसदेत पुस्तकांवरून पुन्हा जुंपली

## ☐ निशिकांत दुबेंनी केला नेहरू-एडविना पुस्तकाचा उल्लेख ☐ स्पीकर चेंबरमध्येही राडा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सध्या पुस्तकांवरून राजकीय महायुद्ध पेटले आहे. माजी लष्करप्रमुख जनरल एम.एम. नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकावरून सुरू झालेला वाद आता थेट नेहरू-गांधी घराण्यावरील वादग्रस्त पुस्तकांपर्यंत पोहोचला आहे. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी संसदेत नेहरू आणि एडविना माउंटबॅटन यांच्या संबंधांवरील पुस्तकाचा उल्लेख करत गांधी परिवारावर सडकून टीका केली, ज्यामुळे सभागृहात प्रचंड गदारोळ झाला आणि कामकाज वारंवार तहकूब करावे लागले.निशिकांत दुबे यांनी भाषणादरम्यान अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला. आजकाल अशा पुस्तकाचा गाजावाजा केला जात आहे जे अद्याप प्रकाशितही झालेले नाही. पण मी आज त्या पुस्तकांबद्दल सांगणार आहे, जी नेहरू घराण्याची गद्दारी, भ्रष्टाचार आणि त्यांच्या खासगी आयुष्यातील गोष्टींनी भरलेली आहेत असे दुबे म्हणाले. त्यांनी एडविना अँड नेहरू या पुस्तकासह इतर काही पुस्तकांतील आक्षेपार्ह संदर्भ देण्यास सुरुवात केली. काँग्रेस



नेते राहुल गांधी गेल्या काही दिवसांपासून माजी लष्करप्रमुख एम.एम. नरवणे यांच्या पुस्तकाचा हवाला देउन चीनच्या घुसखोरीबाबत सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. राहुल गांधींना हे पुस्तक कोट करण्यापासून रोखले जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. याला उत्तर देण्यासाठी बुधवारी भाजप खासदार निशिकांत दुबे मैदानात उतरले. दुबे यांनी केवळ प्रत्युत्तर दिले नाही, तर चक्क नेहरू-गांधी घराण्यावर लिहिलेली ३-४ वादग्रस्त पुस्तकेच सभागृहात आणली.

**विरोधकांचा संताप**

दुबेंच्या या विधानांमुळे काँग्रेस खासदारांच्या संतापाचा कडेलोट झाला. विरोधकांनी वेलमध्ये उतरून जोरदार घोषणाबाजी सुरू केली. स्पीकर ओम बिर्ला यांनी दुबेंना वारंवार टोकले, मात्र तरीही त्यांनी आपले बोलणे सुरूच ठेवले. गोंधळ इतका वाढला की अध्यक्षांना सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले.

**स्पीकरच्या चेंबरमध्येही खडाजंगी**

सभागृह तहकूब झाल्यानंतर हे नाट्य संपले नाही. स्पीकर ओम बिर्ला यांनी दोन्ही बाजूंच्या नेत्यांना चर्चेसाठी आपल्या चेंबरमध्ये बोलावले होते. तिथेही विरोधकांनी आपला रोख कायम ठेवला. जर राहुल गांधींना एका पुस्तकावर बोलू दिले जात नाही, तर भाजप खासदाराला अशा वादग्रस्त पुस्तकांचा उल्लेख करण्याची परवानगी कशी दिली गेली? असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. काँग्रेस खासदारांनी निशिकांत दुबे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करत अध्यक्षांकडे आपली नाराजी व्यक्त केली.

**संसदेत तणावाचे वातावरण**

या गदारोळामुळे संसदेचे कामकाज दिवसभरात अनेकदा विस्कळीत झाले. सकाळी ११ वाजता कामकाज सुरू होताच विरोधकांनी घोषणाबाजी केली होती. त्यानंतर दुपारी वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी भारत-अमेरिका व्यापारावर निवेदन दिले, मात्र गोंधळामुळे काहीही ऐकू येत नव्हते. दरम्यान, मंगळवारीच गैरवर्तणुकीमुळे काँग्रेसच्या ७ आणि माकपच्या १ खासदाराला निलंबित करण्यात आले होते, त्यामुळे विरोधक आधीच आक्रमक भूमिकेत आहेत.

# विरोधी महिला खासदारांनी पंतप्रधानांच्या आसनाला घेरले

**मोदी संबोधित करणार होते**




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बुधवारी अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळाला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर पंतप्रधान नरेंद्र मोदी संध्याकाळी ५ वाजता बोलणार होते. मात्र, विरोधकांच्या प्रचंड गदारोळामुळे कामकाज तहकूब झाले आणि पंतप्रधानांचे संबोधन टळले. या घटनेनंतर भाजपने विरोधकांवर 'पंतप्रधानांवर हल्ल्याचा प्रयत्न' केल्याचा अत्यंत खळबळजनक आरोप केला आहे.

दुपारी २ वाजता जेव्हा कामकाज सुरू झाले, तेव्हापासूनच विरोधक विविध मुद्द्यांवरून आक्रमक झाले होते. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी गांधी कुटुंबावर केलेल्या टीकेनंतर वातावरण अधिकच तापले. ५ वाजता जेव्हा पंतप्रधान उत्तरासाठी उभे राहणार होते, तेव्हा विरोधी पक्षाच्या खासदारांनी वेलमध्ये येउन घोषणाबाजी सुरू केली. सभापतींनी वारंवार शांत राहण्याचे आवाहन करूनही गदारोळ न थांबल्याने कामकाज तहकूब करावे लागले.

**भाजपचे गंभीर आरोप-** भाजप खासदार मनोज तिवारी यांनी सभागृहाबाहेर पत्रकारांशी बोलताना गंभीर दावा केला. ते म्हणाले, 'जेव्हा कामकाज स्थगित झाले, तेव्हा विरोधकांनी सर्व मर्यादा ओलांडल्या. विरोधी पक्षाचे खासदार पंतप्रधान जिथे बसतात, तिथपर्यंत चढून आले होते. विशेषत? महिला खासदारांनी पंतप्रधानांच्या खुर्चीचा घेराव केला होता. त्यांचा हावभाव पाहता, त्यांची पंतप्रधानांवर हल्ला करण्याची इच्छा असावी, ➩(पान २ वर)


# राहुल यांनी नरवणे यांचे पुस्तक दारववले, म्हणाले- पंतप्रधानांना देणार

## ◆ केंद्रीय मत्र्याला गद्दार म्हटले ◆



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आर्मी चीफ एमएम नरवणे यांच्या ज्या पुस्तकावरून संसदेत दोन दिवसांपासून गदारोळ सुरू आहे. राहुल गांधी बुधवारी तेच पुस्तक घेउन संसदेत पोहोचले. त्यांनी सांगितले की, जर आज पंतप्रधान आले तर मी त्यांना हे पुस्तक देईन. राहुल यांनी पुस्तकाचे ते पान उघडून दाखवले, ज्यात लिहिले आहे की पंतप्रधानांनी आर्मी चीफना सांगितले होते- जे योग्य वाटेल ते करा!. राहुल म्हणाले की, सरकार आणि संरक्षण मंत्री म्हणत आहेत की पुस्तकाचे अस्तित्व नाही. हे बघा, हे आहे पुस्तक.

राहुल म्हणाले की, मला वाटत नाही की पंतप्रधान आज लोकसभेत येण्याचे धाडस करतील. जर पंतप्रधान आले तर मी स्वतः जाउन त्यांना हे पुस्तक देईन, जेणेकरून ते ते वाचू शकतील आणि देशाला त्याबद्दल माहिती मिळेल. लोकसभेत दोन दिवसांपासून माजी लष्करप्रमुख एमएम नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकावरून गदारोळ सुरू आहे. यामुळे अनेक वेळा सभागृह तहकूब झाले आहे. राहुल यांना या पुस्तकातील काही भाग लोकसभेत वाचायचा आहे. अध्यक्ष ओम बिरला यांनी याला परवानगी दिली नाही. दरम्यान, काँग्रेसचे काही खासदार अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सहाव्या दिवशी संसदेच्या मकर दरवाजाजवळ निदर्शने करत होते. याच दरम्यान ➩(पान २ वर)



# मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरील ट्रॅफिक जाम; सरकार अपयशी

*मुंबई आणि पुण्याला जोडणारा 'लाईफलाईन' महामार्ग सध्या प्रवाशांसाठी एक भयानक स्वप्न ठरला आहे. अदोशी बोगद्याजवळ झालेल्या भीषण टँकर अपघातामुळे गेल्या २४ तासांपासून हा महामार्ग पूर्णपणे ठप्प आहे. लोणावळ्यापासून ते थेट खालापूर टोलपर्यंत वाहनांच्या रांगा पसरल्या आहेत. एरिअल व्ह्यूमध्ये दिसणारी नागमोडी वळणे सध्या वाहनांच्या गर्दीने गुदमरून गेली आहेत. या २४ तासांत वाहने हळूहळू पुढे सरकली आहेत. मोठमोठाले ट्रेलर, ट्रकतर तिथेच अडकून पडले आहेत. टँकर उचलून बाजुला करण्यास सरकार अपयशी ठरले आहे.*

# *विलीनीकरणावर बोलण्याचा फडणवीसांना अधिकार काय?*

## पवारांचा सवाल; भारत–अमेरिका करारावरही निशाणा

**पुणे/प्रतिनिधी :** दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनिकरणाबाबत दिवंगत अजितदादा पवार अनुकूल होते आणि १२ फेब्रुवारी रोजी तशी घोषणा होणार होती असा दावा करण्यात येतो. तर दुसरीकडे अशा प्रकारची कोणतीही चर्चा झाली नाही. महापालिका निवडणुकीपूरताच हा निर्णय झाल्याचे दादांच्या राष्ट्रवादी गटाचे म्हणणे आहे. त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा झाली असती तर मित्र पक्ष म्हणून अजितदादांनी आम्हाला सांगितले असते, असे वक्तव्य केले होते. या संपूर्ण प्रकरणावर आज शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत चांगलेच सुनावले. त्यांनी दोन्ही पक्षांच्या विलीनिकरणाबाबत मोठे भाष्य केले.



अजितदादा यांच्या राष्ट्रवादीशी विलीनिकरणाची चर्चा सुरू होती. १२ फेब्रुवारी रोजी अजितदादा याविषयीची घोषणा करणार होते असे यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत शरद पवार म्हणाले होते. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली. आताच्या परिस्थिती आम्हाला राजकारण करायचं नाही. अन्यथा मी अनेक गोष्टी सांगू शकतो. मला सगळं माहिती आहे. मी सगळ्या गोष्टींचा साक्षीदार आहे. तुम्हालाही सगळ्यांना माहिती आहे की, अजितदादा आणि माझे जे संबंध होते त्यामुळे ते सगळ्या गोष्टी मला शेअर करायचे. त्यामुळे मला वाटतं की खालच्या स्तराचं राजकारण करणं योग्य नाही. अजित पवार हे जर अशा प्रकारची कोणत्याही विलीनिकरणाची चर्चा ➩(पान २ वर)

# विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का?

## ● सुषमा अंधारे यांचा सवाल ● अजित पवार राज्याची संपत्ती

**सोलापूर/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात प्रचार सभांचा धडाका लावला असून, सोलापूर जिल्ह्यातील एका जाहीर सभेत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी बोलताना सुषमा अंधारे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेवर थेट संशय व्यक्त करत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात प्रचार सभांचा धडाका लावला असून, सोलापूर जिल्ह्यातील एका जाहीर सभेत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी बोलताना सुषमा अंधारे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेवर थेट संशय व्यक्त करत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. आंतरराष्ट्रीय उड्डाण नियामक मंडळाने एक वर्षांपूर्वी बंदी घातलेले



विमान अजित पवारांच्या प्रवासासाठी वापरलेच कसे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अजित दादा स्वत?च्या सुरक्षिततेबाबत अत्यंत जागरूक होते, मग ते असे विमान वापरण्यास कसे तयार झाले, असा प्रश्न उपस्थित करत अंधारेंनी सरकारच्या भूमिकेवर संशयाची सुई रोखली.

सभेत बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, मी आज प्रचाराबद्दल बोलणार नाही. सोन्यासारखा माणूस आपल्यातून निघून गेलाय. अजित पवार हे राज्याची संपत्ती होते. लाख गेले तरी लाखोंचा पोशिंदा जगला पाहिजे, असं आपण म्हणतो. त्यामुळे अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत प्रश्न विचारण्याचा हक्क महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला आहे. मात्र या दुर्घटनेबाबत उड्डाण नियामक मंडळाने स्पष्ट माहिती द्यायला हवी असताना, भाजपकडून वेगवेगळी आणि विसंगत उत्तरं दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत, ठोस उत्तर कुणाकडूनच मिळत नाही, त्यामुळे घातपाताचा संशय व्यक्त होतोय, मग हे प्रश्न विचारले की भाजपला एवढा राग का येतो, असा खोचक सवालही त्यांनी यावेळी केला.याच सभेत सुषमा अंधारे यांनी पालकमंत्री➩(पान २ वर)

# विधानसभेत रात्रभर राडा

## भाजप आमदारांनी तिथेच मुक्काम ठोकला

**बंगळूरू/वृत्तसंस्था :** : कर्नाटक विधानसभेत काल रात्री हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. उत्पादन शुल्क खात्यात कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून राज्य उत्पादन शुल्क मंत्री आर. बी. तिम्मापूर यांच्या राजीनाम्याची मागणी करत भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि त्यांचा मित्रपक्ष जनता दल (सेक्युलर) यांनी मंगळवारी रात्रभर विधानसभेत आंदोलन केले. आंदोलनादरम्यान विरोधी पक्षातील आमदारांनीरांनी विधानसभेच्या सभागृहातच रात्र काढली.भाजपने उत्पादन शुल्क विभागात मोठ्या प्रमाणावर



भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप केला असून मद्याचे परवाने देण्यासाठी मोठ्या प्रमाणात लाच मागितली जात असल्याचा दावा केला आहे. विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी हा कथित घोटाळा सुमारे ६,००० कोटींचा असल्याचा आरोप केला. तसेच, सत्ताधारी काँग्रेस पक्ष हा निधी निवडणूक तोंडावर असलेल्या राज्यांमध्ये पक्षाच्या खर्चासाठी वापरत असल्याचाही आरोप त्यांनी केला. हा वाद अधिक तीव्र होण्यामागे नुकतीच झालेली लोकायुक्तांची➩(पान २ वर)

# शरद पवारांनी घेतली सुनेत्रा पवार यांची भेट

## अर्धातास पवार कुटुंबामध्ये चर्चा

**पुणे/प्रतिनिधी :** राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, आज राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर ही पहिलीच भेट आहे, तसेच सध्या दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर जोरदार चर्चा देखी सुरू आहे, या सर्व पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान या भेटीवेळी शरद पवारांसह पूर्ण पवार कुटुंबातील सदस्य देखील उपस्थित होते, फक्तयावेळी सुप्रिया सुळे या उपस्थित नव्हत्या. शरद पवार, सुनेत्रा पवार, रोहित पवार पार्थ पवार, जय पवार, श्रीनिवास पवार, राजेंद्र पवार, यांच्यासह पवार कुटुंबातील सर्व प्रमुख सदस्य यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या निवासस्थानी आले होते.



सहयोग निवासस्थानी यावेळी पवार कुटुंबामध्ये अर्धातास चर्चा झाली, या भेटीनंतर शरद पवार सहयोग सोसायटीमधून बाहेर पडून, गोविंदबागेकडे रवाना झाले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि शरद पवार यांची ही अजित पवार यांच्या निधनानंतर आणि सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर पहिलीच भेट होती, दरम्यान या भेटीपूर्वी दुपारी शरद पवार यांची पार्थ पवार आणि जय पवार यांच्यासोबत भेट झाली होती. या भेटीनंतर आता राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीचं विलिनीकरण होणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. त्यातच दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येणार होते असा दावा शरद पवार यांच्याकडून काही दिवसांपूर्वी करण्यात आला होता. या सर्व पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीमध्ये नेमकी कशावर चर्चा झाली हे अद्याप समोर आलेलं नसलं तर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनकरण, अजितदादांचे स्मारक, त्याच बोरोबर विविध सहकारी संस्थांसंदर्भात यावेळी चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. या बैठकीला पवार कुटुंबातील जवळपास सर्वच सदस्य उपस्थित होते.

# जरांगेंना गोळ्या घालणार; धक्कादायक कॉल

**बीड :**मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांना गोळ्या घालण्याची भाषा केल्याची एक ऑडिओ क्लिप तुफान व्हायरल झाली आहे. कराड समर्थकाकडून ही मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे कालवर बोलताना समर्थकाने धनंजय मुंडे यांचेही नाव घेत धमकावल्याचे ऐकू येत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना गोळ्या घालत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यामध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याचे नाव घेण्यात आले आहे. सध्या ही काल रेकार्डिंग सोशल माध्यमावर व्हायरल होत आहे. संबंधित



काल रेकार्डिंगमध्ये एक व्यक्ती दुस--या व्यक्तीला बोलत असताना थेट मनोज जरांगे यांना मी गोळ्या घालून जीवे मारणार असल्याचे बोलत आहे. त्याचबरोबर पुन्हा धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड म्हणायचे नाही, नसता तुलाही जीवे मारतो अशी धमकी कराड समर्थकांनी दिली.

# शक्तिपीठ महामार्गाचा खर्च वाढला

## प्रकल्पाचा खर्च 1 लाख 1 हजार कोटींवर

**मुंबई/ प्रतिनिधी-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असणा-या शक्तिपीठ महामार्गाचा खर्च १५ हजार कोटींनी वाढून तब्बल १ लाख १ हजार कोटींवर पोहोचला आहे. शेतक-यांच्या विरोधानंतर सरकारने या प्रकल्पाच्या आराखड्यात काही बदल केला आहे. या बदलामुळे हा खर्च वाढला आहे. शक्तिपीठ महामार्गाद्वारे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांना जोडण्यात येणार आहे. पण कोल्हापूरसह राज्यातील विविध जिल्ह्यांतील शेतक-यांनी या प्रकल्पाला कडाडून विरोध केला आहे. गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने या प्रकल्पाच्या



आराखड्यात काही बदल करण्याचे मान्य केले होते. त्यानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) ➩(पान २ वर)




# हरीसाल आरोग्य केंद्राच्या पथकाकडून मातेला जीवनदान

## प्रसूतीनंतरचा गंभीर रक्तस्राव रोखण्यात यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्राथमिक आरोग्य केंद्र, हरीसाल येथील वैद्यकीय पथकाने दाखवलेली तत्परता आणि समन्वयामुळे एका मातेचे प्राण वाचले आहेत. प्रसूतीनंतर अचानक सुरू झालेला अतिरक्तस्राव पीपीएच नियंत्रित करून आरोग्य कर्मचाऱ्यांनी या महिलेला मृत्यूच्या दारातून सुखरूप बाहेर काढले आहे.

सोसोखेडा उपकेंद्रातील नांदुरी येथील सुशीला सावलकर, (वय २८) यांना प्रसूतीसाठी १ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १.१० वाजता हरीसाल आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. कर्तव्यावर असलेल्या आरोग्य सेविका सोनिया कंडुलना यांनी तातडीने तपासणी केली असता, प्रसूतीची वेळ जवळ असल्याचे लक्षात आले. डॉ. मोनिका कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने प्रसूती प्रक्रीया पार पाडली आणि अवघ्या ५ मिनिटांत म्हणजेच १.१५ वाजता महिलेने एका गोंडस कन्येला जन्म दिला.

अचानक ओढवलेल्या प्रसूतीनंतर काही वेळातच मातेची प्रकृती खालावली आणि तिला प्रचंड रक्तस्राव सुरू झाला. अतिरक्तस्रावामुळे रक्तदाब कमी होवून रूग्ण धापा टाकू लागला. ही स्थिती मातेच्या जीवासाठी अत्यंत धोकादायक होती.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आरोग्य सेविका मंगला बोरकर आणि सुनिता खेडकर यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. संपूर्ण टीमने एकाच वेळी कामाला सुरवात केली. दोन्ही हातातून जीवनरक्षक औषधे आणि सलाईन वेगाने सुरू करण्यात आले. गर्भाशयाचा मसाज करून रक्तस्राव थांबविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. रूग्णाच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून तिला तातडीने धारणी उपजिल्हा रूग्णालय येथे संदर्भीय सेवा देण्याची तयारी केली.पहाटे ४.२५ वाजता रूग्णाला पुढील उपचारासाठी धारणी येथे पाठविण्यात आले. विशेष म्हणजे, रूग्णवाहिकेतील प्रवासादरम्यानही आरोग्य सेविका सोनिया कंडुलना यांनी रक्तस्राव नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेतली. वेळेवर घेतलेला अचूक निर्णय आणि आरोग्य विभागातील महिला कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळे सुशीला सावलकर यांना जीवनदान मिळाले आहे. या यशस्वी कामगिरीबददल डॉ. मोनिका कोकाटे, सोनिया कंडुलना, मंगला बोरकर आणि सुनीता खेडकर यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सुपर स्पेशालिटी रुग्णालयात जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती

**अमरावती/प्रतिनिधीः-** जागतिक कर्करोग दिनानिमित्त सुपर स्पेशालिटी रुग्णालयात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश कर्करोगाविषयी जनजागृती करणे तसेच लवकर निदान व योग्य उपचारांचे महत्त्व रुग्ण व वैद्यकीय कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा होता.

या कार्यक्रमात प्रसिद्ध कैंसर सर्जन डॉ. अतुल यादगिरे, डॉ. रोहित मुंदडा , डॉ. माधुरी गाडेकर तसेच ऑन्को गायनॅकोलॉजिस्ट डॉ. भावना सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी कर्करोगाचे प्रकार, त्याची लक्षणे, प्रतिबंधक उपाययोजना आणि आधुनिक उपचारपद्धती याविषयी सविस्तर माहिती दिली.





डॉ. अतुल यादगिरे यांनी कर्करोगाचे वेळेवर निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात, असे नमूद केले. डॉ.रोहित मुंदडा यांनी बदलती जीवनशैली, तंबाखूचे सेवन व चुकीच्या आहारामुळे कर्करोगाचा धोका वाढत असल्याचे सांगितले. डॉ. माधुरी गाडेकर यांनी रक्तामधील कर्करोगांविषयी जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले. तर डॉ.भावना सोनटक्के यांनी महिलांनी नियमित तपासणी करणे किती आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच डॉ आदित्य भागवत यांनी कीमोथेरेपी बद्दल मार्गदर्शन केले.

सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कर्करोग शस्त्रक्रिया मोफत होतात याबद्दल देखील माहिती देण्यात आली. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाला उपस्थित डॉ आयुष हेडा , डॉ रणजित मांढवे, डॉ भूषण मुंदडा, डॉ अमित बागडिया, डॉ तृप्ती जवादे, डॉ सत्यम सत्यार्थ, डॉ मनीष नाथणकर, डॉ तेजश्री कीनखेडे, डॉ अलकेश गुल्हाने, डॉ किरण परिसे, डॉ ऐश्वर्या , डॉ अभिनव, डॉ स्नेहल चव्हाण, डॉ सपना गुप्ता, नर्सिंग स्टाफ मंगल मगरदे, ज्योती काळे, कविता बेरड, शालू केवाळे, नंदा टेटु, एनसीडी विभागातील दिनेश हिवराळे यांनी मार्गदर्शन केले.

# शहरात कलम ३८ लागू

अमरावती : जिल्हात आगामी काळात सण, उत्सव साजरा होणार आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलीस अधिनियमांतर्गत शहरात कलम ३८ लागू झाले आहे.



आगामी काळात विविध धर्मियांचे सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातील. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३८ नुसार सर्व ग्रामीण जिल्ह्यामध्ये परिसरातील व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना (पोलीस आयुक्तलांचे क्षेत्र वगळून) आजपासून, दि. २ फेब्रवारी ते ३१ डिसेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण विशाल आनंद यांनी दिले आहे.

रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यात, इतर सर्व सार्वजनिक किंवा लोकांच्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त राहण्यासाठी, वाद्यांबाबत नियम व नियंत्रण ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यासाठी हे आदेश देण्यात आले आहेत.

# जलयुक्त शिवारच्या कामांचे त्रयस्त संस्थांकडून ऑडिट

**अमरावती/प्रतिनिधीः-** महत्त्वाकांक्षी 'जलयुक्त शिवार अभियान २.०'अंतर्गत जिल्ह्यातील विविध जलसंधारण कामांची गुणवत्ता आणि परिणामकारकतेची त्रयस्त संस्थेमार्फत तपासणी करण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या कामांच्या मूल्यांकनासाठी दोन अभियांत्रिकी संस्थांची निवड केली असून, प्रत्यक्ष स्थळपाहणीला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात झालेल्या कामांचे निष्पक्ष मूल्यांकन व्हावे, यासाठी सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती आणि प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा या दोन संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थांचे तज्ज्ञ पथक जिल्ह्यातील प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांचे ऑडिट करीत आहेत. अभियानांतर्गत विविध शासकीय यंत्रणांमार्फत करण्यात आलेली



कामे या मूल्यांकनाच्या कक्षेत आहेत. यात नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट नाला बांध व त्यातील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण व रिचार्ज शाफ्टची कामे, शेततळे, समतल चर आणि गॅबियन बंधारे, नदी पुनरुज्जीवन व खोलीकरणासह डोह निर्मिती यांचा समावेश आहे. मूल्यांकन केवळ कामाची भौतिक स्थिती तपासण्यापुरते मर्यादित नसून, त्यात तांत्रिक बाबींना विशेष महत्त्व दिले जात आहे. यामध्ये मुख्यत्वे कामाची गुणवत्ता, कामाची भौतिक स्थिती. अभियानापूर्वीची भूजल स्थिती, अभियानानंतरची भूजल स्थिती, गाव जल परिपूर्ण झाले असल्याबाबत सविस्तर अहवाल शासनास सादर केला जाणार आहे, असे रोहयो उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी कळविले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### विरोधी महिला खासदारांनी

असे वाटत होते.' ज्येष्ठ मंत्र्यांनी विनंती करूनही महिला खासदार मागे हटण्यास तयार नव्हत्या, असेही तिवारी यांनी नमूद केले.

कार्यवाही स्थगित झाल्यानंतर विरोधी पक्षाचे खासदार बॅनर आणि पोस्टर्स घेउन 'वेल'मध्ये उतरले. काही खासदार ट्रेजरी बेंचच्या (सत्ताधारी बाकांकडे) दिशेने धावले. यावेळी अनुराग ठाकूर, अश्विनी वैष्णव आणि किरण रिजिजू हे विरोधकांना शांत करण्याचा प्रयत्न करताना दिसले.

**काँग्रेसचे प्रत्युत्तर-** भाजपच्या या आरोपांना काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी सांगितले की, 'पंतप्रधान तेव्हा सभागृहात नव्हतेच. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी महिलांविषयी काही आक्षेपार्ह विधाने केली होती. आम्ही (ज्योतिमणी, गनीबेन ठाकूर आणि मी) केवळ त्यांना विचारण्यासाठी त्यांच्या बाकांकडे गेलो होतो. आम्हाला येताना पाहून निशिकांत दुबे तिथून पळू लागले, म्हणून आम्ही 'पळतोय, पळतोय' असं म्हणालो. तिथे कोणतीही मारहाण किंवा हल्ल्याचा प्रयत्न झाला नाही.'

**राहुल गांधींचा टोलाः** दुसरीकडे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पंतप्रधानांवर टीका केली. 'पंतप्रधान मोदी संसदेत येणार नाहीत कारण ते घाबरले आहेत आणि त्यांना सत्याचा सामना करायचा नाहीये,' असे त्यांनी म्हटले आहे.

### राहुल यांनी नरवणे यांचे पुस्तक

राहुल गांधींनी रवनीत सिंग बिट्टू यांना जवळून जाताना पाहून म्हटले की, बघा एक गद्दार येत आहे, यांचा चेहरा बघा. राहुल गांधींनी हात मिळवण्याची ऑफर देत म्हटले की, 'हॅलो भाई, माझ्या गद्दार मित्रा. काळजी करू नकोस, तू परत (काँग्रेसमध्ये) येशील.'

**रवनीत सिंग बिट्टू आधी काँग्रेसमध्ये होते-**रवनीत सिंग बिट्टू २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये सामील झाले होते. त्याआधी ते तीन वेळा काँग्रेसचे खासदार राहिले आहेत. ते पहिल्यांदा २००९ मध्ये आनंदपूर साहिबमधून लोकसभेवर निवडून आले होते. त्यानंतर २०१४ आणि २०१९ मध्ये त्यांनी लुधियानामधून विजय मिळवला.

२०२४ च्या लोकसभेत त्यांनी लुधियानामधून पंजाब काँग्रेसचे प्रमुख अमरिंदर सिंग राजा वारिंग यांच्या विरोधात निवडणूक लढवली आणि सुमारे २० हजार मतांनी पराभूत झाले. निवडणूक हरल्यानंतरही त्यांना केंद्र सरकारमध्ये राज्यसभा सदस्य आणि मंत्री बनवण्यात आले आणि रेल्वे तसेच अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. रवनीत सिंग बिट्टू आणि राहुल गांधी यांच्यात शाब्दिक चकमक पाहायला मिळाल्याची ही पहिलीच वेळ नाही. सप्टेंबर २०२४ मध्ये बिट्टूने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याबद्दल वादग्रस्त टिप्पणी केली होती. बिट्टूने अमेरिकेत शिखांबद्दल राहुल गांधींच्या विधानावर प्रतिक्रिया देताना म्हटले होते की, राहुल गांधींनी शिखांना विभाजित करण्याचा प्रयत्न केला आहे. शीख कोणत्याही पक्षाशी संबंधित नाहीत. हा आग लावण्याचा प्रयत्न आहे. राहुल गांधी देशाचे नंबर वन टेररिस्ट आहेत.

### विलीनीकरणावर बोलण्याचा फडणवीसांना

करत असते तर ती भाजपशी चर्चा केल्याशिवाय करतील का? असा सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. याविषयी आज शरद पवार यांना विचारण्यात आले असता. त्यांनी चांगलेच सुनावले. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनिकरणाच्या चर्चेत फडणवीस नव्हते, त्यांना बोलण्याचा अधिकार नाही, असे शरद पवार म्हणाले. जयंत पाटील आणि अजित पवार हे यावर चर्चा करत होते, असे त्यांनी पुन्हा नमूद केले. त्यामुळे राष्ट्रवादी विलीनिकरणाच्या चर्चा सुरू होती असं शरद पवार यांनी पुन्हा अधोरेखित केल्याचे दिसून येते.

**अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत मोठे भाष्य-**महाराष्ट्र विधानसभा लोकसभा राज्यसभा गेले ५८ वर्ष आहे. ५८ वर्षात संसदेत माझी कधीही गैरहजरी नव्हती. अर्थसंकल्पातून ठोस पावलं उचलली जातील अशी अपेक्षा होती. अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापारी कराराबाबत दोन दिवसात चित्र स्पष्ट होईल अशी अपेक्षा आहे, असे पवार म्हणाले. अमेरिकेने काही समाधानकारक निर्णय घेतले.अमेरिकेने आपल्या देशवाबाबत टॅरिफ कमी केले. दोन दिवसांत भारत आणि अमेरिका बाबत चित्र स्पष्ट होईल. निर्यात करता येईल, ही काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. अमेरिका शक्तिशाली देश आहे. त्यांनी निर्यात करायला सुरु वात केली तर आपल्या शेतीवर परिणाम होईल असे वाटते, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली.

### विमान अपघातावर प्रश्न विचारला

जयकुमार गोरे यांच्यावरही उपरोधिक टीका केली. पंचायत समितीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पालकमंत्री स्वत? सभा घेत असतील, तर मग गावच्या गणपती मंडळाच्या अध्यक्ष निवडीसाठीसुद्धा पालकमंत्री बैठक घेतात का, असा टोलाही त्यांनी लगावला. सत्ताधा-यांकडून प्रशासनाचा निवडणुकांसाठी कसा वापर केला जातो, याकडे त्यांनी यावेळी अप्रत्यक्षपणे बोट दाखवलं.

दरम्यान, दुस-या बाजूला विधान परिषदेच्या विशेषाधिकार समितीची महत्त्वाची बैठक बुधवार आणि गुरु वार दुपारी दोन वाजता पार पडणार आहे. या बैठकीत दोन प्रकरणांवर सुनावणी होणार असून, सुषमा अंधारे आणि स्टँडअप क?मेडियन कुणाल कामरा यांना समितीकडून नोटीस बजावण्यात आली आहे. गुरु वारी समितीसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले असून, प्रत्यक्षात अंधारे आणि कामरा हजर राहणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकनाथ शिंदे यांच्याविरोधात कुणाल कामराने तयार केलेल्या गाण्याला सुषमा अंधारे यांनी पाठिंबा देत शिंदेंवर टीका केली होती, याच पार्श्वभूमीवर हे प्रकरण विशेषाधिकार समितीसमोर पोहोचले आहे.

### विधानसभेत रात्रभर राडा

कारवाई कारणीभूत ठरली आहे. १६ जानेवारी रोजी लोकायुक्तअधिका-यांनी बंगळुरू शहरी जिल्ह्याचे उत्पादन शुल्क उपायुक्त जगदीश नाईक आणि अन्य दोन अधिका-यांना २५ लाखांची लाच स्वीकारल्याच्या आरोपाखाली अटक केली. लोकायुक्तांच्या माहितीनुसार, या अधिका-यांनी सीएल-७ (ह?टेल व बोर्डिंग हाउस) आणि मायक्रो ब्रु अरी परवाने देण्यासाठी ८० लाखांची मागणी केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर विरोधकांनी मंत्री तिम्मापूर यांच्यावर थेट जबाबदारी निश्चित करत राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. मात्र, भाजप सरकारच्या काळात कोणत्याही मंर्त्याने राजीनामा दिलेला नाही, असे सांगून मंत्र्यांनी भाजपच्या राजीनाम्याची मागणी फेटाळून लावली. तिम्मापूर यांनी असेही सांगितले की, वाईन मर्चंट्स असोसिएशनने यापूर्वी जे. एच. पटेल, रेणुकास्वामी आणि कट्टा सुब्रमण्य नायडू यांच्यासह अनेक मंर्त्यांवर आरोप केले होते. मात्र, ही संघटना गेल्या २० वर्षांपासून अस्तित्वातच असल्याचा दावाही त्यांनी केला.

**मंर्त्यांचा बचाव; भ्रष्टाचार नवीन नाही-** विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना मंत्री आर. बी. तिम्मापूर यांनी विधानसभेत स्पष्टपणे आपली भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, भ्रष्टाचाराचा मुद्दा नवीन नाही, विशेषतः उत्पादन शुल्क खात्यात. मात्र, मी मंत्री झाल्यानंतर ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सोपी करण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याशी चर्चा केल्यानंतर प्रत्येक स्तरावर भ्रष्टाचार कमी करण्यासाठी आणि परवाना प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी आपण पावले उचलल्याचा दावा त्यांनी केला.

**काही लोकांकडे २० ते १०० बेनामी परवाने-** मंत्री तिम्मापूर यांनी आपल्या कार्यकाळातील सुधारणा अधोरेखित करत सांगितले की, मंत्री झाल्यानंतर मी परवाना प्रक्रिया सुलभ केली. वार्षिक नूतनीकरणाचा त्रास टाळण्यासाठी पाच वर्षांनी नूतनीकरण अनिवार्य केले. सीएल-७ परवान्यांसाठी पूर्वी १६ लागिन्स आवश्यक होती, ती मी सातपर्यंत कमी केली. तसेच, काही व्यक्तींकडे २० ते १०० बेनामी परवाने असल्याची माहिती आपल्याला होती, असा दावा करत त्यांनी ई-लिलाव पद्धत सुरू केल्याचे सांगितले.

### शक्तिपीठ महामार्गाचा खर्च

भूसंपादनाला विरोध करणा-या कागल व हातकणंगले तालुक्याचा एक मोठा भाग या महामार्गातून वगळला. याशिवाय नांदेड, कोल्हापूर, सिंधुदुर्ग व धाराशिव जिल्ह्यातही काही बदल करण्यात आले.

प्रकल्पाच्या आरखड्यात सातारा जिल्हाही नव्याने जोडण्यात आला. यामुळे हा महामार्ग आता १२ ऐवजी १३ जिल्ह्यांतून जाणार आहे. परिणामी, या प्रकल्पाच्या खर्चात १५ हजार कोटींची वाढ झाली आहे. यामुळे या प्रकल्पाचा खर्च ८६ हजार कोटींवरून १ लाख १ हजार कोटींवर पोहोचला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग या प्रस्तावाची तपासणी करत आहे. हा महामार्ग समृद्धी महामार्गासारखाच प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार महामार्गात येतो. त्यामुळे या महामार्गावरून वेगवान प्रवास शक्य असल्यामुळे वेळेची अधिकाधिक बचत होण्यास मदत होणार आहे.

शक्तिपीठ महामार्ग करवीर, भुदरगड, आजरा, चंदगड मार्गे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्याला जोडला जाईल. नव्या आराखड्यानुसार, हा महामार्ग वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यांतून जाणार आहे. महामार्गाच्या नव्या आखणीत सातारा जिल्ह्यातील माण, खटाव या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.शेतक-यांच्या विरोधामुळे हा महामार्ग आता ३५० गावांऐवजी ३९५ गावांतून जाणार आहे. त्यामुळे या महामार्गासाठी ८ हजार ५०० हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावे लागणार आहे. आधीच्या आराखड्यानुसार ८०२ कि.मी.चा असलेला हा महामार्ग आता ८५६ कि.मी.चा होणार आहे. प्रकल्पाच्या भूसंपादनाचा सर्व खर्च राज्य सरकार उचलणार आहे. यासाठी सरकार कर्ज घेणार आहे. आतापर्यंत १९६ गावांमधील भूसंपादनाची मोजणी पूर्ण झाली आहे.

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी

उभारले जाईल. या महाविद्यालयाला संलग्न ४३० रुग्णखाटांचे अद्ययावत रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या नियोजित प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक असल्याचे आदेशात म्हटले आहे. जमीन 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने मूल्यरहित आणि कब्जेहक्काने प्रदान करण्यात आली आहे. जमिनीच्या वापराबाबत शासनाने काही महत्त्वाच्या अटी घातल्या आहेत. महसूल विभागाच्या परवानगीशिवाय या जमिनीची विक्री, देणगी, गहाण किंवा कोणत्याही खाजगी-सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर हस्तांतरण करता येणार नाही.

### डिजिटल व्यवहाराच्या

मिर्झा (वय ३५, रा. सागर नगर, महाजनपुरा, अमरावती) व शेख तहसीम शेख अकबर (वय २५, रा. हैदरपुरा, हनुमान नगर, अमरावती) यांनी ही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अमरावती गाठत दोघांनाही अटक केली. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू तसेच चंदकांत बुरंगे, सचिन इंगोले, भूषण निघोट, प्रमोद पिसे, अमोल नगराळे, मंगेश चावरे आदींनी केली.

### महापौर - उपमहापौर पदासाठी

नगरसेवक निवडून आले. निवडणुकीमध्ये भाजपाला २५,युवा स्वाभिमान १५,काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी अजित पवार ११, बसपा ३,शिंदेसेना ३, शिवसेना उबाठा २, वंचित आघाडीला १ जागा मिळाली आहे.

### अंजनगाव पोलीस स्टेशन गुन्हे

ताब्यातुन पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथुन चोरी गेलेली दुचाकी वाहन किंमत अंदाजे ५०, हजार रूपये हस्तगत करण्यात आले. तर तिसऱ्या घटनेत अंजनगाव सुर्जी सराफा लाईन मध्ये एक इसम संशयीत रीत्या दुचाकी वाहनाने सराफा दुकानांकडे पाहत फीरत असल्याचे आढळुन आला असता व झडती घेतली असता त्याचे खीशात एक सोन्याचे पेडॉल, एक जोड कानातले व ४७ पिवळया धातुचे मणी मीळून आले. प्रविण सायसिंग इंसी (वय २५)रा. महात्मा फुले नगर, शहादा जि. नंदुरबार असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव असुन आरोपीने दागीने हे त्याचा मीत्र विक्की मनोहर भोंडे. रा. रासेगाव याचे घरुन चोरले आसे कबुल केले.आरोपीकडुन दागीने मोटार सायकल मोबाईल असा १,८६०००रुपयाचे व सर्व घटीत गुन्ह्यातील एकुण २ लाख ४६ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत , उपविभागीय पोलीस अधीकारी मनिष ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पोनि सुरज बोंडे ठाणेदार, पोलीस उपनिक्षक भारत चिरडे, पो अंमलदार, जयसिंग चव्हाण, अमीत घाटे, आकाश रंगारी, रवी राठोड, शुभम मार्कंड व मोहसान पठाण यांनी केली.

### जल जीवन मिशन कंत्राटी

कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्ती पुरस्कार आणि प्रमाणपत्र द्वारा मान्यता देण्यात यावी आदि मागण्यासाठी ही आंदोलन करण्यात आले. मागण्या पूर्ण नाही झाल्या तर ९ फेब्रुवारीपासून बेमुद्दत आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. काम बंद आंदोलन करणाऱ्यांमध्ये रमाकांत गायकवाड ,सचिन जाधव, ऋषिकेश शीलवंत, बंडू हिरव, प्रशांत सातव, प्रदिप बद्रे, निलेश नागपुरकर ,धनंजय तिरमारे,दर्शना गौतम, प्रिती बावणे,अजिंक्य काळे,भरत वानखडे सह इतरांचा सहभाग होता.

### राज्यस्तरीय सर्पमित्र संमेलन

आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या संमेलनमध्ये प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार नवनीत राणा, राहुल गडपाले, डॉ. विक्रम रोडे आदी उपस्थित राहणार आहेत. संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून सर्पमित्र नीलमकुमार खैरे, अशोक कॅप्टन, राघवेंद्र नांदे, राजा गोळे यांच्यासह वन्यजीव अभ्यासक अद्वैत केवले व अजहर खान मार्गदर्शन करणार आहेत. संमेलनाच्या माध्यमातून सर्प मित्रांचे कार्य त्यांचे अनुभव तसेच समाजात सर्प विषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. कार्यक्रमाची नोंदणी सकाळी आठ वाजता सुरू होईल. उद्घाटन समारंभ व इतर महत्त्वाच्या सत्राचे सुयोग्य आयोजन करण्यासाठी टीम झेनीथ कडून जोरदार तयारी सुरू आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी अमरावती येथील सर्व सर्पमित्र एकत्रितपणे प्रयत्न करत आहे. संमेलनात राज्यभरातील ५०० सर्पमित्र सहभागी होणार आहेत. पहिल्यांदा या प्रकारचे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. पर्यावरण प्रेमी सर्पमित्र व नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषद मध्ये चेतन भारती, अभिजीत दाणी, इंगोले आदी उपस्थित होते.

### वाळू तस्करांवर पोलिसांची

पथकाने बुधवारी मोर्शी पोलीस ठाणे हद्दीत ट्रक एमएच २० जीसी ३८८७ व एम एच ३० बीडी ७८८८ या दोन ट्रकावर कार्यवाही करून ५१ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला तसेच तळेगाव दशासर मार्गावर ट्रक एमएच ३५ एजे ११२२,एमएच १२ एक्सएम ९४२९ , एमएच २७ डिएम ५२६९ आणि चांदुर रेल्वे ठाणे अंतर्गत राजना गावात ट्रक एमएच २७ बीबी ८४५४ व शिरजगाव कसबा हद्दीत पाळा रोडवर डी २१ के ४९५७ वर कार्यवाही करून ट्रक जप्त केले. एकूण १ कोटी ५० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १५ आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### २२ रोजी रिफॉर्म्स क्लबची निवडणूक

लावण्यात येणार आहे. १३ फेब्रुवारी रोजी नामांकन वापस घेतल्यानंतर उमेदवारांची अंतिम यादी प्रकाशित केली जाणार आहे. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत उमेदवार आपल्या नावात सुधार करू शकतात. त्यानुसार बॅलेट पेपरवर नाव प्रकाशित केले जाणार आहे. आवश्यकता पडल्यास २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत मतदान होणार आणि सायंकाळी मतमोजणी होणार आहे.

### तरुणावर प्राणघातक हल्ला

जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता आणि नागरिकांची प्रचंड गर्दी येथे जमा झाली होती. माहिती नुसार कठोर नाका ते रंगोली हॉटेल कडे जाणाऱ्या मार्गावर चिकन मटन चा व्यवसाय करणाऱ्यांचा वाद झाला होता. या वादात आरोपींनी राजू मदनेकर याच्यावर दगडांनी हल्ला केला. या हल्ल्यात राजू मदनेकर गंभीर जखमी झाला. यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. नागरिकांचीं मोठ्या प्रमाणात गर्दि येथे जमा झाली होती. घटनेची माहिती मिळताच गाडगे नगर पोलीस तेथे पोहोचले. पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त येथे लावण्यात आला. जखमी राजू मदनेकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

### जलतरण तलाव बनले शोभेची

दुरुस्तीच्या अभावी ते बंद अवस्थेत पडून होते. त्यानंतर जलतरण तलाव सुरू करण्याच्या मागणीने जोर धरला होता.यानंतर अचलपूर नगर परिषद मध्ये प्रशासक राज असताना नगरपालिकेकडून जलतरण तलावाच्या दुरुस्तीकरिता जवळपास २ कोटी ४० लाख रुपयांचा निधी खर्च करून जलतरण तलावाच्या दुरुस्तीची कामे कंत्राटदारामार्फत करण्यात आले आहे. पण कोट्यवधी रुपयांचा खर्च कुठे करण्यात आला आहे ? हा प्रश्न सुध्दा निर्माण झाला आहे .जलतरण तलाव दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्याची माहिती समोर आली आहे .तर किरकोळ कामे अंतिम टप्प्यात असल्याने या दुरुस्तीच्या कामासंदर्भात अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून जलतरण तलाव धूळखात पडले आहे. लवकरात लवकर करून जलतरण तलाव नागरिकांसाठी खुला करावा, अशी मागणी अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरातील विद्यार्थी, खेळाडू आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे. तर जलतरण तलावाचे काम पूर्ण झाले असून पेव्हिंग ब्लॉग, किरकोळ कामे सुरू असल्याने या सर्व कामाच्या दर्जाची चौकशी होणार का ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या प्रकरणी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांची प्रतिक्रिया घेतली असता ,येत्या २० दिवसात जलतरण तलाव नागरिकांसाठी सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली .आणि काम पूर्ण झाले असून एकूण दुरुस्तीवर खर्च झालेल्या निधी बाबत संबंधित नगर अभियंताशी संपर्क साधण्याचे सांगितले. अचलपूर नगर परिषद बांधकाम अभियंता मनीष चोमवाल यांची सुद्धा या प्रकरणी प्रतिक्रिया घेतली असता ,ते बैठकीत असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही .

### घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती

काळे यांनी सांगितले की, घरकुल लाभार्थ्यांना घर बांधणीसाठी लागणारी रेती सहज व विनाअडथळा उपलब्ध व्हावी, यासाठी शासनाने केलेल्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना कोणताही आर्थिक बोजा पडू नये, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमास धारणीचे तहसीलदार प्रदीप शेवाळे, गटविकास अधिकारी गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक हंकारे, रेती घाटाचे लिलावधारक अंकुश मालवीय, नगरसेवक उत्तमराव मोडक, नगरसेवक प्रतीक मालवीय,तसेच राहुल सोनोने आकाश खैरकर विवेक नवलाखे, राजा पाटील , गाजू सुदस्कर, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाच्या नियमानुसार रेती घाटाच्या लिलावधारकांना मंजूर रेती साठ्यामधून दहा टक्के रेती मोफत स्वरूपात घरकुल लाभार्थ्यांना देणे बंधनकारक आहे. मात्र, रेती वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्यांनी स्वतः करायचा असून, लिलावधारक केवळ मोफत रेती उपलब्ध करून देणार आहेत. घरकुल लाभार्थ्यांची यादी बीडीओ कार्यालयामार्फत उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयास उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. या उपक्रमामुळे घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आगामी काळात अधिक लाभार्थ्यांना याचा फायदा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# भ्रष्टाचाराला चाप; लाच घेताना पकडलेल्या दोन अधिका-यांना शिक्षा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी ठेकेदाराकडून लाच मागून स्वीकारणाऱ्या वाशीम जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागातील दोन अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे. जिल्हा व सत्र न्यायालयाने या प्रकरणात दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निकाल देत दोन्ही आरोपींना कारावास व दंडाची शिक्षा सुनावली.**



या प्रकरणातील आरोपी सुभाष मोतीराम इंगळे, सहाय्यक लेखा अधिकारी वर्ग-३, तसेच आरोपी निलेश मधुकर लंगोटे, कनिष्ठ सहाय्यक वर्ग-३ (दोघेही जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग, वाशीम) यांनी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या निधी वितरणाच्या कामासाठी संबंधित तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाच मागितल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.

तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार विभागाने सापळा रचून कारवाई केली. सापळा कारवाईदरम्यान आरोपींनी १७ हजार रुपये रोख व ३ हजार रुपये कार्यालयात स्वीकारल्याचे स्पष्ट पुरावे मिळाले. याप्रकरणी दिनांक ३१ मे २००८ रोजी वाशीम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सविस्तर सुनावणीनंतर जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी सुभाष इंगळे यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अंतर्गत ४ वर्षे सक्त मजुरी व २५ हजार रुपये दंड, तसेच कलम १३(१)(ड) सह १३(२) अंतर्गत ५ वर्षे सक्त मजुरी व २५ हजार रुपये दंड अशी एकूण ५० हजार रुपयांचा दंड व कारावासाची शिक्षा सुनावली.

त्याचप्रमाणे आरोपी निलेश लंगोटे यांनाही समान गुन्ह्यांत दोषी ठरवून कारावास व एकूण ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्रीराम नारायण काळू यांनी प्रभावी युक्तिवाद केला. तसेच या कारवाईत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधिक्षक जगदीश परदेशी (ट्रायल ऑफीसर), पोहवा समाधान मोघाड, महीला अमंलदार उज्वला गायकवाड, पोशि सतीश गुळदे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम यांच्यातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी लाच मागत असल्यास त्वरित तक्रार दाखल करावी. नागरिकांसाठी acbmaharashtra.gov.in तसेच acbmaharashtra.net या संकेतस्थळांवर ऑनलाइन तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. भ्रष्टाचाराविरोधातील या निकालामुळे शासकीय यंत्रणेत खळबळ उडाली असून, प्रामाणिक प्रशासनासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# मालेगाव शहरात बेशिस्त वाहतुकीवर पोलिसांचा कारवाईचा धडाका

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव शहरात वाढत चाललेल्या बेशिस्त वाहतूक आणि वाहतूक नियमांकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील काही प्रमुख चौक व वर्दळीच्या रस्त्यांवर बेशिस्त वाहनधारकांविरोधात कडक कारवाई करण्यात आली.



या मोहिमेत नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर, चुकीच्या पद्धतीने वाहन चालवणाऱ्यांवर तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये काही प्रमाणात शिस्त दिसून आली.

मात्र, नागरिकांमधून अशी प्रतिक्रिया उमटत आहे की, ही कारवाई तात्पुरती न राहता दररोज सातत्याने कारवाई राबविण्यात यावी. एखादा-दोन दिवस कारवाई करून पुन्हा परिस्थिती जैसे थे होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाने रोज अंमलबजावणी करावी, अशी ठाम मागणी नागरिक व व्यापारी वर्गाकडून होत आहे.

शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, अपघातांना आळा बसावा आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी नियमित व कडक कारवाईची नितांत गरज असल्याचे मत सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

# गुरुकुल विद्यालयात भव्य-दिव्य वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



■ प्रतिनिधी | कारंजा ■

गुरुकुल विद्यालय, कोळी कारंजा येथे शनिवार, दिनांक ३१ जानेवारी रोजी विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या थाटात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कला व कौशल्यांचे अप्रतिम सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषांमधून सातारकर लोककला, देशभक्तीपर गीत, ऐतिहासिक वारसा जपणारी नृत्ये सादर केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक औचित्यानिमित्त महाराजांचे बारा किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आल्याच्या गौरवशाली घटनेवर आधारित सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. तसेच राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त (३०० वर्षे पूर्ण) त्यांच्या कार्यावर आधारित सोहळा सादर करून विद्यार्थ्यांनी इतिहासाचे महत्त्व अधोरेखित केले. स्नेहसंमेलनातील आणखी एक नाविन्यपूर्ण भाग म्हणजे स्पोर्ट्स थीम, ज्यामध्ये भारतातील महान ऑलिम्पिक खेळाडूंना आदरांजली अर्पण करण्यात आली. यामध्ये खाशाबा जाधव (कुस्ती), मिलखा सिंह (धावपटू), मेरी कॉम (बॉक्सिंग) यांसारख्या क्रीडापटूंना ट्रिब्यूट देण्यात आले.

# महिलांनी घेतला पुढाकार आणि अखंड हरिनाम सप्ताह झाला साकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री संत गजानन महाराजांच्या कृपाशीर्वादाने हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील गुगुळ पिंपरी येथे श्री संत गजानन महाराज महिला सेवा समिती द्वारा आयोजित कार्यक्रमाचा प्रथम दिवस अगदी उत्साहात पार पडला. विशेष गोष्ट म्हणजे सप्ताहातील श्री संत गजानन महाराज भावनेरूपण कथाकार ह.भ.प.पवनजी महाराज जाधव वृंदावन धाम . त्याचप्रमाणे सात दिवसातील सात कीर्तनकार , तसेच गायनाचार्य ,मृदंगाचार्य ,विणेकरी चोपदार मंडप डेकोरेशन, साऊंड सिस्टिम , सप्ताह मधील लागणाऱ्या सर्व गोष्टी निशुल्क असून समाजापुढे महिलांनी आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी सर्व कलाकार गावातीलच असून यांनी सप्ताह आजीवन साजरा करण्याचा संकल्प केला आहे.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी करा-वसंतराव हिवराळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महामानव परमपूज्य बोधीसत्व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षामध्ये माता रमाईचा खूप मोठा वाटा आहे . रमाईचा त्याग आणि संघर्ष हा जनसामान्यांपर्यंत पोहोचवा या करिता दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी माता रमाई आंबेडकर यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी साहेब वाशिम यांच्या मार्फत मुख्यमंत्री साहेब महाराष्ट्रात राज्य मुंबई यांना निवेदनाद्वारे केली आहे. पुढे निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी माता रमाई भिमराव आंबेडकर यांचा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडणघडणीमध्ये मोलाचा व सिंहाचा वाटा आहे. त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागातून आणि संघर्षातूनच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्याला लाभले आहेत . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षामध्ये माता रमाईचा खूप मोठा वाटा आहे म्हणून दरवर्षी बहुजन समाज हा ७ फेब्रुवारी रोजी माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करत असतात परंतु शासकीय स्तरावर अधिकृतरित्या हि जयंती साजरी होत नाही. त्यामुळे

त्याग मूर्ती माता रमाई यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी करण्यात यावी जेणेकरून शालेय विद्यार्थी



व जनसामान्यांमध्ये माता रमाईचा त्याग आणि आदर्श समर्पणाची भावना हि देशाच्या जडणघडणीसाठी प्रेरणादायी ठरेल. माता रमाई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी व आपल्या परीवारासाठी कष्ट करून अपला आदर्श निर्माण करणार्या त्याग मूर्ती माता रमाईचा इतिहास जगासमोर येईल अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी जिल्हाधिकारी वाशिम यांनी निवेदनाची दखल घेऊन शासनाने आदेश दिल्यास त्याग मूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती शासकीय स्तरावरून साजरी करण्यात येईल अशी माहिती दिली.

# आकांक्षा मतिमंद विद्यालयातील चिमुकल्यांना साहित्य वाटप



■ प्रतिनिधी | मानोरा ■

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील भुली फाटा येथील आकांक्षा मतिमंद विद्यालयामध्ये 'प्रजासत्ताक स्नेहभेट' हा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत या विशेष मुलांसोबत आनंद साजरा करीत मुलांना आरोग्य किट, खेळाचे साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे मुख्य संयोजक सहायक महसूल अधिकारी संदीप एम. आडे हे होते. केवळ साहित्य वाटप करून न थांबता, उपस्थित मान्यवरांनी बराच वेळ या विशेष विद्यार्थ्यांसोबत खेळ खेळून त्यांचा उत्साह वाढवला. याप्रसंगी मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

**महसूल विभाग व मित्रांचा पुढाकार :** कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महसूल सहायक सागर देवकर, मानोरा येथील उमेश शालिग्राम महल्ले, पाळोदी येथील प्रतिक वाघमारे, हातना येथील रोशन जाधव आणि गिरोली येथील प्रवीण डाखोरे, पोहरादेवी सतीश हर्सूले यांनी विशेष सहकार्य केले.

# बाळखेड येथे आ. अमित झनक यांची सांत्वनपर भेट



■ प्रतिनिधी | रिसोड ■

दि. ३० जानेवारी रोजी रिसोड तालुक्यातील बाळखेड येथे विविध कारणांनी निधन झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची आमदार अमित झनक यांनी सांत्वनपर भेट घेतली. दुःखाच्या प्रसंगी कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहत त्यांनी त्यांचे सांत्वन केले.

बाळखेड येथील स्व. स्वप्नीलभाऊ पऱ्हाड यांचे नुकतेच अकाली व दुःखद निधन झाले. तसेच स्व. मंदाबाई शिवाजीराव अवताडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून, स्व. धोंडूबाबा गिरी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. या तिन्ही कुटुंबीयांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन आमदार अमित भाऊ झनक यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत दुःख व्यक्त केले व या कठीण प्रसंगी आपण सदैव त्यांच्या पाठीशी असल्याचे आश्वासन दिले. 'आपल्या माणसाचे जाणे ही अपूरणीय हानी असून, अशा वेळी कुटुंबीयांनी धीर सोडू नये,' असे शब्द आमदार झनक यांनी सांगितले.

या सांत्वन भेटीदरम्यान पऱ्हाड, अवताडे व गिरी कुटुंबीयांसोबत अनेक स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. आमदार झनक यांनी प्रत्येक कुटुंबीयांची आपुलकीने विचारपूस करत दुःखात सहभागी होत माणुसकीचे दर्शन घडवले.

या भेटींमुळे संबंधित कुटुंबीयांना मानसिक आधार मिळाला आहे

# एक दिवशीय धम्म परिषद निमित्त खिचडी वाटप



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

भीमज्योती महिला संघ जांब रोड मंगरूळपीर यांच्या विद्यमाने ता ३ रोजी एक दिवशीय भव्य बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या धम्म परिषद मध्ये युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभदादा सपकाळ यांचे तर्फे खिचडीचे वाटप करण्यात आले.

या परिषदेला पुज्य भिक्खु करुणानंद महाथेरो संभाजीनगर, पुज्य भिक्खु धम्मबोधी थेरो, पुज्य भिक्खु एन. धम्मानंद थेरो यांच्या प्रमुख मार्गदर्शनामध्ये धम्म परिषद पार पडली यावेळी जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने मोठ्या प्रमाणात बौध्द उपासक उपासिका उपस्थित होते यावेळी युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभ दादा सपकाळ मित्र परिवाराच्या वतीने २५० किलो खिचडी वाटप करण्यात आली या माध्यमातुन हजारो लोकांनी खिचडीचा आस्वाद घेतला असून सामाजिक उपक्रमाची सदैव जाणं असलेले सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे कुठल्याही सामाजिक कार्यात हिरीरीने सहभागी असतात या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सोनु पेनोरे, अमर भगत, ऋषिकेश शिंदे, प्रशांत खर्चे, विश्वजीत मोहोळ, नितीन डोंगरे, विश्वजीत पडघान, आशिष मनवर, सचिन चव्हाण, आदित्य पखाले, ऋग्वेद भगत आदींनी पुढाकार घेतला होता.

# विद्याभारती शाळेत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये सत्र२०२५-२६ यावर्षीचा इयत्ता दहावीचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेकरिता तसेच त्यांच्या भावी आयुष्यासाठी सदिच्छा देण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे सर, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. गजानन रावले उपप्राचार्य शिवाजी विद्यालय वाशिम, शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी, उपाध्यक्ष नंदकिशोर मिटकरी प्रशासन अधिकारी न.प. वाशिम, संचालक सुमित सुरेशराव मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत गीत म्हणून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यानंतर इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याकरिता आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील आपल्या आठवणी व अनुभव यांचे शिदोरी नेहमीच आमच्या सोबत राहील अशी ग्वाही देऊन शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली व शाळेतील शिक्षकांचे तसेच शाळा प्रशासनाचे आभार देखील मानले. प्रमुख पाहुणे प्राध्यापक गजानन रावले, प्रा. सुरेशराव मिटकरी, नंदकिशोर मिटकरी यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या अध्यक्षीय भाषणातून मोलाचे मार्गदर्शन केले तसेच शुभेच्छा दिल्या.

# सुभेदार रामजी सकपाळ -आंबेडकर यांना केले अभिवादन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी ५:३० वाजता पितामह सुभेदार रामजी सकपाळ -आंबेडकर यांच्या ११३ व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सुरूवातीला पितामह सुभेदार रामजी



सकपाळ -आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अभिवादन कार्यक्रमाला बुद्ध फुले शाहू आंबेडकर विचारांचे शाहीर धम्मानंद इंगोले, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, डायमंड कोचींग क्लासेस चे संचालक माधव डोंगरदिवे, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर, से.नि.माध्य.शिक्षक आर.पी.कांबळे, अशोक देशमुख, दादाराव इंगोले, उद्धव अवचार, अर्यन बरडे, राहूल सोमटकर, सागर अवचार, अजय अवचार यांचेसह अनेकांनी सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांना अभिवादन केले.


## जाहीरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोंकाना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी मंदर्भिय अर्जान्वये अर्जदार श्री मोहण उत्तमराव सावके व इतर रा हिरंगी ता मंगरुळपीर जि वाशिम यांचा अर्जान्बये सरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे हिरंगी येथील सर्वे क्र/गट क्र १३ मधील एकूण क्षेत्र ०.३८ हे आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये ये साधे कुळ चंपत नारायण कुनबी सन ९ व १० चा स प १९५८/५९ प्रमाणे या नावाचे कुळ दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप / हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून (कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक २८/०८/२०२५

शिक्का

**तहसिलदार**
**मंगरुळपीर**


# रस्ते रुंदीकरणात पाईपलाईन फोडल्याने वाशिम शहर तहानले

# ठेकेदाराच्या मनमानीमुळे पाणीपुरवठा विस्कळीत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातून जाणाऱ्या अकोला-हिंगोली राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. मात्र या कामात संबंधित ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा फटका बसला असून नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.



सदर रस्ते रुंदीकरणाचे काम केंद्रातील एका मोठ्या मंत्र्याच्या जवळच्या व्यक्तीने घेतल्याची चर्चा असून, त्यामुळे कामात कोणतीही नियमावली न पाळता मनमानी सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अनेक ठिकाणी माती टाकून रस्ता दाबला जात असून, खोदकाम करताना नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाशी कोणतीही पूर्वकल्पना न देता मशीनद्वारे थेट पाईपलाईन फोडण्यात आल्या.

या कामादरम्यान शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईन वारंवार फुटत असून, गेल्या चार दिवसांपासून वाशिम शहरातील अनेक भागांत पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. त्यामुळे नगरपरिषद पाणीपुरवठा विभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित पाणीपुरवठा सभापती सौ. वर्षाताई नामदेव हजारे यांनी फुटलेल्या पाईपलाईन तातडीने दुरुस्त करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा फोन केले. मात्र ठेकेदाराने फोन न उचलता अरेरावीची भूमिका घेतल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्याची माणसेही अधिकाऱ्यांशी नीट संवाद साधत नसल्याचे सांगण्यात येत आहे. ठेकेदाराच्या या बेजबाबदार वर्तनामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अखेर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर संघटक नामदेवराव हजारे यांनी थेट ठेकेदाराला जाब विचारत चांगलेच खडसावले. त्यानंतरच संबंधित ठेकेदाराने फुटलेल्या पाईपलाईन जोडण्याचे काम सुरू केले. दरम्यान,

नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाचे अभियंता हिरेमठ यांनीही ठेकेदाराला स्पष्ट शब्दांत इशारा देत, वेळेत दुरुस्तीचे काम न केल्यास कडक कारवाई करण्यात येईल, अशा सूचना दिल्या आहेत.

रस्ते विकासाच्या नावाखाली मूलभूत सुविधांकडे होणारे दुर्लक्ष थांबवावे, अन्यथा नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात जातील, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७१ ■ गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### अजितदादांच्या जाण्यानंतर अर्थतिजोरीवर ताण

# निधीची जुळवाजुळव करताना मुख्यमंत्र्यांची दमछाक

## शासकीय खर्चावर कात्री ; नव्या नियमावलीने उधळपट्टीला लगाम

**मुंबई जनमाध्यम :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याच्या राजकारणासह अर्थकारभारातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजितदादांकडे असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या अर्थ खात्याची सूत्रे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे घेतली असून, राज्याच्या तिजोरीवर वाढत असलेल्या ताणामुळे त्यांनी खर्चावर कडक निर्बंध लादण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थ खात्याची जबाबदारी स्वीकारताच फडणवीस यांची कसोटी सुरू झाली असून, निधीची जुळवाजुळव करताना त्यांची दमछाक होत असल्याचं चित्र आहे.

राज्याची आर्थिक स्थिती बळकट ठेवण्यासाठी आणि अनावश्यक उधळपट्टीला आळा घालण्यासाठी अर्थ विभागाने नवी नियमावली लागू केली आहे. या अंतर्गत १५ फेब्रुवारीपासून कोणत्याही प्रकारच्या नव्या निविदा काढण्यास तसेच खरेदी प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे अनेक विभागांची आर्थिक घाई थांबणार असून, वर्षअखेरीस होणाऱ्या बेफिकीर खर्चावर लगाम बसणार आहे.



फर्निचर दुरुस्ती, कार्यालयीन संगणक व उपकरणे, ड्रायव्हर मशीन, सुटे भाग, कार्यालय भाड्याने घेणे, सेमिनार, प्रशिक्षण शिबिरे आणि भौतिक कार्यशाळा यांसारख्या खर्चांवर थेट बंदी घालण्यात आली आहे. मात्र नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होऊ नये म्हणून औषध खरेदीला अपवाद ठेवण्यात आला आहे. आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाला औषध खरेदीची परवानगी कायम ठेवण्यात आली असून, याबाबत स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

आर्थिक वर्षाच्या अखेरीस अनेक विभाग निधी खर्च करण्यासाठी घाई करतात आणि त्यातून अनावश्यक खरेदी व खर्च केला जातो, ही बाब लक्षात घेऊनच अर्थ विभागाने हे कठोर पाऊल उचलले आहे. हे आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्याअंतर्गत येणारी कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था तसेच नागरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांवर लागू असणार आहेत.

अजित पवार यांच्याकडे अर्थ खात्यासह क्रीडा व युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास ही खाती होती. त्यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करून त्यांच्याकडे क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली. मात्र अर्थ आणि नियोजन हे अत्यंत संवेदनशील खाते मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतःकडेच ठेवले आहे.


आगामी ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अजितदादांच्या अनुपस्थितीत आर्थिक शिस्त राखणे, तिजोरी सावरणे आणि विकासकामांचा समतोल राखणे, हे मोठे आव्हान आता फडणवीसांसमोर उभे ठाकले आहे. राज्याचा कारभार आणि अर्थसंकल्पीय दिशा या दोन्हींची परीक्षा येत्या काळात होणार आहे.

### क्यूआर कोडचा सापळा;

# देवळीतील सराफाची ३२ हजारांची फसवणूक, दोघे अमरावतीतून गजाआड

**वर्धा जनमाध्यम :** डिजिटल व्यवहाराच्या नावाखाली क्यूआर कोडचा बनाव रचत देवळी येथील सराफा व्यावसायिकाची फसवणूक करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमरावती येथून अटक केली. आरोपींकडून एक सोन्याची अंगठी व मोबाईल असा एकूण ४७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

देवळी येथील सराफा व्यावसायिक विवेक कांकरिया (५०) यांच्या दुकानात दोन अनोळखी इसम अंगठी खरेदीसाठी आले होते. त्यांनी २ ग्रॅम २३० मिली वजनाची, ३२ हजार ३०० रुपये किमतीची सोन्याची अंगठी पसंत केली. आरोपींनी कांकरिया यांच्याकडून बँकेचा क्यूआर कोड मागून मोबाईलद्वारे स्कॅन केला व पैसे पाठवल्याचा बनावट व्यवहार दाखविला. मोबाईल ॲपमध्ये राईट टिक चिन्ह दिसताच कांकरिया यांनी विश्वास ठेवून सोन्याची अंगठी व बिल दिले. त्यानंतर दोघेही दुकानातून निघून गेले.



काही वेळाने बँक खात्याची पाहणी केली असता रक्कम जमा न झाल्याचे लक्षात येताच आपली फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. कांकरिया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला.या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडे देण्यात आला. तपासादरम्यान उमेर मिर्झा जफर बेग मिर्झा (३५, रा. सागर नगर, महाजनपुरा, अमरावती) व शेख तहसीम शेख अकबर (२५, रा. हैदरपुरा, हनुमान नगर, अमरावती) यांनी ही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अमरावती गाठत दोघांनाही अटक केली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू तसेच चंदकांत बुरंगे, सचिन इंगोले, भूषण निघोट, प्रमोद पिसे, अमोल नगराळे, मंगेश चावरे आदींनी केली.

### ऑपरेशन मुस्कान -१४ यशस्वी

# दोन वर्षांपूर्वी पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध

## आरोपी कामठीतून अटकेत

**वर्धा । जनमाध्यम :** अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या 'ऑपरेशन मुस्कान -१४' अंतर्गत वर्धा पोलिसांनी दोन वर्षांपूर्वी फूस लावून पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेत आरोपीस नागपूर जिल्ह्यातील कामठी येथून अटक करत गुन्हा उघडकीस आणला आहे.



या प्रकरणी फिर्यादीने दि. ४ जून २०२५ रोजी पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे तोंडी तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, अंदाजे १६ वर्षांची अल्पवयीन मुलगी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेली होती. त्यावरून अप.क्र. ३७४/२०२४ अन्वये कलम १३७(२) BNS प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासादरम्यान आरोपी व पीडित मुलीचा शोध न लागल्याने प्रकरणात कलम १४३(४) BNS वाढवून गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वर्धा यांच्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखा व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. खात्रीशीर माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सायबर तपासाच्या आधारे आरोपी प्रफुल ज्ञानेश्वर काळे (वय २९, रा. दिग्रज, ता. सेलू) हा पीडित मुलीसह कामठी येथे असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी मौजा आवंडी, कामठी येथील कोळसा डेपो परिसरातून आरोपीस ताब्यात घेतले. चौकशीत मुलगी त्याच्यासोबत राहत असल्याचे स्पष्ट झाले. आरोपीस रीतसर अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे करीत आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

### वडापाव खाऊन मावळला तरुणाचा श्वास

# आई-वडिलांचे स्वप्न संपले; प्रशासन नुसते पाहत राहिले

## वडापाव की दुसरे काही ? तरुणाच्या मृत्यूमागचे खरे कारण अजूनही गूढच

### उघड्यावरील खाद्यपदार्थांचा वाली कोण?; चवीच्या नावाखाली जीवाशी खेळ

**वर्धा जनमाध्यम :** वडापाव खाल्ल्याने तरुणाचा मृत्यू झाला का, की मृत्यूमागे दुसरेच काही कारण आहे, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित असतानाच, वर्धा जिल्ह्यातील एका १७ वर्षीय तरुणाच्या मृत्यूने उघड्यावरील खाद्यपदार्थांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शवविच्छेदन अहवाल येईपर्यंत मृत्यूचे ठोस कारण स्पष्ट होणार नसले, तरी उघड्यावर विकल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांचा वाली कोण असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

बदलत्या जीवनशैलीत रस्त्याच्या कडेला मिळणाऱ्या वडापाव, समोसा, चाट यांसारख्या पदार्थांकडे तरुणाई मोठ्या आकर्षणाने धाव घेत आहे. मात्र या आकर्षणामागे दडलेला धोका किती जीवघेणा ठरू शकतो, याचे भयावह उदाहरण नुकतेच समोर आले आहे.

पडेगाव येथील मूळ रहिवासी व सध्या वर्धेच्या रामनगर परदेशीपुरा भागात वास्तव्यास असलेला रितेश ओंकारेश्वर मुडे (वय १७) याने २ फेब्रुवारी रोजी महावीर गार्डन परिसरातील एका छोट्या व्यावसायिक प्रतिष्ठानात वडापाव खाल्ला. त्यानंतर त्याची प्रकृती अचानक बिघडली. उलट्या सुरू झाल्या; मात्र प्रारंभी त्याकडे दुर्लक्ष झाले. रात्री त्याने घरी खिचडी खाल्ली, तर दुसऱ्या दिवशी सकाळी दुध-बिस्कीट सेवन केले. त्यानंतर अवघ्या तासाभरात पुन्हा तीव्र उलट्या सुरू झाल्याने त्यास खासगी डॉक्टरांकडे नेण्यात आले.

उपचार सुरू असतानाच दुपारच्या सुमारास रितेशला भोवळ आल्याने त्याची प्रकृती अधिकच नाजूक बनली. अखेर जिल्हा सामान्य रुग्णालयातून सेवाग्राम येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले; मात्र तेथे डॉक्टरांनी दुपारी ४.१५ वाजताच्या सुमारास रितेशला मृत घोषित केले. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, जर हा प्रकार फूड पॉइझनिंगचा असता, तर संबंधित ठिकाणी वडापाव खाल्लेल्या इतर ग्राहकांनाही त्रास झाला असता, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र प्रशासनाकडून अद्याप ठोस भूमिका समोर आलेली नाही. उलट अन्न व औषध प्रशासनाकडून उघड्यावरील खाद्यपदार्थांवरील तपासण्या खरंच केल्या जातात का, की त्या केवळ कागदावरच असतात, असा संशय नागरिक व्यक्त करत आहेत.

> **अहवालांवर सगळ्यांचे लक्ष**
>
> रितेश मुडे याच्या मृतदेहाचे उत्तरिय तपासणी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात करण्यात आले. मायक्रो बायोलॉजी लॅबसाठी अन्ननलिकेच्या ट्रॅक व रक्ताचे नमुने, तर फॉरेन्सिक लॅबसाठी व्हिसरा व रक्ताचे नमुने पाठविण्यात आले आहेत. या अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होणार आहे.

> फूड पॉइझनिंग झाले असते तर किमान दोन-तीन जणांची प्रकृती बिघडली असती. तसे प्रथमदर्शनी दिसत नाही. अहवालानंतरच निष्कर्ष काढता येईल. उघड्यावरील खाद्यविक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासन नियमित तपासण्या करते आणि या घटनेनंतर विशेष मोहीम राबवली जाईल.
>
> – **प्रफुल्ल टोपले,** सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन, वर्धा

# दर तेच, खर्च दुप्पटः बोअरवेल चालकांचा जिल्हाभर एल्गार; ९ दिवसांपासून काम ठप्प

### -मागण्यांकडे सरकारचे दुर्लक्ष, संप कायम

**वर्धा जनमाध्यम :** महागाई आकाशाला भिडलेली असताना बोअरवेल दर मात्र वर्षानुवर्षे गोठलेलेच या अन्यायाविरोधात वर्धा जिल्ह्यातील सर्व बोअरवेल चालकांनी २६ जानेवारीपासून बेमुदत संप पुकारला असून जिल्ह्यात बोअरवेल खोदण्याचे काम पूर्णतः ठप्प झाले आहे. संपाला आज नववा दिवस उजाडला तरी मागण्यांवर कोणताही तोडगा न निघाल्याने चालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बोअरवेल वाहन मालक, चालक व एजंट यांच्यातील दरवाढीचा तिढा सुटत नसल्याने परिस्थिती चिघळली आहे. सध्या सर्व बोअरवेल वाहने महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या परिसरात उभी असून, हे ठिकाण आंदोलनाचे केंद्र बनले आहे. वर्धा जिल्हा बोअरवेल असोसिएशनचे



अविनाश वंजारी, राजेश वंजारी, अंकुश डगवार, आशीष आष्टणकर, सुनील तळवेकर, मनोज वरघणे, अनिल जावंदिया यांच्यासह मोठ्या संख्येने मालक रस्त्यावर उतरले आहेत. मालकांच्या म्हणण्यानुसार ४, ६ व ७ इंच बोअरवेलसाठी मिळणारे ९० ते १०० रुपये प्रती फूट दर अनेक वर्षांपासून बदललेले नाहीत. मात्र केसींग, डिझेल, साहित्य व मजुरीचे दर प्रचंड वाढले आहेत. एजंट परप्रांतीय चालकांशी संगनमत करून कमी दरात काम करून घेत असल्याचा आरोप करत बोअरवेलचे दर अनुक्रमे ११०, १२० व १३० रुपये प्रती फूट करण्याची ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी लावून धरली आहे.

### कायद्याच्याही दारात भयाचा पहारा

# चक्क पोलीस उपनिरीक्षकांच्या घरातच अस्वलाने ठोकला मुक्काम

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** तालुक्यातील बोरखेडी गावात दि. ४ रोजी पहाटे घडलेली घटना म्हणजे कायदा-सुव्यवस्थेलाही धोका देणारा थरार आहे. ज्याच्या खांद्यावर गावाची सुरक्षितता, त्याच पोलीस उपनिरीक्षक अक्षय भागानगरे यांच्या घरातच एका अस्वलाने थेट मुक्काम ठोकला आणि संपूर्ण गावाला तीन तास भीतीच्या छायेत ढकलले. अस्वल थेट पोलिस अधिकाऱ्याच्या घरात घुसते, ही बाब केवळ धक्कादायक नव्हे तर प्रशासनाच्या अपयशाची जिवंत साक्ष आहे.

आष्टी-कारंजा (घा.) मार्गावर सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या मध्यरात्रीच्या कामामुळे आणि बोरखेडी परिसरातील जांब नदीचे पाणी चोरून नेल्यामुळे जंगलातील पाण्याचे स्रोत पूर्णपणे आटले आहेत. जानेवारी ते मार्चदरम्यान पाणी असणारी जांब नदी कोरडी पडल्याने वन्यप्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येऊ लागले असून, त्याचे भयावह परिणाम आता उघडपणे दिसू लागले आहेत.



दि. ४ रोजी पहाटे अस्वल बोरखेडीतील हनुमान मंदिरासमोरील लोखंडी दरवाजाला जोरदार धडका देत असल्याचा आवाज आला. आवाज ऐकून ग्रामपंचायत सदस्य केशव कुंबरे बाहेर आले असता समोरच अस्वल उभे असल्याचे पाहून एकच खळबळ उडाली. कुत्र्यांच्या भुंकण्याच्या गोंधळात अस्वल पुढे सरकत थेट पोलीस उपनिरीक्षक अक्षय भागानगरे यांच्या घराच्या बांधकामस्थळी गेले आणि खोदून ठेवलेल्या खड्ड्यात पडले. तेथून बाहेर येत अस्वलाने उड्या मारत परिसर दणाणून सोडला.


आवाजामुळे झोपेतून जागे झालेले पोलीस उपनिरीक्षक भागानगरे यांनी समोर उभे अस्वल पाहताच तात्काळ गावचे पोलीस पाटील प्रणाली लोमटे यांना माहिती दिली. या दरम्यान अस्वल हनुमान मंदिराच्या दिशेने धावले आणि एका व्यक्तीच्या अंगावर झेप घेतल्याने काही क्षण जीव मुठीत धरावे लागले. हा सारा प्रकार पोलीस उपनिरीक्षकांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला.

घटनेची माहिती आष्टी वनविभागाचे वनपरीक्षेत्र अधिकारी उईके यांना देण्यात आली असली, तरी उशीरा जागे झालेले प्रशासन' असा आरोप गावकऱ्यांतून होत आहे. आज अस्वल पोलीस उपनिरीक्षकाच्या घरी शिरले, उद्या ते कुणाच्या घरात शिरेल असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कायदा हातात असतानाही जर घर सुरक्षित नसेल, तर सामान्य माणसाने जायचे कुठे हा प्रश्न आता संपूर्ण तालुक्यात घुमतो आहे.

# कार्यकर्त्यांचा गोतावळा सांभाळत मयुरा काळेंनी मिळवला 'महाराष्ट्र बिझनेस आयकॉन' अवॉर्ड

**मुंबई । वर्धा । जनमाध्यम** -खासदाराची पत्नी म्हणून केवळ व्यासपीठापुरती भूमिका न स्वीकारता, कार्यकर्त्यांचा गोतावळा, सामाजिक बांधिलकी आणि घर-संसार यांचा समतोल साधत स्वतःचा उद्योग उभा करणाऱ्या सौ. मयुरा अमर काळे यांच्या कर्तृत्वावर राज्यस्तरावरील सन्मानाची मोहोर उमटली आहे. त्यांच्या 'धरा अमृत' या शुद्ध तेल ब्रँडला महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड-२०२५ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सिने अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांच्या हस्ते देण्यात आला.



लाकडी घाण्यावर शुद्ध तेलनिर्मितीचा ध्यास घेत आधार उद्योगा'ची सुरुवात करणाऱ्या मयुराताईंनी बाजारात चाललेल्या भेसळीच्या गर्दीत शुद्धतेचा ठाम आग्रह धरला. गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता उभारलेला हा उद्योग अल्पावधीतच राज्यभर पोहोचला आणि ग्राहकांचा विश्वास मिळवत नावारूपास आला. त्यांच्या या ठाम भूमिकेची दखल घेत त्यांची महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्डसाठी निवड करण्यात आली.या सन्मान सोहळ्याला सिने अभिनेत्री सोनाली कुळकर्णी आणि वर्षा उसगांवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अजिंक्य अमर काळे हेदेखील उपस्थित होते.

# सेलूतील तरुणाने गळफास घेऊन संपवली जीवनयात्रा

**सेलू जनमाध्यम :** जोशीनगर परिसरात बुधवारी (दि. ४ फेब्रुवारी) एका ३८ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली. दिनेश रुयारकर असे मृत तरुणाचे नाव असून ते प्रभाग क्रमांक ६ मध्ये कुटुंबासह राहत होते. सकाळच्या सुमारास त्यांनी आपल्या राहत्या घरी हे टोकाचे पाऊल उचलले. घटनेची माहिती पसरताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. दिनेश यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी सेलू पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.



### रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू

# श्वास हॉस्पिटलमधील फार्मसीमध्ये एक्सपायरी औषधांची विक्री

### -बिलावर खोटी तारीख, हातात विष

**वर्धा । जनमाध्यम :** श्वास हॉस्पिटलमधील ' श्वास फार्मसी' रुग्णांना श्वास देण्याऐवजी थेट श्वास थांबवतोय का? असा प्रश्न उपस्थित करणारा एक्सपायरी औषधांचा धक्कादायक प्रकार रामनगर परिसरात उघडकीस आला आहे. मुदतबाह्य औषधे विकून बिलावर मात्र बनावट भविष्यकालीन एक्सपायरी तारीख छापून ग्राहकांची निर्लज्ज फसवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

रामनगर येथील एका नागरिकाने औषध खरेदीसाठी श्वास फार्मसीमध्ये भेट दिली असता त्याला मे २०२५ व जुलै २०२५ च्या एक्सपायर झालेली औषधे देण्यात आली. मात्र बिल देताना ऑगस्ट २०२८ अशी खोटी एक्सपायरी तारीख नमूद करण्यात आली. औषधावरील प्रत्यक्ष मुदत आणि बिलावरील नोंदीतील तफावत लक्षात येताच हा प्रकार उघड झाला. रुग्णांच्या डोळ्यात धूळफेक करून नफेखोरीचा घाणेरडा धंदा सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. औषध म्हणजे जीवदान; पण येथे नफ्यासाठी रुग्णांच्या जीवाशी सौदेबाजी सुरू असल्याचे भयावह वास्तव समोर आले आहे. मुदतबाह्य औषधांचे सेवन केल्यास गंभीर दुष्परिणाम, आजार बळावणे, जीव धोक्यात येण्याची शक्यता आरोग्य तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. प्रकरणाची गंभीर दखल घेत औषध प्रशासन सह आयुक्त निरज लोहकरे यांनी संबंधित फार्मसीवर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. दोषी आढळल्यास परवाना रद्द करण्यासह कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. या प्रकारामुळे वर्धा शहरात संतापाची लाट उसळली असून श्वास हॉस्पिटल रुग्णांचा श्वास वाचवते की थांबवते? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 3 लाख 96 हजारांहून अधिक उमेदवार नापास

## महा-टीईटीचा धक्कादायक निकाल !

**मुंबई / प्रतिनिधी-** उद्याच्या पिढीला घडवणा-या शिक्षकांची पात्रता ठरवणा-या महा-टीईटी परीक्षेचा २०२५ चा निकाल जाहीर झाला असून या निकालाने संपूर्ण शिक्षण क्षेत्राला मोठा धक्का दिला आहे. राज्यातील लाखो उमेदवारांनी अपेक्षेने दिलेल्या या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के उमेदवारच उत्तीर्ण झाले आहेत. तर तब्बल ३ लाख ९६ हजारांहून अधिक उमेदवार नापास ठरल्याने गुरु जीच नापास? असा सवाल उपस्थित होत आहे. राज्य परीक्षा परिषदेकडून जाहीर करण्यात आलेल्या माहितीनुसार, एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी महा-टीईटीसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवार प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित राहिले, तर सुमारे २८ हजार ९३९ उमेदवार गैरहजर राहिले. अंतिम निकालात फक्त ५० हजार ३६९ उमेदवार पात्र ठरले असून



उर्वरित ३ लाख ९६ हजार ३२५ उमेदवार अनुत्तीर्ण झाले आहेत. पेपर १ आणि पेपर २ या दोन्ही स्तरांवर नापासांचे प्रमाण चिंताजनक आहे. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी असलेल्या पेपर १ मध्ये २ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती. यामध्ये उपस्थित उमेदवारांपैकी केवळ सुमारे ११.४७ टक्केच यशस्वी झाले. पेपर २ म्हणजे इयत्ता सहावी ते आठवीसाठीच्या परीक्षेतही परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. या पेपरचा निकाल ११.१३ टक्क्यांवरच मर्यादित राहिला. माध्यमनिहाय आणि विषयनिहाय निकाल पाहिल्यासही मोठी तफावत दिसून येते. कन्नड माध्यमाचा निकाल तुलनेने चांगला असून तो १५ टक्क्यांच्या पुढे आहे. मराठी, हिंदी आणि तेलुगू माध्यमाचा निकाल सरासरीच्या आसपास आहे. मात्र उर्दू, इंग्रजी आणि विशेषतः गुजराती माध्यमाचा निकाल अत्यंत कमी टक्केवारीत आहे. गणित-विज्ञान आणि सामाजिक विज्ञान या विषयांमध्येही अपेक्षेपेक्षा कमी निकाल लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

# उधमपूरमध्ये चकमकीत जैशचे दोन दहशतवादी ठार

**श्रीनगर/वृत्तसंस्था :** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्याच्या डोंगराळ आणि जंगलातील भागात मंगळवारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये पुन्हा एकदा



चकमक सुरू झाली. ही कारवाई बुधवारसुद्धा सुरू राहिली, या दरम्यान सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. हे दहशतवादी जैश-ए-मोहम्मदशी संबंधित होते.माहितीनुसार, जम्मू-काश्मीर पोलीस, भारतीय सैन्य आणि सीआरपीएफने उधमपूरच्या बसंतगड भागात झालेल्या संयुक्त चकमकीत दोन दहशतवाद्यांना ठार केले. मंगळवारी सुरक्षा दलांना जिल्ह्याच्या रामनगर आणि बसंतगड दरम्यानच्या उंच आणि दुर्गम भाग चिगला बलोट्यात दहशतवाद्यांच्या संशयास्पद हालचालींची माहिती मिळाली होती. त्यानंतर सेना, सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्तरित्या विस्तृत शोधमोहीम सुरू केली.सुरक्षा दल पुढे जात असताना दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास जगरेडा परिसरातील घनदाट जंगलात लपलेले दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. सुरक्षा दलांनीही प्रत्युत्तर दिले आणि चकमक सुरू झाली.यानंतर संपूर्ण भागात हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आणि अतिरिक्त सुरक्षा दलांना घटनास्थळी बोलावण्यात आले. रात्रीपर्यंत दोन्ही बाजूंच्या गोळीबाराच्या बातम्या आल्या. पोलीस आणि सेनाधिका?यांनीही घटनास्थळी पोहोचून संपूर्ण ऑपरेशनचे निरीक्षण केले.दरम्यान, सैन्याच्या व्हाइट नाइट कोरने सांगितले की, गुप्त माहितीच्या आधारावर चालवण्यात येणा-या या संयुक्त मोहिमेला ऑपरेशन केया असे नाव देण्यात आले आहे. दहशतवाद्यांची उपस्थिती असल्याची माहिती मिळाल्यामुळे आधीपासूनच उधमपूर जिल्ह्याच्या डोंगराळ आणि जंगल भागात शोधमोहीम सुरू होती.

# पार्थ नव्हे जय पवार यांची राज्यसभेसाठी चर्चा?

**पुणे/प्रतिनिधी :** सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यापूर्वी राज्यसभेचा



राजीनामा दिला आहे. सुनेत्रा पवार यांच्या जागी त्यांचे पुत्र पार्थ पवार यांची वर्णी लागण्याची चर्चा सुरु असताना यात मोठा ट्विस्ट आला आहे. पार्थ यांच्या ऐवजी आता जय पवार यांना राज्यसभेवर पाठवले जाउ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळातून समोर येत आहे. पार्थ राज्यसभेच्या सहा वर्षे कार्यकाळासाठी इच्छुक असल्याने जय यांच्या नावाचा विचार केला जात असल्याची चर्चा सुरु आहे.दरम्यान, राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार पहिल्यांदाच दिल्ली दौरा करणार आहेत. सुनेत्रा पवार दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती राजकीय सूत्रांकडून समोर आली आहे. अजित पवार यांचा बारामती येथे झालेल्या विमान अपघातात मृत्यू झाला. अजित पवारांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे.

# वाढदिवस साजरा न करण्याचा मंत्री आकाश फुंडकर यांचा निर्णय


**अकोला/प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश



फुंडकर यांनी आपला उद्याचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.मंत्री फुंडकर म्हणाले की, 'राज्याने आपला एक जननायक आणि ज्येष्ठ मार्गदर्शक गमावला आहे, अशा संकटकाळात कोणताही आनंदोत्सव साजरा करणे माझ्या मनाला कदापि पटणारे नाही.' स्व. अजित पवार यांच्याप्रती आदर आणि श्रद्धांजली म्हणून त्यांनी सर्व नियोजित कार्यक्रम तातडीने रद्द केले आहेत.मंत्री महोदयांनी आपल्या समर्थक आणि कार्यकर्त्यांसाठी विशेष सूचना जारी केल्या आहेत. वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचे कोणतेही बॅनर, पोस्टर्स किंवा जाहिराती लावू नयेत. हार, पुष्पगुच्छ किंवा मिठाई घेउन कोठेही एकत्र येउ नये. उद्या मंत्री महोदय स्वत? मतदारसंघात उपस्थित राहणार नाहीत.कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारचे प्रदर्शन न करता साधेपणा पाळावा आणि या राष्ट्रीय दु?खात सहभागी व्हावे, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे.

# अजित पवार यांच्या अस्थींचे काटेपूर्णा प्रकल्पात विसर्जन

**अकोला/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थींचे विसर्जन अकोला जिल्ह्यातील वाघा येथील काटेपूर्णा प्रकल्पात करण्यात आले. राष्ट्रवादी



काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्या सहकुटुंब या अस्थींचे विधीवत विसर्जन केले.या वेळी धार्मिक विधी पार पाडण्यात आले असून संपूर्ण वातावरण शोकमय झाले होते. अस्थी विसर्जनाच्या वेळी आमदार अमोल मिटकरी यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांना भावनांना आवर घालणे कठीण झाले होते. दिवंगत नेत्याच्या आठवणींनी उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले. अजित पवार यांच्या निधनाने राज्यात शोककळा पसरली असून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी विविध ठिकाणी श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. काटेपूर्णा प्रकल्पात पार पडलेले हे अस्थी विसर्जन भावनिक क्षणांचे साक्षीदार ठरले.तर अजित पवारांची महाराष्ट्रासाठी बघितलेली स्वप्न अस्थी विसर्जन सोबतच विसर्जित झाल्याची भावना यावेळी अमोल मिटकरींनी व्यक्त केली. तर या घटनेचा गूढचा उलगडा जोपर्यंत होत नाही तो पर्यंत आपण लढा देणार असल्याचंही ते म्हणाले.

# एक्सप्रेसवेवर गॅस टँकर उलटला; 16 तासांनंतरही वाहतूक ठप्प

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर गॅस टँकर उलटून झालेल्या अपघातानंतर तब्बल १६ ते १८ तास उलटूनही रस्ता वाहतुकीसाठी बंदच आहे. या अपघातामुळे एक्सप्रेसवेवर हजारो वाहने अडकली असून दोन्ही बाजूंनी



प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. अपघातस्थळाजवळ रात्रीभर वाहने रस्त्यावरच उभी राहिली. त्यामुळे महिला आणि लहान मुलांसह प्रवाशांना अन्न, पाणी किंवा शौचालयाची कोणतीही सुविधा नसताना तासन्तास अडकून राहावे लागले. वाहतूक व्यवस्थेतील गोंधळामुळे सकाळपर्यंत ही कोंडी तब्बल १२ किलोमीटरपेक्षा जास्त लांब पसरली होती. अधिका-यांनी सांगितले की टँकरमधून अजूनही ज्वलनशील प्रोपिलीन वायूची गळती सुरू आहे. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि बीपीसीएलच्या पथकांना तैनात करण्यात आले आहे. सामान्य वाहतुकीला परवानगी देण्यापूर्वी ही कारवाई सायंकाळपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. महामार्ग वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना आवाहन केले आहे की, वाहतूक सुरळीत होईपर्यंत एक्सप्रेसवेवर प्रवास टाळावा. एक्सप्रेसवे नियंत्रण कक्षाच्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी सुमारे ५ वाजता महामार्गावर हा गॅस टँकर उलटला. एका अधिका-यांनी सांगितले की रायगड जिल्ह्यातील आदोशी बोगद्याजवळ उतारामुळे टँकरवरील नियंत्रण सुटले आणि तो पलटी झाला. अपघातानंतर तात्काळ टँकरमधून वायूची गळती सुरू झाली.

# अजित पवारांच्या अस्थी विसर्जनासाठी देशव्यापी कलश यात्रा

**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसने देशव्यापी कलश यात्रेचे आयोजन केले असून ही यात्रा काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या देशातील प्रमुख पवित्र नद्या आणि धार्मिक स्थळांवर अस्थी विसर्जित केल्या जाणार आहेत.दरम्यान या अस्थी कलश यात्रेच्या माध्यमातून देशभरातील लाखो समर्थकांना अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्याची संधी मिळणार आहे.मंगळवारी बारामती येथील निवासस्थानी विधिवत पूजा झाल्यानंतर पार्थ अजित पवार यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पदाधिका-यांकडे अस्थिकलश सुपूर्द केले.आदरणीय अजितदादा हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते तर त्यांच्या विचारसरणीला आणि नेतृत्वाला संपूर्ण देशाने स्वीकारले होते. देशभरातील त्यांच्या असंख्य समर्थकांना व कार्यकर्त्यांना वेळेअभावी बारामती येथे अंतिम दर्शन घेता आले नव्हते. त्यामुळे दादांच्या अस्थीचे दर्शन घेण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लोकं प्रतिक्षा करत आहेत.



या अस्थी कलश यात्रेच्या माध्यमातून राष्ट्रवादी युवक काँग्रेस आदरणीय अजितदादा यांना अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करत असून त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा प्रसार देशाच्या कानाकोप-यात करण्याचा संकल्प केला असल्याची माहिती पार्थ पवार यांनी यावेळी दिली.

या अस्थी कलश यात्रेची सुरु वात दिल्ली येथील मुख्यालयात पूजन करून करण्यात येणार असून, त्यानंतर हे अस्थीकलश संपूर्ण देशभर पाठवले जाणार आहे. ही अस्थी कलश यात्रा आजपासून ४ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत पार पडणार आहे. या कालावधीत अस्थी कलश यात्रा देशाच्या १० हून अधिक राज्यातून प्रवास करणार आहे. यात्रेची विधिवत सुरुवात देवभूमी उत्तराखंडमधील हरिद्वार येथील हर की पौडी आणि उत्तरप्रदेशातील तीर्थराज प्रयागराज येथील पवित्र संगमापासून करण्यात येणार आहे. याशिवाय, वाराणसीतील मणिकर्णिका घाट, बिहारची राजधानी पटना, झारखंड, पंजाब, काश्मीर, कन्याकुमारी यासह अनेक राज्यामध्ये अस्थीचे विसर्जन आणि शोकसभा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या कलश यात्रेत उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, पंजाब, जम्मू-काश्मीर आणि तामिळनाडूसारख्या राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांवर अस्थी विसर्जन करण्यात येणार आहे. या माध्यमातून अजितदादांच्या विकासकार्यांचा, शेतकरी हिताच्या धोरणांचा आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचा प्रसार केला जाणार आहे. या अस्थी कलश यात्रेचे नेतृत्व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा करणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या कार्यक्रमाचे नियोजन करत आहेत.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात एकाचवेळी 4500 रूपये

## सरकारच्या महिलांना दिलासा

**मुंबई :** राज्यातील महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहीण योजनेतील लाभार्थीना मोठा दिलासा देणारी माहिती महिला व बालविकास विभागाकडून समोर आली आहे. ई-केवायसी प्रक्रियेमुळे अनेक महिलांचे थकित राहिलेले तीन महिन्यांचे हप्ते आता एकत्रित स्वरूपात देण्याचा निर्णय सरकारने घेतला सध्या सुरू आहे. यामुळे लाभार्थीची माहिती तपासून योग्य पात्र महिलांपर्यंत लाभ पोहोचवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. या सर्व प्रक्रियेनंतर आता थकित हप्ते एकत्र देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयानुसार पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट ४५०० रुपये जमा केले




असल्याचे कळत आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या योजनेत राज्यातील महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. या योजनेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम मानला जातो. निवडणुकीत या योजनेचा महायुती सरकारला राजकीय लाभ झाल्याचेही चित्र दिसून आले. मात्र, ई-केवायसी प्रक्रियेमुळे अनेक लाभार्थीना नियोजित वेळेत हप्ते मिळाले नाहीत, त्यामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

ई-केवायसी पूर्ण न झाल्यामुळे अनेक महिलांचे हप्ते थांबले होते. काही महिलांनी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया पूर्ण करूनही त्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नव्हते. त्यामुळे महिलांनी संबंधित कार्यालयांमध्ये जाउन नाराजी व्यक्त केली. काही ठिकाणी तर लाभार्थी महिला रस्त्यावर उतरून आंदोलन करतानाही दिसून आल्या. पैसे का येत नाहीत, याबाबत स्पष्टता नसल्याने महिलांमध्ये संभ्रम आणि असंतोष वाढत होता.

**स्थानिक खाद्यपदार्थ-**या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाने संबंधित अधिका-यांना लाभार्थी महिलांच्या घरी जाउन चौकशी करण्याचे आदेश दिले होते. नियम आणि अटी डावलून सादर झालेल्या अर्जांची पडताळणी जाणार आहेत. ज्यांचे नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांचे हप्ते थकले होते, त्यांना जानेवारीसह एकत्रित रक्कम दिली जाईल. तर काही महिलांना यापूर्वीच दोन महिन्यांचे हप्ते मिळाले असल्यास, त्यांना जानेवारी महिन्याचा एकच हप्ता देण्यात येणार आहे. या संदर्भातील वृत्त एका मराठी वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे. या निर्णयामुळे लाभार्थी महिलांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने निर्माण झालेला तणाव कमी होणार असून, महिलांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी आर्थिक मदत वेळेत मिळणार आहे. सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रशासन आणि लाभार्थी यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**२१०० रुपये करण्याची शक्यता**

दरम्यान, निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार भविष्यात या योजनेतील मासिक हप्ता १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उदय सामंत यांनी जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारावेळी यासंदर्भात संकेत दिले होते. हा निर्णय प्रत्यक्षात आल्यास राज्यातील लाखो महिलांना अधिक आर्थिक आधार मिळेल आणि लाडकी बहीण योजना अधिक प्रभावी ठरेल, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# रब्बी हंगामासाठी राज्याला 31 .35 लाख मेट्रिक टन खतांचा पुरवठा मंजूर

**पुणे/प्रतिनिधी :**केंद्र सरकारने राज्याला यंदाच्या रब्बी हंगामासाठी ३१ लाख ३५ हजार मेट्रिक टन खतांचा पुरवठा मंजूर केला असून त्यानुसार सुरळित खतपुरवठा सुरु आहे. मंजूर पुरवठ्यातील दोन महिन्यांचा खत पुरवठाही होणे बाकी असून खतांची मुबलकता असल्याची माहिती कृषी विभागाचे संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) अशोक किरनळ्ळी यांनी दिली. त्यामुळे शेतक-यांना खतांच्या उपलब्धतेची कोणतीही अडचण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मागील तीन वर्षे म्हणजे हंगाम २०२२-२३ मध्ये २७.०४ लाख मे.टन, २०२३-२४ मध्ये २०.०१ लाख मे.टन आणि २०२४-२५ मध्ये २८.२० लाख मेट्रिक टनाइतक्या खतांचा प्रत्यक्ष वापर झाला होता. तर मागील या तीनही वर्षातील खतांचा सरासरी वापर २५ लाख ८ हजार मेट्रिक टनाइतका राहिला आहे. याचा विचार यंदाच्या २०२५-२६ मध्ये मंजूर झालेला कोटा सर्वाधिक आहे.रब्बी हंगाम दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी सुरु झाला. त्यावेळी राज्यात प्रत्यक्षात निविष्ठा विक्रेत्यांकडे १५ लाख ७४ हजार मेट्रिक टनांइतकी खतांची उपलब्धता होती.

मंजूर झालेला खत पुरवठा ३१ लाख ३५ हजार मेट्रिक टन आहे.म्हणजेच रब्बी हंगामासाठी एकूण उपलब्धता ४७ लाख ९ हजार मेट्रिक टनाइतकी मुबलक अपेक्षित आहे. प्रत्यक्षात आत्तापर्यंत या उपलब्धतेतून खतांची प्रत्यक्षात विक्री २१ लाख ५ हजार मेट्रिक टनाइतकी झाली आहे.तसेच सद्य:स्थितीत आजअखेर १९ लाख १६ हजार मे.टनाइतकी खतांची प्रत्यक्ष उपलब्धता आहे. तसेच फेबुवारी आणि मार्च महिन्यात मंजूर कोट्यापैकी आणखी ७.५० लाख मे.टन खतांचा पुरवठा होणे अपेक्षित आहे. याचा विचार करता खतांची मुबलक उपलब्धता असल्याचेही किरनळ्ळी यांनी सांगितले.

# रायफल-पिस्तूल आशियाई अजिंक्यपद स्पर्धा : ईशा सिंगला सुवर्णपदक

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था :** करणी सिंग शूटिंग रेंज येथे सुरू असलेल्या आशियाई अजिंक्यपद रायफल-पिस्तूल स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवली. बुधवारी, ईशा सिंगने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. तर विद्यमान विस्वविजेत्या सम्राट राणाने पुरु षांच्या गटात कांस्यपदकाची कमाई केली.






महिलांच्या अंतिम फेरीत ईशा सिंगने २३९.८ गुणांसह वर्चस्व गाजवले. तिने चिनी तैपेईच्या येन-चिंग चेंगला ४.४ गुणांनी हरवले, ज्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. चेंगची देशबांधव आय-वेन यू (२१७.७) तिस-या स्थानावर राहिली. भारताची सुरु ची सिंग १९७.७ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिली आणि दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती मनू भाकर १३५.३ गुणांसह सातव्या स्थानावर राहिली. पात्रता फेरीत, सैन्यमने पात्रता फेरीत ५८४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले, परंतु ती फक्त रँकिंग गुणांवर स्पर्धा करत होती. यामुळे सुरु ची (५७६), मनु भाकर (५७५-२० गुण) आणि एशा (५७५-१८ गुण) यांना आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत प्रवेश करता आला. १७२६ गुणांसह, भारतीय महिला संघाने सांघिक स्पर्धेतही सुवर्णपदक जिंकले. पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत, विश्वाविजेत्या सम्राट राणाने २२०.३ गुणांसह कांस्यपदक जिंकले. उझबेकिस्तानच्या व्लादिमीर स्वेचनिकोव्ह (२४२.०) ने सुवर्णपदक जिंकले, तर कझाकस्तानच्या व्हॅलेरी राखिमझान (२४१.०) ने रौप्यपदक जिंकले. भारताचा शरावण कुमार १९८.६ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिला, परंतु पदक मिळविण्यापासून तो थोडक्यात वंचित राहिला. सांघिक स्पर्धेत, शरावण कुमार, सम्राट राणा आणि वरुण तोमर या त्रिकुटाने एकूण १७३२ गुणांसह भारतीय पुरु ष संघासाठी रौप्यपदक मिळवले. सहा अतिरिक्त इनर-१० च्या आधारावर समान गुण असूनही उझबेकिस्तानने सुवर्णपदक जिंकले, तर कझाकस्तानला कांस्यपदक मिळाले. पात्रता फेरीतही एक मनोरंजक परिस्थिती पाहायला मिळाली. रँकिंग प?इंट्समध्ये एकमेव शूटर सुभाष सिहागने ५८५ गुणांसह सर्वोत्तम भारतीय गुण नोंदवले. सम्राट राणा ५८१ गुणांसह चौथ्या, शरावण कुमार ५७८ गुणांसह आठव्या, तर वरुण तोमर ५७३ गुणांसह १५ व्या स्थानावर राहिला.

# क्रिकेटच्या एकूण 73 नियमांमध्ये बदल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**२०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या अगदी आधी, क्रिकेट जगताशी संबंधित काही नियम बदलले आहेत. मेरीलेबोन क्रिकेट क्लब (एमसीसी) ने हे बदल जाहीर केले आहेत. हे नियम चेंडूचा आकार, बॅट डिझाइन, हिट विकेटची व्याख्या, अपूर्ण धावा आणि बहु-दिवसीय क्रिकेटमध्ये दिवसाच्या शेवटच्या षटकाशी संबंधित आहेत. हे नवीन नियम १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होतील, जरी त्यापैकी काही आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आधीच स्वीकारले आहेत. एमसीसीने म्हटले आहे की, सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ओपन-एज क्रिकेटमध्ये लॅमिनेटेड बॅटची मान्यता. यामुळे वाढत्या महागड्या बॅटची समस्या दूर होईल. शिवाय, महिला आणि कनिष्ठ क्रिकेट आता वेगवेगळ्या आकाराच्या आणि वजनाच्या चेंडूंसह खेळू शकतील. आतापर्यंत, एकाच चेंडूचा आकार वापरला जात होता.

**युनियर आणि महिला क्रिकेटमध्ये चेंडूचा आकार आणि वजनात बदल-** ज्युनियर आणि महिला क्रिकेटसाठी चेंडूचा आकार आता वेगळा असेल. परिणामी, क्रिकेट चेंडू आकार १, आकार २ आणि आकार ३ मध्ये येतील. आकार १ हा पुरु षांच्या क्रिकेटमध्ये वापरला जाणारा चेंडू असेल. महिला आणि मुलांचे हात प्रौढ पुरु षांपेक्षा लहान असल्याने हे पाउल उचलण्यात आले, ज्यामुळे हा चेंडू त्यांच्यासाठी अयोग्य ठरतो.

**लॅमिनेटेड बॅटना परवानगी-** बॅटच्या वाढत्या किमतीला आळा घालण्यासाठी, एमसीसीने आता ओपन-एज क्रिकेटमध्ये



लॅमिनेटेड बॅटना वापरण्यास परवानगी दिली आहे. अशा बॅट लाकडाच्या तीन तुकड्या वापरू शकतात. हे देखील निश्चित करण्यात आले आहे की लॅमिनेटेड बॅटना कामगिरीचा कोणताही फायदा मिळत नाही. तथापि, खेळाच्या सर्वोच्च स्तरावर, बॅट लाकडाच्या एकाच तुकड्यापासून बनवल्या जातील.

**दिवसाच्या खेळाचे शेवटचे षटक विकेट पडल्यावर संपणार नाही-**दिवसाच्या खेळाचा शेवटचा षटक फलंदाज बाद झाल्यावर संपणार नाही. त्या षटकातील उर्वरित सर्व चेंडू टाकले जातील. त्यानंतरच दिवसाचा खेळ संपेल. दिवसाच्या शेवटच्या षटकात जेव्हा विकेट पडते तेव्हा सामना थांबवला जातो. यामुळे अनेकदा गोलंदाजी करणा-या संघाला मिळू शकणा-या फायद्यापासून वंचित राहावे लागते.

**जाणूनबुजून अपूर्ण धावा केल्या तर दंडात्मक कारवाई-** आयसीसीने आधीच हा नियम स्वीकारला आहे. पण, एमसीसीने आता हा नियम स्पष्ट केला आहे. या अंतर्गत, जर एखाद्या फलंदाजाने जाणूनबुजून अपूर्ण धावा केल्या तर क्षेत्ररक्षक संघ कोणता फलंदाज स्ट्राईक करेल हे ठरवू शकेल. यामुळे फलंदाजी करणा-या संघाला बेकायदेशीर फायदा घेण्यापासून रोखता येईल.

**वारंवार सीमा ओलांडून झेल घेणे आता बेकायदेशीर-** आयसीसीने आधीच हा नियम स्वीकारला होता. या अंतर्गत, जर सीमारेषेजवळील क्षेत्ररक्षक झेल घेण्याचा प्रयत्न करत असेल आणि सीमारेषा ओलांडत असेल तर त्याला झेल परत मैदानात घेण्याची फक्त एकच संधी असेल. तो चेंडू वारंवार सीमारेषेवरून उडी मारून मैदानात परत ढकलू शकत नाही, जरी तो सीमारेषेच्या बाहेर हवेत असला तरीही. त्याला स्वतः झेल घेण्याची किंवा त्याच्या सहका-याला पास करण्याची फक्त एकच संधी असेल.

**ओव्हरथ्रोची व्याख्या बदलली**

एमसीसीने ओव्हरथ्रोची व्याख्या बदलली आहे. याअंतर्गत, जर एखाद्या क्षेत्ररक्षकाने रन आउट किंवा धाव रोखण्यासाठी स्टंपवर फेकले आणि चेंडू कोणत्याही क्षेत्ररक्षकाने तो रोखण्याचा प्रयत्न न करता पुढे गेला, तर तो ओव्हरथ्रो असेल. जर क्षेत्ररक्षकाने थ्रोनंतर चेंडू थांबवण्याचा प्रयत्न केला पण तरीही तो पुढे गेला, तर तो मिसफील्ड मानण्यात येईल.

# रशिया-अमेरिका अणु करार 50 वर्षात प्रथमच संपुष्टात येणार

**मॉस्को /वृत्तसंस्था :** अमेरिका आणि रशिया यांच्यातील उरलेला शेवटचा अण्वस्त्र नियंत्रण करार न्यू स्टार्ट येत्या ५ फेब्रुवारी रोजी संपुष्टात येणार आहे. यानंतर जगातील सर्वात मोठ्या दोन अण्वस्त्र साठ्यांवर कोणतीही मर्यादा राहणार नाही. गेल्या ५० वर्षांहून अधिक काळात प्रथमच अशी परिस्थिती निर्माण होत आहे. या कराराच्या समाप्तीमुळे अनेक तज्ज्ञांना भीती आहे की आता अण्वस्त्रांची अनियंत्रित शर्यत सुरू होउ शकते, ज्यामुळे जागतिक अस्थिरता वाढेल आणि जग अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर उभे राहू शकते.



रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये प्रस्ताव दिला होता की, अमेरिका देखील सहमत असल्यास या करारातील मर्यादांचे पालन आणखी एक वर्ष केले जाईल. मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याबाबत कोणतीही स्पष्ट बांधिलकी व्यक्त केलेली नाही. ट्रम्प यांनी अनेकदा सांगितले आहे की त्यांना अण्वस्त्रांवर मर्यादा हव्या आहेत, पण त्यात चीनलाही सामील करायचे आहे. व्हाइट हाउसच्या एका (नाव न सांगणा-या) अधिका-याने सांगितले की ट्रम्प योग्य वेळी निर्णय घेतील. दरम्यान, चीनने आपल्या तुलनेने लहान पण वाढत्या अण्वस्त्र साठ्यावर कोणत्याही प्रकारच्या निर्बंधांना नकार दिला आहे.

क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेसकोव यांनी म्हटले आहे की अमेरिका आणि रशियाच्या अण्वस्त्र साठ्यांवर मर्यादा नसल्यास जग अधिक धोकादायक बनेल. आर्म्स कंट्रोल असोसिएशनचे कार्यकारी संचालक डॅरिल किम्बाल यांनी इशारा दिला आहे की या कराराच्या समाप्तीमुळे दोन्ही देशांना ३५ वर्षांनंतर प्रथमच तैनात अण्वस्त्रांची संख्या वाढवण्याची मुभा मिळेल. यामुळे अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यात तिहेरी आणि अनियंत्रित अण्वस्त्र शर्यत सुरू होउ शकते. कोणताही करार नसल्यास दोन्ही बाजू सर्वात वाईट परिस्थिती ची तयारी करतील, ज्यामुळे अण्वस्त्र तैनाती वाढेल आणि अणुयुद्धाचा धोका अधिक तीव्र होईल.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील काही गटांमध्ये मतदारांची थेट उज्जैन यात्रा घडवण्यात आली. त्याचे फलक गावोगाव लागले होते. असे असताना आचारसंहिता लागू होण्याच्या आधी हे घडल्यामुळे यंत्रणा डोळ्यावर कातडे ओढून बसली होती. मतांची अशाप्रकारची खरेदी लोकशाहीवर गंभीर परिणाम घडवते. प्रथम, प्रामाणिक आणि सक्षम उमेदवार मागे पडतात, कारण त्यांच्याकडे प्रचंड पैसा नसतो. दुसरे म्हणजे, निवडून आलेले प्रतिनिधी जनतेला जबाबदार राहत नाहीत. कारण त्यांनी मत विकत घेतलेले असते. तिसरे म्हणजे, भ्रष्टाचार वाढतो. निवडणुकीत खर्च केलेला पैसा वसूल करण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब केला जातो. लोकशाही प्रक्रियेत केंद्र आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणे महापालिका निवडणुकाही अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शहरांच्या कारभाराशी थेट संबंधित असलेल्या या निवडणुकांमध्ये नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो; मात्र अलीकडच्या काळात महापालिका निवडणुकांमध्ये भेटवस्तूंचे वाटप ही एक गंभीर समस्या बनली आहे. ही प्रथा केवळ कायद्याला आव्हान देणारी नसून लोकशाही मूल्यांनाही धक्का देणारी आहे. महापालिका निवडणुकांमध्ये उमेदवार किंवा राजकीय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या भेटवस्तू वाटतात. यामध्ये साडी, भांडी, किराणा साहित्य, मोबाइल फोन, रोख रक्कम, कूपन्स तसेच काही वेळा मद्य किंवा जेवणाची व्यवस्था यांचा समावेश असतो. या भेटवस्तूंचा उद्देश मतदारांच्या मतांवर प्रभाव टाकणे हाच असतो. सत्तराव्या दशकात मतदारांना पैसे वाटण्याची कुप्रथा सुरू झाली. सुरुवातीची तीस वर्षे ही प्रथा ठराविक लोकांपुरती आणि ठराविक भागांपुरती मर्यादित होती; परंतु अलीकडच्या दोन दशकांमध्ये या प्रथेचे वेगाने सार्वत्रिकीकरण झाले आहे. लोकशाही वस्त्रहीन अवस्थेत दीनवाणी उभी असल्याचे चित्र मतांच्या बाजारातून व्यक्त होत आहे. उच्चभ्रू सोसायट्यांमध्येही मतांचा भाव होतो, हे आता उघड सत्य आहे. मतासाठी शंभर रुपये ते पाचशे रुपये भाव फुटतो, तेव्हा मध्यमवर्ग त्यापासून दूर राहतो; परंतु आता मतासाठी एक हजारांपासून पन्नास हजारांपर्यंत पैसे दिले जातात, तेव्हा सर्वांच्याच तोंडाला पाणी सुटते. शिवाय आपण पैसे घेतले नाही, तरी संबंधित व्यक्ती निवडून आल्यानंतर गैरव्यवहार करणार, निकृष्ट कामे करणार; त्यामुळे आपण तरी

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# लोकशाहीतील कुप्रथा

अपवाद का रहायचे, असा विचार करणाऱ्यांचे प्रमाण दुर्दैवाने वाढते आहे. महापालिका ही शहरांच्या प्रशासनाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वाहतूक यासारख्या मूलभूत नागरी सुविधा महापालिकेच्या अखत्यारित येतात. त्यामुळे महापालिकेतील लोकप्रतिनिधी हे सक्षम, प्रामाणिक आणि लोकहिताची जाण असलेले असणे अपेक्षित असते; परंतु उमेदवार मतांची खरेदी करून निवडून येतात, तेव्हा त्यांचा मुख्य उद्देश जनतेची सेवा नसून निवडणुकीत खर्च केलेला पैसा परत मिळवणे हाच असतो. निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू करून रोख रक्कम, मौल्यवान वस्तू आणि प्रलोभनांवर बंदी घातली आहे; तरीही प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये अनेक त्रुटी दिसतात. निवडणूककाळात मोठ्या प्रमाणावर पैसा जप्त होतो; पण त्यानंतर दोषींवर क्वचितच कठोर कारवाई होते. यामुळे उमेदवारांमध्ये कायद्याची भीती उरत नाही. अनेकदा लाखो रुपयांची रक्कम जप्त केली जाते, पुढे तिचे काय होते, हे कळत नाही. अहिल्यानगरमध्ये मतदानाच्या आधी एका मताला सात हजार रुपये भाव निघाला, पिंपरी-चिंचवडमध्ये तर एकेका मतासाठी तब्बल १५ हजार रुपये वाटण्यात आले. छत्रपती संभाजीनगर एका प्रभागात तर एका मताला पन्नास हजार रुपये देण्यात आल्याचे स्वयंसेवी संस्थांना आढळले असेल, तर आपली लोकशाही कुठे चालली आहे, असा प्रश्न पडतो. मतदारांना देवदर्शनाला घेऊन जाणे, पुण्यात वॉशिंग मशीनचे वाटप करणे असे प्रकार घडले. लोकशाही व्यवस्थेत मतदाराने उमेदवाराची कार्यक्षमता, प्रामाणिकपणा, विकासाचे धोरण आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी या आधारांवर मतदान करणे अपेक्षित असते; मात्र भेटवस्तूंच्या वाटपामुळे निवडणूक प्रक्रिया विकृत होते. योग्य आणि सक्षम उमेदवाराऐवजी अधिक खर्च करणारा उमेदवार निवडून येण्याची शक्यता वाढते. याचा थेट परिणाम प्रशासनाच्या गुणवत्तेवर होतो. भेटवस्तूंचे वाटप हे कायद्याने गुन्हा मानले गेले आहे. निवडणूक लढवण्यासाठी प्रचंड पैसा खर्च होतो आणि निवडून आल्यानंतर हा खर्च वसूल करण्याची प्रवृत्ती वाढते. याचा फटका सामान्य नागरिकांना बसतो, कारण विकासकामांची गुणवत्ता घसरते आणि सार्वजनिक निधीचा गैरवापर होतो. या समस्येचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होणे. सगळेच नेते पैसे देऊन निवडून येतात अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण होते. त्यामुळे अनेक सुशिक्षित नागरिक मतदानाकडे पाठ फिरवतात. मतदानाची टक्केवारी कमी होते आणि लोकशाही अधिक कमकुवत होते. मतांची खरेदी रोखण्यासाठी अनेक पातळ्यांवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, मतदारांमध्ये जनजागृती करणे महत्त्वाचे आहे. शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, माध्यमे आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यामध्ये सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. दुसरे म्हणजे, निवडणूक आयोगाने अधिक कठोर आणि प्रभावी कारवाई केली पाहिजे. दोषी उमेदवारांवर तत्काळ कारवाई, निवडणूक रद्द करणे आणि अपात्र ठरवणे यासारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. तिसरे म्हणजे, राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवारांना संधी देणे, निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि अंतर्गत शिस्त पाळणे आवश्यक आहे. चौथे म्हणजे, नागरिकांनी स्वतःचा स्वाभिमान जपला पाहिजे. क्षणिक फायद्यासाठी मत विकणे म्हणजे स्वतःच्या शहराच्या भवितव्याशी तडजोड करणे हे प्रत्येक मतदाराने ओळखले पाहिजे. महापालिका निवडणुकीत मतांची खरेदी ही लोकशाहीसाठी अत्यंत घातक प्रथा आहे. ती थांबवणे केवळ सरकार किंवा निवडणूक आयोगाचे काम नाही, तर प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. स्वच्छ, पारदर्शक आणि नैतिक निवडणूक प्रक्रिया राबवली गेली, तरच खऱ्या अर्थाने लोकशाही मजबूत होईल आणि शहरांचा सर्वांगीण विकास साध्य होईल.

# बियाणे विधेयक कुणाच्या फायद्याचे

**केंद्र सरकारने नवे बियाणे विधेयक येऊ घातले आहे. यातील तरतुदी शेतकऱ्यांच्य हक्कांवर गदा आणणाऱ्या असून कॉर्पोरेटकेंद्री असल्याचे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे. या विधेयकात नेमके काय असेल, त्याचा हा ऊहापोह...**

केंद्र सरकारने नवे बियाणे विधेयक अस्तित्वात आणण्याच्या हालचालींना वेग दिला आहे. भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या विभागाने बियाणे विधेयक, २०२५ चा मसुदा तयार केला आहे. सध्याचा बियाणे कायदा १९६६ आणि बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ च्या जागेवर हा कायदा येऊ घातला आहे.

बाजारात उपलब्ध बियाणे आणि लागवड साहित्याच्या गुणवत्तेचे नियमन करणे, शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात उच्च-गुणवत्तेच्या बियाणांची उपलब्धता करणे, बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांच्या विक्रीला आळा घालणे, नुकसानीपासून शेतकऱ्यांना आरक्षण देणे, नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन आणि जागतिक वाणांना वाव मिळवून देण्यासाठी बियाणे आयात सुलभ करणे यासाठी हा कायदा आणला जात असल्याचा सरकारचा दावा आहे.

हा दावा व विधेयकातील तरतुदी यामध्ये मोठी विसंगती असल्याचे मत विविध शेतकरी संघटनांनी तसेच कृषी अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. अखिल भारतीय किसान सभेने याबाबत याबाबतचे आक्षेप सरकारकडे अधिकृतरीत्या नोंदविले आहेत. देशभरातून अक्षरशः हजारो आक्षेप नोंदविले गेल्याने बियाणे विधेयक विवादास्पद ठरू शकतात.

**शेतकऱ्यांचे अधिकार**

शेतीतून प्राप्त झालेले अनुभव, ज्ञान आणि बौद्धिक संपदेवर शेतकऱ्यांचा अधिकार आहे. बियाण्यांचे उत्पादन, संरक्षण, लागवडीसाठी आदानप्रदान, बियाणे उगविणे, लागवड, पुनर्लागवड, बियाणे संरक्षित करणे, उपयोगात आणणे, वाटणे किंवा विकणे हा शेतकऱ्यांचा नैसर्गिक हक्क आहे. मात्र सरकारच्या कॉर्पोरेटकेंद्री धोरणामुळे या अधिकारावर हल्ले होत आले आहेत. भारतीय शेतीमध्ये बियाणे मुख्यतः सरळ वाण पद्धतीने वापरात होते तेव्हा बियाण्यांवरील खर्च मयादित होता. अन्नधान्याच्या कमतरतेवर मात करून स्वयंपूर्ण होण्याच्या गरजेपोटी झालेल्या हरित क्रांती काळातही बियाण्यांच्या किमती शेतकऱ्यांना परवडतील याची विशेष काळजी घेतली जात होती. विविध कीटक, रोगराईपासून बचाव होईल व त्याद्वारे शेतकऱ्यांचा कीटकनाशके व औषधांवरील खर्च सीमित राहील, याचीही काळजी घेतली जात होती. प्रतिकूल हवामानात पिके तग धरतील व चांगले उत्पादन देतील, असे वाण सरकारी कृषी विद्यापीठे, संशोधन केंद्रे आणि संस्थांमधून उपलब्ध केले जात होते. नवे बियाणे, खते, कीटकनाशके, सिंचन साधने, वाहतूक साधने व तंत्रज्ञान कसे वापरायचे याचे मोफत प्रशिक्षणही शेतकऱ्यांना दिले जात होते. शेतकरी जगला तरच अन्नधान्य निर्मितीत स्वयंपूर्ण होता येईल याचे



भान त्या वेळी ठेवले गेले.

१९९१ नंतर मात्र सगळाच मामला बदलला. भूक भागविण्याऐवजी नफा कमाविण्यासाठी शेती हे सूत्र स्वीकारले गेले. हा नफा शेतकऱ्यांना नव्हे तर कॉर्पोरेट कंपन्यांना मिळेल हे सुनिश्चित करणारी धोरणे घेण्यात आली. बियाणे क्षेत्रातील संशोधने त्याच दिशेने झाली. सरळ वाणे संपुष्टात येऊ लागली. दर हंगामाला महागडी नवी बियाणे खरेदी करावी लागतील अशीच वाणे (टर्मिनेटेड सीड) विकसीत करण्यात आली. ज्या कंपनीचे वाण आहे. त्याच कंपनीची महागडी कीटकनाशके, पोषके, बुरशीनाशके घ्यावी लागतील असे नफेखोर नवगुलामीचे तंत्रज्ञान विकसित झाले. बियाणे, खते, कीटकनाशके यावरील शेतकऱ्यांचा खर्च कमालीचा वाढविण्यात आला. कॉर्पोरेट कंपन्यांचे नफे याद्वारे प्रचंड वाढले. शेतकरी मात्र संकटात सापडला. शेतकऱ्यांचे बियाणे विषयक नैसर्गिक अधिकार संपुष्टात आले.

**कॉर्पोरेट मक्तेदारी**

जागतिक स्तरावर बियाणे बाजार मोठ्या प्रमाणात कृषी कंपन्यांनी ताब्यात घेतला आहे. २०२३ च्या आकड्यांनुसार सुमारे ५६ टक्के जागतिक व्यावसायिक बियाणे बाजार केवळ चार टक्के कृषी कंपन्या नियंत्रित करत आहेत. बायर ही कंपनी २३ टक्के, कोर्टेवा १९ टक्के, सिंजेंटा १० टक्के तर बी.ए.एस.एफ ही कंपनी चार टक्के बियाणे बाजार नियंत्रित करते. भारतातही या कंपन्यांनी बियाणे क्षेत्र आपल्या कह्यात घेतले आहे. तरतुदींचे अर्थ व अनुभव पाहता नवे बियाणे विधेयकही याच कंपन्यांच्या चांगभल्यासाठी येत असल्याचे शेतकरी संघटनांचे अनुभवाधारित म्हणणे आहे.

**बियाणांच्या किमती**

भारतीय बाजारात बियाण्यांच्या किमती सातत्याने वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफेखोरीला लगाम लावून शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात, चांगल्या गुणवत्तेचे बियाणे उपलब्ध व्हावे यासाठीच्या तरतुदी नव्या कायद्यात करण्याची आवश्यकता होती. प्रस्तावित कायद्याचे कलम २२ आपत्कालीन परिस्थितीत बियाण्यांच्या विक्री किमतींचे नियमन करण्याची चर्चा करते. मात्र, असा हस्तक्षेप केवळ आपत्कालीन परिस्थितीतच केला जाऊ शकतो.

अर्थात 'आपत्काल' नसेल तेव्हा हे कलम 'निरुपयोगी' आहे. आज शेतीसाठी 'सर्वकाळ' हा 'आपत्काल' आहे. मात्र कायद्यात तसे असणार नाही हे उघड आहे.

बियाणे गुणवत्ता भारतीय बाजारात शेतकऱ्यांना बोगस बियाणे विकण्याची प्रकरणे सर्रास घडतात. बियाणे उगवत नाही. उगवले तर कळी, फुलोरा लागत नाही. दावा केलेले अपेक्षित उत्पादन मिळत नाही. रोग प्रतिकारकता आढळून येत नाही. उगवण क्षमता कमी असल्याने बियाणे वाया जाते. उत्पादन घटते. यावर इलाज म्हणून याबाबत शेतकऱ्यांचे हितरक्षण करणाऱ्या कडक तरतुदी प्रस्तावित कायद्यात करणे आवश्यक होते. कलम ६ मध्ये या दृष्टीने बियाण्याची योग्य गुणवत्ता व शुद्धता याबाबत स्पष्टता व उगवण क्षमतेची किमान ८० टक्के अट या तरतुदी आवश्यक होत्या. कंपन्यांनी बोगस बियाणे विकल्यास अशा कंपन्यांचा परवाना तत्काळ रद्द करून, मोठ्या दंडासह कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची तरतूद कायद्यात आवश्यक होती. बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे बियाणे, निविष्टा खर्च, मशागत, तसेच बुडणारे उत्पन्न यासह सर्व नुकसान कंपनीने भरून देण्याची तरतूद कायद्यात हवी होती. प्रत्यक्षात 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' चा नारा देत कंपन्यांवरील जबाबदाऱ्या व निर्बंध उठविले जात आहेत. याविषयक गुन्ह्यांना 'किरकोळ' ठरवीत दुर्लक्षित करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जात आहे.

**सद्भावना दोषमुक्ती**

एखादी व्यक्ती किंवा कंपनीने बियाणे संदर्भात केलेली कृती (चूक किंवा गुन्हा) 'सद्हेतूने किंवा सद्भावने'ने केलेली असेल तर विधेयकाचे कलम ४० अंतर्गत अशा कृत्याला माफ करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे यामुळे कितीही नुकसान झाले तरी अशी माफी केली जाईल. कोणती कृती सद्भावनेने केलेली आहे, हे कंपन्यांच्या सोयीने ठरविण्यास कायद्यात वाव असेल, हे उघड आहे. कंपन्यांना त्यांच्या कृत्याबाबत दोषमुक्ती देणे हे सरकारच्या 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'च्या धोरणांचा भाग असेल. शेतकऱ्यांचे मात्र यात मरण होणार आहे.

**परदेशी बियाणे**

विधेयकाच्या प्रकरण ५ च्या कलम २७ अन्वये भारताबाहेर बियाणे प्रमाणित करण्यास एजन्सीला परवानगी देण्यात येईल. हे आयात बियाणे भिन्न भारतीय कृषी-हवामानात दावे केल्याप्रमाणे गुणवत्ता सिद्ध करेल का? ही गंभीर शंका उपस्थित होते आहे. भारताबाहेरून बियाणे आयात केल्यानंतर ते भारतात बहु-स्थानिक चाचणीनंतरच लागवडीसाठी प्रमाणित केले पाहिजे. हे प्रमाणीकरण राज्याच्या विशिष्ट गरजेनुसार सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांनी केले पाहिजे. शिवाय असे बियाणे जैव-सुरक्षा निकषानुसार हानिकारक नाही हेही सुनिश्चित केले गेले पाहिजे. कलम ३३ मध्ये तसे स्पष्ट केले गेले पाहिजे. याबाबत कठोर चाचण्या केल्या गेल्या पाहिजेत.

एकंदरीतच प्रस्तावित कायद्याच्या मसुद्यात मोठे बदल करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांनी व संघटनांनी विहित मुदतीत आपल्या मागण्या व आक्षेप सरकारला कळविले आहेत. सरकार ते किती गांभीर्याने घेते ते बघूया.(साभार म.टा.)

**डॉ. अजित नवले**

## पाकिस्तानचा 'शेखचिल्ली' निर्णय

येत्या ७ फेब्रुवारीला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर भारत विरुद्ध अमेरिका या दोन संघांदरम्यान रंगणाऱ्या सामन्याने २०२६ च्या टी-२० आयसीसी विश्वचषकाचा श्रीगणेशा होत आहे. मात्र पाकिस्तानने भारत विद्वेषाचे खतपाणी घातलेल्या बांगलादेशच्या दुराग्रही भूमिकेमुळे या स्पर्धेला अपशकुनाचे ग्रहण लागले. बांगलादेशने खेळाडूंच्या सुरक्षेच्या नावाखाली भारतात खेळण्यास नकार देऊन त्यांचे सामने श्रीलंकेत खेळवण्याची मागणी केल्यानंतर आयसीसीने ही मागणी फेटाळून तर लावलीच, पण कठोर कारवाई करत बांगलादेशला या स्पर्धेतून काढून टाकले. आयसीसीच्या या निर्णयाचा धक्का बांगलादेशपेक्षाही पाकिस्तानला अधिक बसला. मग त्यांनी बांगलादेशला पाठिंबा म्हणून संपूर्ण स्पर्धेवर बहिष्कार घालण्याचा पवित्रा घेतला. त्यातून आयसीसीकडून भविष्यात होणारी कठोर कारवाई आणि मोठे आर्थिक नुकसान लक्षात आल्यानंतर 'आम्ही या स्पर्धेत खेळू, पण भारताविरुद्ध खेळणार नाही' अशी ताठर भूमिका त्यांनी घेतली आहे. खरे तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील एका सामन्यामुळे प्रक्षेपणाचे हक्क, जाहिराती, प्रायोजकत्व, तिकीट विक्री, कायदेशीर सट्टेबाजी यासारख्या इतर गोष्टींमुळे अंदाजे ४५०० कोटी रुपयांची उलाढाल होते. त्यामुळे हा सामना झालाच नाही तर सर्वाधिक आर्थिक नुकसान पाकिस्तानचेच होईल.

**प्रदीप मोरे**

## पाकिस्तानातील लोकशाही दुर्बलच

भारताचे शेजारी राष्ट्र सलेल्या पाकिस्तानमध्ये सध्या सुरु असलेल्या घडामोडी तेथील उरलीसुरली लोकशाही संपवून टाकण्याच्या हालचाली असल्याचे दर्शवित आहेत. अलीकडेच झालेल्या घटना दुरुस्तीमुळे तेथील लष्करशाही आणखी मजबूत आणि मुजोर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ यांनी त्यांना ज्यांच्या मेहरबानीमुळे हे पद प्राप्त झाले त्यांची चांगलीच परतफेड चालवली आहे. आधीच मर्यादित असलेली तेथील लोकशाही आणखीनच संकुचित होताना दिसत आहे. यामध्ये पाकिस्तानी संसदही लोकशाहीला संपवण्याच्या मोहिमेत सहभागी असल्याचे चित्र आहे. अलीकडेच झालेल्या सत्ताविसाव्या घटना दुरुस्तीमध्ये जनरल असीम मुनीर यांना बरेच अधिकार प्राप्त होणार आहेत. मागे अशाच घटना दुरुस्तीच्या निर्णयाचा विरोध करण्यासाठी पाकिस्तानातील लोकशाहीवादी जनता रस्त्यावर उतरली होती. आताही तशीच शक्यता व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानी राजकीय नेते कायम लष्कराच्या हातचे बाहुले होत आले आहेत.

अजूनही त्यात फारसा फरक पडावयास तयार नाही.

अमेरिकेसारख्या युद्धखोर राष्ट्राकडून कायम आर्थिक मदत घेण्याकडे पाकिस्तानचा कल राहिला आहे. आता चीनकडूनही पाकिस्तानचे नेते आपली झोळी भरून घेताना दिसत आहे. प्रगत राष्ट्रांकडून मिळालेल्या अब्जावधी रुपयांच्या मदत निधीचा वापर दहशतवाद पोसण्यासाठीच होत आला आहे. पाकिस्तानने त्याऐवजी जनहिताकडे लक्ष दिल्यास त्यांना वारंवार मदतीची याचना करण्याची वेळ येणार नाही.

परंतु, एशोआराम आणि चंगळवादी आयुष्याची सवय जडलेल्या शहाबाज सरकारला लोकशाहीची मान लष्कररूपी कसायाच्या हाती सोपवण्याची घाई झाल्याचे स्पष्ट होते.

**प्रा. मधुकर चुटे**

# कॉंग्रेसमधील मुस्लीम नेत्यांची नाराजी !

काँग्रेसचे बडे नेते राहुल गांधी यांच्याबाबत, गेल्या काही दिवसांत काही मुस्लीम नेत्यांनी केलेली टिका टिप्पणी दुर्लक्षिण्यासारखी नाही. कॉंग्रेसचे ओडिशातील माजी आमदार मोहंमद मोकीम यांनी पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांना मध्यंतरी लिहिलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की कॉंग्रेसला 'ओपन हार्ट सर्जरी 'ची गरज आहे. पक्षाचे संघटनात्मक दौर्बल्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पक्ष नेतृत्वाचे अपयश या बाबत मोकीम यांनी पत्रात चिंता व्यक्त केली आहे. मोकीम हे पक्षाचे जुने कार्यकर्ते असून, त्यांचे कुटुंब स्वातंत्र्यपूर्व काळापासून पक्षाशी जोडलेले आहे. ओडिशामध्ये कॉंग्रेसचा विधानसभा निवडणुकीत लागोपाठ सहाव्यांदा पराभव झाला. तसेच लोकसभेत लागोपाठ तिसऱ्यांदा पराभव झाला या बाबत मोकीम यांनी काळजी व्यक्त केली आहे. बिहार, दिल्ली, हरियाणा आणि महाराष्ट्र या राज्यांतील कॉंग्रेसची खराब कामगिरी ही संवाद आणि समन्वयाच्या अभावामुळे झाली, असा निष्कर्ष त्यांनी आपल्या पत्रात नोंदवला आहे.

जमिनीवरील कार्यकर्ता आणि पक्ष नेतृत्व यांच्यातील अंतर वाढत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. आपण स्वतः आमदार असतानाही पक्षाचे नेते राहुल गांधी यांना तीन वर्षे प्रयत्न करुनही भेटू शकलो नाही, अशी खंत मोकीम यांनी व्यक्त केली आहे. ३५ वर्षांखालील युवकांशी, ज्यांची संख्या देशात ६५ टक्के इतकी आहे, त्यांच्याशी कनेक्ट करण्यात पक्षाला अपयश आल्याची भावना मोकीम यांनी पत्रात व्यक्त केली आहे. ८३ वर्षे वय असलेल्या मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस, युवकांबरोबर भावनात्मकदृष्ट्या कनेक्ट होऊ शकलेली नाही, अशी टिका त्यांनी केली आहे. मोकीम यांनी पत्रात असा खुलासा केला आहे की पक्षाच्या भल्यासाठी त्यांनी आपले मत मांडले आहे. त्यांना आपले मत मांडण्याचा अधिकार आहे आणि ते त्यांचे कर्तव्यही आहे.

कॉंग्रेसचे बिहार मधील नेते शकील अहमद यांनी राहुल गांधी यांच्यावर थेट हल्ला केला आहे. ते म्हणाले की, राहुल गांधी यांची इच्छा असली तरी ते कॉंग्रेसला सध्याच्या दुसऱ्या स्थानावरून खाली उतरवू शकणार नाहीत, याचे कारण इतर विरोधी पक्षांची ( प्रादेशिक पक्ष ) ताकद त्यांचा प्रभाव असलेल्या राज्यांपुरती मर्यादित आहे. त्यामुळे ते कॉंग्रेस सध्या ज्या स्थानावर आहे, त्याच्या आसपासही पोहचू शकणार नाहीत. भाजपा व्यतिरिक्त भारतभर अस्तित्व असलेला कॉंग्रेस हा एकमेव पक्ष



आहे. शकील अहमद हे कॉंग्रेसचे बिहार मधील नेते असून ते तीनदा आमदार आणि दोनदा खासदार होते. त्यांनी केंद्रात मंत्रिपदही भुषविले होते. मध्यंतरी झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर शकील अहमद यांनी कॉंग्रेसचा राजीनामा दिला होता.

शकील अहमद यांनी असाही आरोप केला की राहुल गांधी हे पक्षातील वरिष्ठ नेत्यांना बाजूला सारत आहेत. त्यांनी पक्षांतर्गत लोकशाहीवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. राहुल गांधी हे डरपोक असल्याचा गंभीर आरोप शकील अहमद यांनी केला आहे. ते म्हणाले की मी काही कॉंग्रेसचा शत्रू नाही. मी मरण्यापूर्वी जेंव्हा शेवटचे मतदान करेन, ते कॉंग्रेसलाच असेल. कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या बद्दल ते म्हणाले की खरगे हे केवळ नामधारी अध्यक्ष आहेत. सर्व महत्त्वाचे निर्णय हे राहुल गांधी हेच घेतात. शकील अहमद यांनी असा दावा केला आहे की कॉंग्रेसचे काही नेते मुस्लिम नेत्यांबरोबर फोटो काढायला घाबरतात, कारण त्यामुळे हिंदू व्होट बँक निसटण्याची भीती त्यांना वाटत असते.

कॉंग्रेसचे आणखी एक मुस्लीम नेते राशिद अल्वी यांनीही कॉंग्रेस नेतृत्वावर टिकास्त्र सोडले आहे. ते म्हणाले की कॉंग्रेसमध्ये असा एखादा मंच नाही, की ज्याठिकाणी निरनिराळ्या समस्यांवर चर्चा करता येईल. सामान्य कार्यकर्त्याला कॉंग्रेस हायकमांड आणि इतर वरिष्ठ नेत्यांबरोबर चर्चा करण्याची संधी मिळत नाही. प्रत्येकजण हा काही कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा सदस्य नसतो. बरेचजण पक्षनेतृत्वाबरोबर संवाद साधता येत नसल्याची तक्रार करतात. राशिद अल्वी असेही म्हणाले की माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी हे कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी वेळ काढत असत. पक्षातील मुस्लीम नेत्यांचे वैशिष्ट्य सांगताना अल्वी म्हणाले की मुस्लीम नेते हे कॉंग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर भाजपात सामील होत नाहीत. ते सत्तेकरता कॉंग्रेस सोडत नाहीत. कॉंग्रेस मध्ये मुस्लिम नेत्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करुन, अल्वी यांनी अशी भीती व्यक्त केली की, मुस्लीम नेत्यांकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण, पक्षाने असेच सुरू ठेवले तर ओवैसींसारख्या नेत्यांना त्याचा फायदा मिळेल. दिवसे दिवस ओवैसी यांच्या पक्षाची ताकद वाढत आहे.

थोडक्यात, कॉंग्रेस मधील काही मुस्लीम नेत्यांनी पक्षाबद्दलच्या आपल्या भावना तिव्रपणे मांडल्या आहेत. त्याची दखल कॉंग्रेस नेतृत्वाने गंभीरपणे घ्यायला हवी.

लोकसभेच्या गेल्या काही निवडणुकांत कॉंग्रेसला साधारणतः २० टक्यांच्या आसपास मते मिळत आहेत. त्यातील अंदाजे ६ ते ७ टक्के मते मुस्लीम समाजाची असू शकतात. त्यामुळे आपली मुस्लीम व्होट बँक सांभाळण्यासाठी, कॉंग्रेसला पक्षातील मुस्लीम नेत्यांच्या तक्रारींची दखल घ्यावीच लागेल.

**अभय गोखले**

# नगर परिषदेच्या उर्दू शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमात देशद्रोही गाण्यावर नृत्य

## विद्यार्थ्यांकडून देश विरोधी गीतांचे सांस्कृतिक कार्यक्रम करून घेणाऱ्या शिक्षकां विरुद्ध कारवाई करा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - येथील नगर पालिकेच्या अब्दुल गफूर शाह उर्दू शाळा क्रमांक 2 येथे 26 जानेवारी च्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रम 31 जानेवारी रोजी झाला असून या कार्यक्रमात देश विरोधी गीताचे विद्यार्थ्याकडून गायन व नृत्य करून घेणाऱ्या शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस महेश काळेश्वरकर यांनी आज दिनांक 4 फेब्रुवारी रोजी विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेमधून केली.

नगर परिषद अंतर्गत उर्दू शाळेत ए मर्द ए मुजाहिद तेरी यलगार कहा है हे पाकिस्तानी गाणे असून देशात प्रतिबंधित गाण्याच्या यादी मध्ये सदर गाणे असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला सदर गाण्यामध्ये लोकांना तलवार कोठे आहे ? असे विचारून लोकांना तलवार उठवा अशी चिथावणी देण्यात येत आहे. हे लोकांना देशाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी उग्र प्रेरित करत आहे. कारण हे गाणे 1965 मधील भारत पाकिस्तान युद्ध दरम्यान खूप प्रसिद्ध झालं होतं. असेही यावेळी काळेश्वरकर म्हणाले. पाकिस्तानकडून त्यांच्या नागरिकांना व सैनिकांना युद्धासाठी प्रवृत्त करण्यासाठी वापरले गेलेले गीत असून आजही पाकिस्तानमध्ये लष्करी व राष्ट्रीय समारंभात सदर गीत गायले जाते. निरागस बालकाकडून देशविरोधी गाण्यावर नृत्य करवून घेणारे मुख्याध्यापक, शिक्षक हे देश विरोधी कृत्य करत आहे तसेच हे संविधान आर्टिकल 28 च्या विरोधी सुद्धा आहे. कारण सरकारी शाळेत अशा प्रकारचे धार्मिक गाणे वाजवण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्याकडून अशा स्वरूपाचे गीत गायन व नृत्य करून घेणे हे भारताच्या सार्वभौमत्वाविरोधात भावना निर्माण करणारे सामाजिक व धार्मिक तेढ वाढविण्याच्या उद्देशाने केलेले तसेच विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर देश विरोधी विचार रुजविण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. सदर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या ठिकाणी नगरपरिषद पदाधिकारी तसेच नगराध्यक्ष, शिक्षण सभापती , नगरसेवक यांच्या समक्ष गीत चालू असताना सुद्धा त्यांनी थांबविण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. अप्रत्यक्ष त्याला समर्थनच दिले. त्यामुळे सदर प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधित शिक्षक, शाळा प्रशासनातील जबाबदार अधिकारी तसेच नगराध्यक्ष व शिक्षण सभापती यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक गोपाल कलाने यांनी 2 फेब्रुवारी रोजी पोलिसांना दिलेल्या तक्रारीतून मागणी केली आहे. संबंधितांवर गुन्हा दाखल होईपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही शाळेचे सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून न पाहता यामागे कोण आहे ? त्याची भूमिका काय ? शासकीय उर्दू शाळेत जर असे शिक्षण विद्यार्थ्यांना शिक्षक देत असेल तर याची निश्चितच चौकशी करून गुन्हे दाखल झाले पाहिजे अशी आमची ठाम भूमिका आहे असेही यावेळी महेश काळेश्वरकर म्हणाले. त्यांच्या समवेत भाजपाचे गटनेते विजय हरडपकर ,भाजपा शहर अध्यक्ष अतुल खंदारे, नगरसेवक अमोल तीवरंगकर , गोपाल कलाने, पवन मेंढे , बबलू मैड उपस्थित होते.

# तहसील कार्यालयाच्या परिसरात रोड मध्येच वाहने उभी

## शाळकरी विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी होत आहे नाहक त्रास

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तहसील कार्यालयाच्या परिसरात व जयस्तंभ समोर तसेच उपविभागीय कार्यालयासमोर नागरिकांच्या मोटर सायकल रस्त्यात लागत असल्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होत असल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर यशवंत स्टेडियम येथे गेल्या आठ ते दहा दिवसापासून क्रिकेटचे डे-नाईट सामने सुरू असल्यामुळे या ठिकाणी क्रिकेट प्रेमी व नागरिक मोटरसायकल घेऊन येत असल्यामुळे प्रचंड गर्दी होत आहे , त्यामुळे परिसरातील शाळा व कॉलेज तसेच शाळकरी विद्यार्थ्यांचे ऑटो मोठ्या चारचाकी वाहन यांना येण्या-जाण्याकरिता अडचणी निर्माण होत आहे, नागरिक आपल्या मोटरसायकल वाहन रोडवर बिनधास्त उभे ठेवून क्रिकेटचे सामने बघण्यासाठी जात आहेत त्यामुळे आज दि.४ फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयासमोर दोन मोटरसायकलच्या एकमेकांविरुद्ध भरधाव टक्कर झाल्यामुळे एका इसमाच्या पायाला जबर मार लागला त्या इसमास तात्काळ दवाखान्यात हलविण्यात आले.

याठिकाणी ग्रामीण भागातून नागरिक, शेतकरी, रोज मजूर हे तहसीलवर कामासाठी येत असल्यामुळे या नागरिकांना या रहदारीचा खूपच मनस्ताप होत असल्यामुळे हे रोड मध्ये उभे असलेले मोटरसायकल वाहन हटविण्याबाबत तहसीलदार यांनी वाहतूक पोलिसांना कळवून हा परिसर मोकळा करण्यात यावे अन्यथा या ठिकाणी मोठा अपघात होऊन जीवीत हानी होण्यास विलंब लागणार नाही असे परिसरातील व ग्रामीण भागातील नागरिकांनी आपले मत व्यक्त केले आहे. वाहतूक पोलीस शाखेचे कार्यालय हाकेच्या अंतरावर आहे.

परंतु तहसील कार्यालयाच्या परिसरात असलेल्या वाहनाकडे दुर्लक्ष होत आहे, याबाबत वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे असे काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून बोलल्या जात आहे.

# • वेचक



## सिद्धिविनायक ट्रस्ट मुंबईकडून शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या ग्रंथालयास १००५ पुस्तके भेट

पांढरकवडा - शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या ग्रंथालयास सिद्धिविनायक ट्रस्ट, मुंबई यांच्या 'ग्रंथपेढी' या उपक्रमांतर्गत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमावर आधारित महत्त्वपूर्ण पुस्तके भेट स्वरूपात देण्यात आली आहेत. या उपक्रमांतर्गत प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. अभ्यासक्रमांच्या सेमिस्टर एक व दोनसाठी आवश्यक असलेल्या सर्व विषयांची सुमारे १००५ क्रमिक पुस्तके महाविद्यालयास प्राप्त झाली आहेत. हे महाविद्यालय आदिवासी व दुर्गम भागातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे परिसरातील एकमेव महाविद्यालय असून येथे शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून येतात. या पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण (NEP) अन्वये आवश्यक असलेली क्रमिक पुस्तके एका सत्रासाठी विनामूल्य उपलब्ध होणार असून त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लागणार आहे. महाविद्यालयाचे सचिव श्री. विजयराव मोघे व प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी सिद्धिविनायक ट्रस्टच्या या उपक्रमाचे कौतुक करत ट्रस्टचे सन्माननीय अध्यक्ष व कार्यकारिणीचे मनःपूर्वक आभार मानले. ग्रंथपाल डॉ. एकता मेनकुदळे यांनी सांगितले की, या पुस्तकांमुळे महाविद्यालयाचे ग्रंथालय अधिक समृद्ध झाले असून विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेच्या तयारीस मोठी मदत होणार आहे. महाविद्यालयाची प्रवेश समिती, श्री. गणेश हटकर, इतर प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांनी सिद्धिविनायक ट्रस्ट, मुंबई यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

## वृद्ध कलाकारांच्या नऊ फेब्रुवारी रोजी होणार मुलाखती

बाभूळगाव - महाराष्ट्र शासनाच्या राज्यश्री शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजनेंतर्गत ५० वर्षांवरील कलावंताची मुलाखत व निवड चाचणी प्रक्रिया पंचायत समिती बाभुळगाव येथे सोमवार दिनांक 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10:00 ते सायंकाळी 6:00 वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. तालुक्यातील 135 वृद्ध साहित्यिक व कलावंत यांनी सन 2022 ते सन 2026 या वर्षात शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलावंत मानधन सन्मान योजनेंतर्गत अर्ज सादर केले होते. तालुक्यातील 135 पात्र लाभार्थ्यांची मुलाखत व निवड चाचणी निवड समितीचे सदस्य चितांगराव गणपतराव कदम, गजानन किसन फोफसे व सहा. गटविकास अधिकारी गजानन धर्माळे पं. स. नेर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. तरी वृद्ध साहित्यिक व वृद्ध कलावंत यांनी मुलाखत व निवड चाचणीच्या वेळी आवश्यक त्या वेशभूषा व आपल्याला लागणारे साहित्य घेऊन वरील ठिकाणी 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10:00 वाजता पं. स. बाभुळगाव येथील सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांनी तालुक्यातील सभागृहात पात्र वृद्ध कलावंतांना केले आहे.



## पुसद येथील होमगार्ड सैनिक जिल्हा परिषद निवडणूक बंदोबस्त करिता परभणीला रवाना!

पुसद - जिल्हा समादेशक अधिकारी यवतमाळ तथा अप्पर पोलीस अधीक्षक यवतमाळ यांच्या आदेशान्वये तसेच जिल्हा होमगार्ड कार्यालय यवतमाळ केंद्रनायक राजेंद्र बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद येथील समादेशक अधिकारी संतोष नेवकर वरिष्ठ पलटण नायक यांच्यासह पलटण नायक संजय राठोड, जावेद मिर्झा, तसेच पुसद पथकातील २०० पुरुष होमगार्ड सैनिक समोर येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बंदोबस्त करिता परभणी जिल्हा तालुका सेलु पोलिस स्टेशन येथे बंदोबस्त करिता रवाना झाली आहे.

# थकीत पगारावरून घंटागाडी कर्मचारी आक्रमक

## नगराध्यक्षांच्या निवासस्थानी अपमानाचा आरोप, माफी नाही तर तक्रार व संपाचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - यवतमाळ शहरातील घंटागाडी कर्मचाऱ्यांनी थकीत पगाराच्या प्रश्नावर बुधवारी (दि. ४ फेब्रुवारी) तीव्र संताप व्यक्त केला. सकाळी साडेआठच्या सुमारास सुमारे १०० हून अधिक कर्मचारी नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्या निवासस्थानी भेटीसाठी गेले असता, त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. गेल्या दहा वर्षांपासून नगरपालिकेअंतर्गत कार्यरत असलेल्या घंटागाडी कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांचे वेतन थकीत असून, दरमहा केवळ १०,१०० रुपयांच्या तुटपुंज्या मानधनावर कुटुंब चालवणे अशक्य झाल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. पगार न मिळाल्याने अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कर्मचाऱ्यांचा आरोप आहे की, शांततेच्या मार्गाने आपले म्हणणे मांडण्यासाठी गेले असताना भाजपचे स्थानिक गटनेते नितीन गिरी यांनी त्यांना तेथून हाकलून लावले. या घटनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र रोष पसरला असून, गटनेत्यांनी जाहीर माफी मागावी, अन्यथा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. किमान वेतन लागू करणे, सात महिन्यांचा थकीत पीएफ तात्काळ जमा करणे आणि दुहेरी ड्युटीमुळे होणारी पगार कपात बंद करणे या प्रमुख मागण्या कर्मचाऱ्यांनी मांडल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनाला सोशल मीडिया काँग्रेस जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे डॉ. नीरज वाघमारे आणि कॉम्रेड सचिन मनवर यांनी जाहीर पाठिंबा दिला.

# १८ वर्षांनंतर शालेय आठवणींना उजाळा

## पाटणबोरीतील दहावी २००७–०८ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पाटणबोरी - येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सन २००७–२००८ च्या दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा १८ वर्षांनंतरचा स्नेहमेळावा पाटणबोरी येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

या स्नेहमेळाव्यास महेश डब्बावार, आयाज शेख, आदित्य अंगलवार, तुषार एलकीवार, अमोल जंगमवार, अस्लम शेख, मोतीश सिडाम, प्रवीण येनुगवार, सुनील गदई, सिद्धार्थ कोरेड्डीवार, श्रीनिवास गौरवार, किरण रासमवार, रुपेश आयलापुरकर, गौरव गंपावार, मोनिका कुंटावार, राजू तरलवार, रवींद्र निम्मलवार, पवन गेडाम, प्रीतम मेश्राम, संदीप कोरेड्डीवार, सपना घोडाम, वसीम काझी, चंद्रशेखर दूधलकर, सपना झोडे, हर्षाली मन्ने, मजहर सय्यद, अस्लम जाटू, सोहेल खान, चेतन ढेवले, सोनिया कोरेड्डीवार, रुक्साना शेख, अमोल गावंडे, अनुराधा मडावी, रश्मी तोटावार, वाणी पनाजवार, नेहा चावर्डोल, प्रियांका सुनकरवार, पल्लवी मेढेवार, चतुरा मुत्याळवार, शुभांगी चित्तलवार, पूजा मुत्याळवार, काजल कांबळे, कृष्णावेणी दार्वेनवार, मंजुषा अणमुलवार, गीता अल्लुरवार, दर्शन थेते, अपेक्षा पकोजवार, नरसिमालु उस्केमवार व हितेश भस्मे आदी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास शाळेतील माजी व विद्यमान शिक्षक अंजली नालमवार मॅडम, चावर्डोल सर, पोलेवार सर, नक्षाने सर, कुर्मावार सर, मनोज कांबळे सर, बुर्रेवार सर तसेच बी. एम. पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या गुरुजनांचा यावेळी सन्मान करण्यात आला. स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांचे मार्गदर्शन, मैत्रीचे नाते व जीवनप्रवासातील अनुभव यावर मनमोकळा आणि भावनिक संवाद झाला. १८ वर्षांनंतर पुन्हा एकत्र येण्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे झळकत होता. या स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून भविष्यात सामाजिक, शैक्षणिक व समाजोपयोगी उपक्रम संयुक्तपणे राबवण्याचा संकल्प माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रम सर्व माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थितांनी आयोजकांचे अभिनंदन करत पुढील काळातही अशा स्नेहमेळाव्यांचे आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# रयतेच्या लाडक्या लोकनेत्याला अश्रूंनी निरोप

## मा. अजितदादा पवार यांच्या अस्थी कलशाचे यवतमाळात भावनिक दर्शन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आधारस्तंभ, सर्वसामान्यांचे दुःख जाणणारे आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणारे लोकनेते मा. अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देणारा क्षण यवतमाळकरांच्या साक्षीने अनुभवायला मिळणार आहे. दादांच्या अस्थींचा कलश अमरावती येथून आज सायंकाळी यवतमाळ शहरात आगमन करीत असून, त्यांच्या अंतिम दर्शनासाठी यवतमाळ जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सार्वजनिक दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ठीक ७ वाजता दारव्हा रोडवरील हाऊसिंग फायनान्स कार्यालयात अस्थी कलशाचे आगमन होणार आहे. त्यानंतर ३ फेब्रुवारी व ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हा अस्थी कलश सर्वसामान्य नागरिकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी अखंड झटणाऱ्या या लोकनेत्याने आपले संपूर्ण आयुष्य रयतेच्या सेवेसाठी वाहिले. सत्तेच्या शिखरावर असूनही मातीशी नाळ जपणारा नेता म्हणून अजितदादा पवार यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक संवेदनशील, संघर्षशील आणि निर्भीड नेतृत्व गमावले आहे. या भावनिक प्रसंगी दादांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक नमन करण्यासाठी, त्यांच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील यांनी केले आहे. रयतेचा आवाज हरपला असला, तरी दादांचे विचार आणि कार्य यवतमाळकरांच्या हृदयात सदैव जिवंत राहतील.

# डोक्याला जबर मारहाण केल्यामुळे युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

## पाच जणांविरुध्द अ‍ॅट्रोसिटीसह विविध गुन्हे दाखल!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - वसंतनगर पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या छाया वंजारे हिच्या घरासमोर उभा राहिला असता शेख फरहान शेख कुरेशी चे वडिल बळजबरीने तिच्या घरात जाण्याचा प्रयत्न करीत होते. त्या ठिकाणी जमाव जमला मृतक आकाश शंकर कांबळे वय ३० याने जमावाला मज्जाव केला असता आरोपी शेख फरहान याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तो खाली पडल्यानंतर डोक्यावर जोराने लाथ मारली. यामध्ये आकाश कांबळे हा गंभीर जखमी झाला. उपचारा दरम्यान यवतमाळ येथे त्याचा मृत्यू झाला. शंकर चंद्रकांत कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि. २ फेब्रुवारी रोजी वसंतनगर पो. स्टे. मध्ये कलम १०५, १८९ (२), १९०, १९१ (२) भान्यासं सह अ‍ॅट्रोसिटी अ‍ॅक्ट ३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान पाच आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यांची न्यायालयीन कोठडीमध्ये रवानगी करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, शंकर चंद्रकांत कांबळे वय ६५ रा. वारको सिटी पुसद यांनी वसंतनगर पोलिस स्टेशनला तक्रार दिली, दि. २९ जानेवारी रोजी रात्री १०.३० वाजताच्या दरम्यान वसंतनगर येथे मृतक आकाश कांबळे हा छाया वंजारे हिच्या घरासमोर उभा होता. त्यावेळी शेख फरहान शेख कुरेशी वय २६, शेख नौशाद शेख सुलतान वय ३४, हकीमोद्दीन करीमोद्दीन वय ४०, रियाज खान सरदार खान वय ३६ व ईर्शाद अहेमद शेख सुलतान वय ४० हे जमाव जमवून शेख फरहानचे वडिल छायाबाई हिच्या घरात गेले आहेत का या संशयावरुन आत घुसण्याचा प्रयत्न करीत होते. त्यास आकाश कांबळे याने विरोध केला असता प्रथम शेख फरहान ने लाथाबुक्क्या मारुन त्यास खाली आपटले. डोक्याला जबर मार लागल्याने तो तिथेच पडून होता.

त्यानंतर आकाश कांबळे यास यवतमाळ येथे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले. उपचारा दरम्यान दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजता त्याचा मृत्यू झाला. पुसद येथील स्मशानभूमीत अंत्यविधी झाल्यानंतर शंकर कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर अ‍ॅट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला. येथील न्यायाधीश एस. एन. शाह यांनी सर्व आरोपींची न्यायालयीन कोठडीमध्ये रवानगी केली आहे.

# महामार्गावरील बायपासचे काम सुरू न झाल्याने हिवरा गावकऱ्यांचा १० फेब्रुवारीला रास्तारोको

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - नागपुर तुळजापुर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या हिवरा येथील प्रस्तावित बायपासचे काम सुरू न झाल्याने अपघात घडून त्यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागत असल्याने बायपासचे काम तत्काळ सुरू करावे,सद्या वाहतूक सुरू असलेल्या गावातील रस्त्यावर गतिरोधक निर्माण करण्यात यावे या मागणीसाठी मंगळवार(१०फेब्रुवारी) रोजी हिवरा गावकऱ्यांनी रास्तारोको आंदोलनाची हाक दिली आहे.

नागपुर तुळजापुर राष्ट्रीय महामार्ग क्र ३६१ वर असलेल्या हिवरा(संगम) येथील बायपास चे काम झाले नसल्याने याठिकाणी वारंवार अपघात घडून अनेकांना आपला जीव गमवावा लागला त्यामुळे याठिकाणी रस्त्यावर गतिरोधक देण्यात यावे तसेच बायपासचे काम तत्काळ सुरू करण्यात यावे याकरिता गावकऱ्यांनी वारंवार निवेदनाद्वारे प्रशासनाकडे मागणी केली.परंतु महामार्ग प्राधिकरणाने त्याला फारसे गांभीर्याने घेतले नसल्याने त्याठिकाणी मागील आठवड्यात अपघात होवुन तीन दिवसात तीन युवकांचा बळी गेला आहे.त्यामुळे आंदोलनाच्या पावित्र्यात असलेल्या संतप्त गावकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन ठाणेदार धनराज निळे यांनी मध्यस्थी करीत तुर्तास आंदोलन टाळले .यावेळी महामार्ग प्रशासनाने बुधवार दिनांक ४फेब्रुवारी पर्यंत हिवरा येथील रस्त्यावर गतिरोधक निर्माण करण्याचे आश्वासन दिले परंतु आज पर्यंत याठिकाणी कोणतेच काम करण्यात आले नसल्याने गावकऱ्यांच्या वतीने मंगळवार दिनांक १०फेब्रुवारी२०२६रोजी हिवरा संगम येथील छत्रपती शिवराय चौक रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असुन सदर आंदोलन जो पर्यंत याठिकाणी काम सुरू होणार नाही तो पर्यंत करण्यात येणार असल्याचा ईशारा ठाणेदार पोलिस स्टेशन महागाव यांना दिलेल्या निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी उपसरपंच शरद पाटील, ग्रा.पं. सदस्य राजु धोतरकर,विशाल कदम ,महेश कामारकर,अभय बोंपिलवार,विजय कदम,संदीप कदम ,अमोल वानखेडे यांच्या सह नागरिक उपस्थित होते.

# सरपंच ,ग्रामसेवक यांनी बोगस मस्टर केले तयार ; कायदेशीर कारवाई करण्याची मागणी !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - तालुक्यातील ग्राम पंचायत येलदरी येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी बनावट (बोगस) मनमानी पध्दतीचा ठराव घेवून तक्रारकर्ते आणि गटविकास अधिकारी पं.स.पुसद यांची फसवणुक केल्यामुळे त्यांच्यावर या गंभीर बाबींची तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना संतोष बुगाजी पारध पो. बोरी खु.यांनी केली आहे.

सदर तक्रारकर्ते संतोष बुगजी पारध, सामाजिक कार्यकर्ते यांनी आपल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे की गटविकास अधिकारी यांच्या अधिनस्त ग्राम पंचायत येलदरी ता. पुसद येथील ग्रामसेविका नामे कु. एस.एस.बोंबले व सरपंच यांनी संगनमताने बोगस ठराव घेऊन कोणालाही न कळवित मनमानी पध्दतीने मुख्यालयी न राहता व प्रोसेडींग रजिष्टर पुसद ऐवजी महागाव वर ठराव घेऊन दिशाभूल करुन फसवणुक केली या संबंधितावर विविध कायद्या अंतर्गत कारवाई करावी व २०१९ पासुनचा त्यांनी उचल केलेल्या घरभाडे भत्ता वसुल करावा. भविष्यात पुढे सत्यता पुढे येईपर्यंत त्यांना घरभाडे भत्ता देण्यात येवू नये. या बाबत चौकशी करावी झालेल्या चौकशीचा अहवालाची प्रत तक्रारकर्त्यास देण्यात यावी. अशा विषयाची तक्रार दाखल केली आहे या तक्रारीची गटविकास अधिकारी काय कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# आंबोडा येथील श्री गजानन महाराज यात्रा महोत्सवाला प्रारंभ

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - तालुक्यातील अंबोडा गावात २ फेब्रुवारी पासून यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली आहे. यामध्ये भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा संगम अनुभवायला मिळणार आहे. श्री गजानन महाराज, शेगाव यांच्या प्रकटदिनानिमित्त श्री गजानन महाराज संस्थान, अंबोडा यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली आहे. यामध्ये ज्ञानयज्ञ, अखंड हरीनाम सप्ताह, यात्रा महोत्सव व कलशारोहण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता 'श्रीं' च्या अभिषेकाने सुरुवात झाली आहे. त्यानंतर विधिवत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञास प्रारंभ होणार असून ९ फेब्रुवारीला सांगता होणार आहे. यावेळी श्रीमद् भागवत कथेचे प्रवचन मुडाणा येथील निजधाम आश्रमचे हभप तानाजी बापू यांच्या वाणीतून होणार आहे. यावेळी डॉ. राम बेलगमवार, डॉ. श्रीकांत देशमुख, बाळू वाकोडे, शिवराज ठाकरे, मनोज तगडपल्लेवार यांच्या हस्ते सपत्नीक धार्मिक विधी पार पडणार आहेत. ९ फेब्रुवारीला सकाळी ९.१५ वाजता श्री संतोषी माता मंदिर व श्री हनुमान मंदिर येथे कलशारोहण कार्यक्रम होणार आहे. हा सोहळा बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, हभप तानाजी बापू मुडाणकर यांच्या हस्ते होणार आहे. ८ फेब्रुवारीला श्री गजानन महाराजांच्या प्रगटदिनानिमित्त विशेष अभिषेक व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शेवटी महाप्रसाद वितरणाने महोत्सवाची सांगता होणार आहे.

# राज्यात पहिलाच प्रयोग;पाणी पट्टी भरा,बक्षीसे मिळवा!

## धामणगाव नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती विलास बुटले यांचे अभिनव उपक्रम

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

नगर परिषदेचे वार्षिक उलाढाल नगर परिषद कर्मचारी व अधिकाऱ्यांचे वेतन सर्वस्वी नगर परिषद कर,पाणी पट्टी कर,मालमत्ता कर नगर परिषद द्वारे आकारण्यात येणाऱ्या टॅक्स वर अवलंबून असते शासनद्वारे शहराच्या विकासासाठी मिळणारा विकास निधी हा देखील नगर परिषदेच्या वार्षिक टॅक्स च्या वसुली वर अवलंबून असते मात्र अनेक लहान नगर परिषद मध्ये कर्मचाऱ्यांना टॅक्स वसुली साठी तारेवरची कसरत करावी लागते तगादा लावून देखील टॅक्स वसुली चा टार्गेट पूर्ण होत नाही मात्र धामणगाव नगर परिषदेचे नवनिर्वाचित पाणी पुरवठा सभापती यांनी नगराध्यक्षा अर्चनाताई




अडसड-रोठे व आमदार प्रतापदादा अडसड यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी पट्टी वसुली साठी अभिनव उपक्रम हाती घेतला आहे.त्यांनी पाणी पट्टी भरा आणि बक्षिसे मिळवा अशी योजना राबवित महाराष्ट्रातून पाणी पट्टी वसुली साठी प्रथमच प्रयोग अंमलात आणला आहे.

१ एप्रिल २०२५ पासून २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाणी पट्टी भरणा करणाऱ्या नागरिकांतून सोडतच्या माध्यमातून प्रथम पाच मोठे बक्षिसाचे वितरण करण्यात येणार आहे.तर प्रत्येकी ६ लोकांना प्रोत्साहन पुरस्कार सुद्धा या योजनेद्वारे मिळणार आहे.प्रथम पुरस्कार १६५ लिटर चे फ्रीज,द्वितीय पुरस्कार एलईडी टीव्ही,तृतीय पुरस्कार शिलाई मशीन,चतुर्थ पुरस्कार कुलर,तर पाचवे पुरस्कार गॅस शेगडी असे पाच पुरस्कार सोडतच्या माध्यमातून मिळणार आहे अशी माहिती पाणी पुरवठा सभापती विलास बुटले यांनी दिली आहे.विशेष म्हणजे प्रति नळ जोडणी व पाणी पुरवठा साठी धामणगाव नगर परिषदेला प्रति कनेक्शनच्या मागे वार्षिक ५ हजार ४६५ रुपये खर्च येतो त्यातले ३४६५ हजार रुपये नगर परिषद अदा करते मात्र धामणगाव नगर परिषद द्वारे १६०० रुपये वार्षिक पाणी पट्टी आकारण्यात येतो. यावर्षी पासून ही पाणी पट्टी २००० हजार रुपये करण्यात आली असली तरी नगर परिषद ला लागणाऱ्या खर्चापेक्षा कमी असल्याची माहिती पाणी पुरवठा सभापती विलास बुटले यांनी दिली आहे.धामणगाव शहराच्या नागरिकांनी या उपहार योजनेचा जास्तीत जास्त प्रमाणात पाणी पट्टी कर भरून धामणगावाच्या इतिहासात प्रथमच व महाराष्ट्रातुन प्रथमच राबविण्यात येणाऱ्या भव्य बक्षीस योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नगराध्यक्षा अर्चना अडसड-रोठे, आमदार प्रतापदादा अडसड व योजनेचे शिल्पकार पाणी पुरवठा सभापती विलास बुटले यांनी केले आहे.महत्वाचे म्हणजे या बक्षीस योजनेच्या उपहाराचे पूर्ण खर्च पाणी पुरवठा सभापती विलास बुटले यांनी स्वतःउचलला आहे हे विशेष!पाणी पुरवठा विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजनेचे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेचे रंगले सामने

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत तिसरा दिवस चुरशीचा ठरला.अण्णा विद्यापीठ विरुध्द गुरुकुल कांगरी विद्यापीठ, हरिव्दार यांच्यात झालेल्या लढतीत गुरुकुल कांगरी विद्यापीठ संघ विजयी झाला, दुस-या लढतीत भारतीयार विद्यापीठ संघ एकतर्फी विजयी ठरला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुध्द जय नारायण व्यास विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठ संघ विजयी झाला. माधव विद्यापीठ, पिंडवाडा, राजस्थान विरुध्द गोंडवाणा विद्यापीठ संघात झालेल्या लढतीत माधव विद्यापीठ संघ विजयी झाला.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक विरुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ संघ विजयी ठरला. राजस्थान विद्यापीठ, जोधपूर विरुध्द भोपाळ विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात राजस्थान विद्यीपीठ संघ विजयी ठरला.

## सुवर्णपदक प्राप्त मंजिरी गावंडेचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

१९ वर्षाखालील राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर यांनी मंजिरी अमित गावंडे हिचा घरी जाऊन सत्कार केला व तिचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सॉफ्टबॉल या क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी करून मंजिरी अमित गावंडे हिने नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले



होते.राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना १९ वर्षीय मुलींच्या सॉफ्टबॉल स्पर्धेत मंजिरी गावंडे हिने उत्कृष्ट कामगिरी करून राज्याचा नावलौकिक वाढवून क्रीडा रसिकांचा विश्वास सार्थकी लावला. बिहार,पंजाब व हरियाणा यांना पराभूत केल्यानंतर अंतिम सामन्यात दिल्लीचा पराभव करून महाराष्ट्र संघाने अजिंक्यपद प्राप्त केले.नागपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय मुलींच्या सॉफ्टबॉल स्पर्धेत मंजिरीने सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मंजिरी ही श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील इयत्ता बारावीची विद्यार्थिनी आहे. भविष्यातही असेच यश प्राप्त करत रहा असा शुभाशीर्वाद देऊन केशवराव मेतकर यांनी मंजिरीचा सत्कार केला. यावेळी शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद माजी प्राचार्य एकनाथराव गावंडे, प्रा.डॉ.अमित गावंडे प्रा. डॉ.मनीषा गावंडे, सुमित गावंडे, स्मिता गावंडे, यांच्यासह परिवारातील अन्य सदस्य उपस्थित होते.

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाची शंभर वर्षे त्याग, संघर्ष व बलिदानाची

### कॉ. तुकाराम भस्मे येथे प्रतिपादन




**कुऱ्हा/वार्ताहर**

एकाच वेळी जमीनदारी व्यवस्थेच्या विरोधात, किसान -मजुरांचा लढा ,रोजच्या भाकरीसाठी लढा ,लढतच स्वातंत्र्याची लढाई लढलो. निजामशाही विरुद्ध मराठवाडा मुक्ती संग्राम, पोर्तुगीजांचे विरुद्ध गोवा मुक्ती संग्राम व या देशातील सत्ता न सोडलेल्या संस्थानांच्या विरुद्ध कम्युनिस्टांनी लोक लढा उभारला. स्वातंत्र्यानंतर ही भांडवलदारी समाज व्यवस्थेची देण म्हणून कष्टकरी जन विभागाचे प्रश्न जैसे थे होते .७०% जनविभाग शेतीवर अवलंबून असलेल्या देशात सिलिंग, पेन्शन ,वनाधिकार, सावकार शाही विरोध, बँकेचे राष्ट्रीयकरण, रोजगार, शिक्षण , मनरेगा ह्याकरीता सातत्याच्या संघर्ष सुरूच आहे. पक्षाची शंभर वर्षे त्याग, संघर्ष व बलिदानाची आहे .असे प्रतिपादन कॉ.तुकाराम भस्मे यांनी कुऱ्हा येथील शताब्दी वर्षानिमित्त झालेल्या २५ जाने.२६ च्या जाहीर सभेत अध्यक्ष स्थानावरून केले.

शताब्दी सोहळ्याचे निमित्ताने प्रमुख अतिथी कॉ.शाम काळे नागपूर व जिल्हा सचिव कॉ. सुनील मेटकर यांनी आपले विचार तळफदारपणे मांडले.प्रास्ताविक तालुका सचिव कॉ. प्रकाश सोनोने, संचालन देवेंद्र बावने (शाखा सचिव), आभार कॉ.सलीमखा पठाण (उपसरपंच) यांनी मांडले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता कॉ. राजाभाऊ बाभुळकर (मा.उपसरपंच) रवींद्र नारळे, सुधाकर मानकर ,सुधाकर वैद्य, यादवराव पाखरे, अनंतराव पाखरे, अशोक काळे ,मनोहर वाढनकर, जितेंद्र कोरडे यांचे सह कार्यकर्त्यांनी श्रम घेतले. धामणगाव ,तिवसा ,चांदूर ,अमरावती, नांदगाव व मोर्शी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## राष्ट्रीय रॅकेथॉन स्पर्धेत जी एच रायसोनी विद्यापीठाची चमू विजयी

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती (जीएचआरयूए) च्या विद्यार्थ्यांच्या 'पॉवर आयक्यू' या संघाने राष्ट्रीय स्तरावरील इनोव्हेशन अँड डिझाइन स्पर्धा रॅकेथॉन २०२६ मध्ये प्रथम क्रमांक पटकावला. आपली सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि उद्योजकतेचे दमदार प्रदर्शन करत या संघाने स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले.

दुसऱ्या क्रमांकावर पुण्यातील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील संघ तर तिसऱ्या क्रमांकावर अमरावतीतील पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथील संघाने बाजी मारली. जीएचआरयूएच्या अंजनगाव बारी रोड येथील मुख्य इमारतीच्या प्रांगणात आयोजित समारोहात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायस्वाल आणि विद्यार्थी कल्याण



विभागाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांनी विजयी संघांना सन्मानित केले.या स्पर्धेत देशभरातील विविध विद्यापीठातले आणि महाविद्यालयांच्या एकूण ७८ संघात जवळपास ३७३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेदरम्यान सहभागींनी आपल्या कल्पनांना तांत्रिक कौशल्याच्या जोरावर मूर्त स्वरूप देत एकापेक्षा एक नाविन्यपूर्ण मॉडेल्स सादर केले. नवउद्योगांना चालना देणे आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

स्पर्धेच्या परीक्षणासाठी एक प्रतिष्ठित निर्णायक मंडळ कार्यरत होते. यामध्ये डॉ. अमित गडेकर (एमआयटी-एडीटी युनिव्हर्सिटी, पुणे), डॉ. निसर्ग गांधेवार (रामदेव बाबा युनिव्हर्सिटी, नागपूर), प्रा. आशीष ठेटे (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, अमरावती), डॉ. अनिरुद्ध शेलोडकर (संस्थापक, इनेक्सडेटा टेक्नॉलॉजी प्रा. लि.), डॉ. प्रीतम गोहात्रे (आयटी व्यावसायिक), डॉ. प्रेमचंद अंभोरे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती), प्रा. योगेश्वर कुरवाडे (संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय), डॉ. ए. एस. मानेकर (मौली ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, शेगाव) आणि अमित सावरकर (लिटस ब्रोस प्रा. लि.) यांचा समावेश होता. या मंडळाने कसून मूल्यमापनानंतर विजेते संघांची निवड केली.प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या 'पॉवर आयक्यू' संघात जी.एच. रायसोनी युनिव्हर्सिटी, अमरावती येथील विद्यार्थी प्रथमेश राजेश सपाटे, श्रेयश पाचडे आणि

## संघर्ष योद्धा समितीतर्फे 'परीक्षेचा रणसंग्राम' मार्गदर्शन शिबीर

**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील १०वी आणि १२वी हे टप्पे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. या परीक्षांचा ताण कमी करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने 'संघर्ष योद्धा समिती' तर्फे अवधुत महाराज मंदिर, महाजनपुरा, अमरावती येथे 'परीक्षेचा रणसंग्राम' या विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात प्रामुख्याने १०वी मध्ये ९४% गुण मिळवून नुकताच उत्तीर्ण आयुष हिरुळकर आणि १२वी मध्ये ८४% गुण मिळवून उत्तीर्ण झालेली वैष्णवी घोरे यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी आपला अनुभव सांगताना पेपर कसा सोडवावा आणि परीक्षेच्या दिवसात अभ्यासाचे नियोजन कसे करावे, याबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शन 'स्पार्क माइंड्स स्टडी सेंटर'चे संचालक रुपेश नांदुरकर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अत्यंत आवश्यक अशा तीन मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले: १. तणाव व्यवस्थापन (परीक्षेची भीती कशी घालवावी); २. पेपर प्रेझेंटेशन (उत्तरपत्रिका सुवाच्य आणि मुद्देसूद कशी लिहावी); आणि ३. वेळेचे नियोजन (मर्यादित वेळेत संपूर्ण पेपर कसा पूर्ण करावा). याप्रसंगी विक्रीकर अधिकारी सौरभ सावरकर यांनी आपल्या प्रशासकीय अनुभवातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शिक्षण क्षेत्रात यश संपादन केलेले समितीचे पदाधिकारी शुभम सावरकर व मुकेश बोरकर यांनीही आपले विचार मांडून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी संघर्ष योद्धा समितीचे सदस्य सागर बोरकर, कुणाल नांदुरकर, आदित्य सावरकर, मनोज विजयकर, जय सावरकर, नयन विजयकर, आयुष सावरकर, अतुल बोरकर आणि विकी गायकवाड यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेत आपल्या शंकाचे निरसन केले आणि या उपक्रमाचे कौतुक केले.



# कृषी सेवा केंद्रांना युरिया खत विक्री बाबत मार्गदर्शन करा

## कृषी सेवा संचालकांचे विभागाला निवेदन

**ब्राम्हणवाडा थडी/वार्ताहर**

चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथील कृषी सेवा केंद्र धारकांना युरिया खत विक्री करताना अनेक प्रकारच्या अडचणींच्या समस्यांचा सामोरे जावे लागत आहे.युरिया खत पुरवठा कंपनी,तसेच तांत्रिक अडचणींमुळे कृषी केंद्र धारकांसह शेतकरीही आता अडचणीत सापडला आहे.त्यामुळे शि.कसबा येथील सर्व कृषी केंद्र संचालकांनी तालुका कृषी अधिकारी,चां.बा.यांना युरिया खत विक्री बद्दल मार्गदर्शन



करा,असे संयुक्त निवेदन देण्यात आले आहे.या निवेदनातून प्रत्यक्ष परिस्थिती व अडचणी समोर आल्या आहे.

निवेदनात म्हटल्यानुसार शेतकऱ्यांची युरिया खत मागणीनुसार कृषी केंद्रमध्ये उपलब्ध नाही,त्यामुळे परिसरातील गहू व अन्य पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना गरजेनुसार कृषी केंद्र मध्ये खतपुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांची भटकंती सुरू झाली आहे.पिकाला वेळेवर खत न मिळाल्याने उत्पादनात घट होण्याची भीती निर्माण झाली आहे.अनेक कृषी केंद्रांमध्ये युरिया खताचा माल नाही.सातबारा क्षेत्र पाहून किती रासायनिक खत द्यावे,याबद्दल कृषी अधिकाऱ्यांनी दुकानदारांना मार्गदर्शन द्यावे,अशी मागणी कृषी केंद्र संचालकांनी शासनाला केली आहे.कृषी विभागाने युरिया पुरवठ्याचे योग्य नियोजन, रॅक उपलब्धता,POS प्रणाली यांवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

■ शिरजगाव कसबा येथील कृषी विक्रेते यांचे निवेदन प्राप्त झाले, त्यांना युरिया खरेदी करताना कंपनी कडून लिंकिंग करण्यात येते, तसेच युरिया चा पुरवठा कमी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तरी त्यांच्या अडचणी वरिष्ठ कार्यालयाकडे मांडून येत्या २ ते ३ दिवसात खताचा पुरवठा करण्यात येईल अशी ग्वाही देण्यात आली.

**प्रवीण मोहोड**
तालुका कृषी अधिकारी, चां.बा.

## संक्षिप्त

### शुक्रवारी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर

**अमरावती**-स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या आणि अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांसाठी जिल्हा प्रशासनातर्फे शुक्रवार ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनात विशेष स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नुकतेच यश संपादन केलेले दोन अधिकारी विद्यार्थ्यांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. २०२२ बॅचचे भारतीय वन सेवेत निवड झालेले प्रांजल चोपडे आणि २०२४ बॅचचे भारतीय पोलिस सेवेत निवड झालेले सागर भामरे मार्गदर्शन करणार आहेत. दोन्ही मार्गदर्शक अभियांत्रिकी पार्श्वभूमीचे असून त्यांनी अत्यंत कमी वेळात यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेत यश मिळवले आहे. त्यामुळे त्यांचा अनुभव नवोदित विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहे.जिल्हा प्रशासनाने हे शिबिर पूर्णतः विनामूल्य ठेवले असून, परीक्षेची रणनीती, अभ्यासाचे नियोजन आणि मुलाखतीची तयारी या विषयांवर शिबीरात सखोल चर्चा केली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी मुदत

**अमरावती**-भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शुक्रवार, ६ फेब्रुवारीपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रुटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी, विद्यार्थ्यांची राहील. तसेच दि. ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत स्वत: उपस्थित राहून त्रुटी पूर्तता करून घेणेसाठी कार्यशाळेचे आयोजन सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

### पेंशन अदालतीचे आयोजन

**अमरावती**-नागपूर येथील महालेखापाल कार्यालय आणि कोषागार कार्यालयातर्फे पेंशन समाधान मोहिमेंतर्गत पेंशन अदालतीचे आयोजन गुरूवार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात करण्यात आले आहे.यामध्ये निवृत्ती वेतनविषयक प्रणालीमध्ये निवृत्ती वेतन प्रस्ताव तयार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच दुपारी २.३० वाजता सर्व निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांना त्यांचे निवृत्ती वेतनाबाबत अडचणी असल्यास महालेखापाल यांचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. याची सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, तसेच निवृत्ती वेतनधारक तथा कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनी उपस्थित राहून अडचणीचे निराकरण करावे, असे आवाहन कोषागार कार्यालयाचे सहायक संचालक अमोल इखे यांनी केले आहे.

### ग्रामसेवकांसाठी 'जेंडर इक्वॅलिटी' प्रशिक्षण



**अमरावती**-महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे 'जेंडर ट्रान्सफॉर्मेटिव्ह मेकॅनिझम' प्रकल्पांतर्गत ग्रामसेवकांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण पार पडले. 'जेंडर सेन्सिटायझेशन' आणि 'जेंडर बजेटिंग' यावर हे प्रशिक्षण पार पडले.

मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांनी प्रशिक्षणाचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, विभागीय सल्लागार राजू इंगळे, पवन देशमुख, माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ. रंजन वानखडे, साधन व्यक्ती. आनंद पवार आणि अकोलाचे जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे उपस्थित होते.मोहपात्रा यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व सांगून ग्रामसेवकांनी 'जेंडर सेन्सिटायझेशन'साठी आपल्या कार्यक्षमतेचा वापर करावा, असे आवाहन केले. बायस यांनी ग्रामपंचायतीच्या कार्यप्रणालीविषयी मार्गदर्शन केले.डॉ. रंजन वानखडे यांनी प्रास्ताविक केले. राजू इंगळे यांनी माविमची पार्श्वभूमी सांगितली. आनंद पवार यांनी प्रशिक्षणाचा उद्देश आणि स्वरूप स्पष्ट केले. वर्षा खोब्रागडे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा समन्वय अधिकारी ऋषिकेश घ्यार यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी उपजीविका सल्लागार अभिजित काळमेघ यांनी सहकार्य केले.

### ९ फेब्रुवारीला विभागीय महिला लोकशाही दिन

**अमरावती**-महिला व बालविकास विभागाच्या ४ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा यादृष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्यासग्रस्त, पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार येत्या सोमवारी ९ फेब्रुवारी रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्तस्तरावर, तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय तर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरावर तहसील कार्यालय या ठिकाणी माहिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तरी समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागीय उपआयुक्त ए. आर. चौधरी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# व्यवस्था परिवर्तनासह आता समाज परिवर्तनाकडे वाटचाल

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाबाबत आज समाजात सर्वदूर चर्चा सुरू आहे. भारत हे हिंदुराष्ट्र आहे, संघटनेतच शक्ती आहे आणि संघटनेनेच सर्व काही शक्य होऊ शकेल या सिद्धांतांना मनांत ठेवून संघ संस्थापक परमपूजनीय डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार यांनी विजयादशमी १९२५ला संघरूपी एक रोपटे लावले होते. आपला देश पारतंत्र्यात गेला तो समाजाच्या आत्मविस्मृत व असंघटित स्थितीमुळे. त्या परिस्थितीतून समाजात आत्मविश्वास निर्माण करीत 'हिंदू' म्हणून संघटित करण्यासाठी डॉक्टर हेडगेवार यांनी एक तंत्र दिले. ह्या शाखा तंत्रामुळे समाजात स्वाभिमानाने, स्वयंप्रेरणेने कार्य करणारे नि:स्वार्थ कार्यकर्ते निर्माण झाले ज्यांनी अथक परिश्रमाने व समर्पण भावनेने कार्य करीत रोपट्याचे रूपांतर आज वटवृक्षात केलेले आपण पाहतो आहोत. आजही ही प्रक्रिया अव्याहतपणे, अभंगपणे सुरू असून समाज परिवर्तनाच्या टप्प्यात येऊन पोहोचली आहे.

संघ कार्याच्या विकासाचा क्रम लक्षात घेता ढोबळ मानाने त्याची विभागणी तीन टप्प्यात केली असता पहिल्या टप्प्यात संघटन, दुसऱ्या टप्प्यात व्यवस्था परिवर्तन आणि तिसऱ्या टप्प्यात समाज परिवर्तन करण्याचा प्रयत्न आहे. प्रारंभी संघटन एके संघटन करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवीत कार्यकर्त्यांच्या निर्मितीवर भर दिला गेला. राष्ट्रभक्तीने ओतप्रोत आणि समर्पण भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच उभा झाल्याशिवाय कार्य साधता येणार नाही म्हणून संस्कारयुक्त कार्यक्रमांच्या माध्यमातून कार्यकर्ता निर्मितीची प्रक्रिया शाखेद्वारे सुरू झाली. पुढे त्यासोबतच समाजात व्यवस्था परिवर्तनासाठी विविध क्षेत्राच्या स्वरूपात विविध कार्य प्रारंभ झाली. हिंदू जीवनदृष्टीच्या आधाराने येथील व्यवस्था निर्माण व्हाव्यात यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. जसे शिक्षण व्यवस्थेत बदल होण्यास आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आले आहे. भारतीय संस्कृतीच्या प्रकाशात हे धोरण तयार झाले आहे. अर्थात हे एवढे पुरेसे नाही. तरीही काही नमुनारूप विद्यालये स्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. शिक्षण व्यवस्था शासनाच्या नियंत्रणात आहे, जखडली आहे ती मुक्त व्हावी. न्याय व्यवस्थेमध्ये पूर्वी इंग्रजांच्या काळात दंड संहिता होती जी आता न्याय संहिता झाली आहे. अनेक अनावश्यक कायदे रद्द करण्यात आले आहेत. स्वास्थ्य व्यवस्थेचा विचार केल्यास आयुर्वेदाचा प्रचार प्रसार व्यापक सुरू झाला आहे. नियमित आहार, योगासन, प्राणायाम व व्यायाम केल्यास रुग्ण होऊच नये असा प्रयत्न आरोग्यासाठी केला जात आहे. तसेच, आर्थिक, सामाजिक, अध्यात्मिक, कामगार, सहकार, सुरक्षा, शेती, भाषा, संस्कृती, कला, विज्ञान, साहित्य अशा अनेक क्षेत्रात हिंदू चिंतन आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी व्यवस्था परिवर्तनाचे कार्य प्रारंभ झाले. यासाठी निर्माण झालेल्या प्रत्येक संस्था या समान ध्येयाकडे वाटचाल करणाऱ्या असल्या तरी स्वायत्त व स्वावलंबी आहेत. त्यांची आपली भिन्न भिन्न कार्यपद्धती आहे. आज सुमारे ४२ संघटना भारतभर कार्य करीत आहेत. या संस्था/संघटना आपल्या आपल्या क्षेत्रात देशात प्रथम क्रमांकावर आहेत किंवा त्या दिशेने अग्रेसर आहेत. व्यवस्था परिवर्तनाच्या या दुसऱ्या टप्प्यासह आता तिसरा टप्पा समाज परिवर्तनाचा सुरू झाला आहे.

व्यवस्था परिवर्तन हे समाजाच्या मान्यते शिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे समाजात काही मूलभूत परिवर्तन होणे अपेक्षित आहे जेणेकरून समाज, व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने विचार करेल. प्रत्येक व्यक्ती हा केवळ स्वतःपुरता विचार न करता व्यापक दृष्टिकोन ठेवून संपूर्ण समाजाला आपले मानून समाजाच्या हितात विचार करणारा व तसा व्यवहार करणारा व्हावा. प्रत्येक व्यक्ती आपल्या राष्ट्रीय आणि सामाजिक कर्तव्यांप्रती जागृत असला पाहिजे. भारतीय संस्कृतीचा अभिमान ठेवण्याचा संस्कार त्याला कुटुंबात व शाळेत मिळावा. भारताच्या गौरवशाली इतिहासाने स्मरण ठेवत महापुरुषांचे आदर्श जीवन डोळ्यासमोर ठेवून नित्य व्यवहार करणारा असावा. प्रामाणिक, सेवाभावी, परिश्रमी, सदैव जागृत अशा अनेक गुणांनीयुक्त व्यक्तिंचा समाज निर्माण व्हावा.समाज परिवर्तनाची दिशा देतांना परम् पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी पञ्च परिवर्तनाचा विषय सर्वांसमोर ठेवला आहे. हे विषय केवळ भाषणाचे नसून व्यवहाराचे आहेत. त्यातून समाज परिवर्तनाला गती मिळणार आहे.

अ) कुटुंब प्रबोधन - भारतीय कुटुंब व्यवस्था संपूर्ण जगात आपले वेगळेपण दर्शविणारी आहे, जपणारी आहे. तीन किंवा चार पिढ्या एकत्र नांदण्याची अनेक उदाहरणे समाजात दिसतात. संस्कार, संस्कृती, जीवनादर्श इत्यादी रुजवण्याची प्रक्रिया कुटुंबातच होते. आपल्या कुटुंबातील वातावरण त्यासाठी पोषक करणे गरजेचे असते. म्हणून समाजात, कुटुंबात काही चर्चा प्रारंभ करणे आवश्यक आहे. कुटुंबातील पूर्वज कोण आहेत व त्यांचे समाजाप्रती योगदान काय होते, आपल्या कुटुंबातील चांगल्या परंपरा कोणत्या आहेत, कुटुंबात मातृशक्तीचा सन्मान होणे, आत्मीय भाव दृढ होण्यास आपापसातील संवाद वाढणे, एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणे, एक दुसऱ्यांच्या भावभावना समजून घेणे इत्यादी गोष्टी होणे आवश्यक आहेत. पुढील पिढीत योग्य संस्कार व्हावेत म्हणून घरातील जेष्ठ व्यक्तींचा व्यवहार उत्तम असला पाहिजे. प्रामुख्याने कर्तव्य पालन, सेवाभाव, देवभक्तीसह देशभक्ती, स्वच्छता, शिस्तपालन तसेच अतिथी सत्कार या विषयांचे अनुसरण मोठ्यांचे बघूनच पुढील पिढी करते.

आज मोबाईल वरील समाज माध्यमे व टीव्हीवरील अनेक कार्यक्रमांचा दुष्परिणाम होतांना दिसत आहे. त्याचा मानसिक व शारीरिक आरोग्यावरही परिणाम होताना दिसत आहे. दुष्परिणाम होऊ नये म्हणून कुटुंबात काळजी घेण्याची आवश्यकता आहे. सवायी बदलण्याची आवश्यकता आहे. अशा अनेक विषयांची चर्चा कुटुंब व्यवस्था सुदृढ करण्यास उपयोगी ठरणार आहे. कुटुंबात स्वदेशीचा व समरसतेचा भाव रुजवणे ही आवश्यक आहे. यासाठी पुढे काही करणीय गोष्टी देत आहे. १) कुटुंबातील चांगल्या परंपरांची चर्चा करणे, २) एक वेळचे एकत्र भोजन, दिवसातून एक वेळेला एकत्र भजन/पूजन/ आरती करणे, टीव्ही आणि मोबाईल बंद ठेवून सहज गप्पा मारणे, ३) एकत्र खेळणे, ४) कुटुंबाचे कुलदैवतेबाबत माहिती देऊन दर्शनाला एकत्र जाणे, ५) कुळाचार पालन करण्याची परंपरा रुजवणे, ६) विनम्र व हळू आवाजात श्रध्दापूर्वक संवाद करणे, ७) ज्येष्ठांचा आदर करणे, ८) अतिथी सन्मान, ९) शेजाऱ्यांशी स्नेहपूर्ण संबंध स्थापन करणे, १०) परिसरातील सामाजिक कार्यात सहभागी होणे, ११) सण समारंभात व उत्सव प्रसंगी भारतीय संस्कृतीचे दर्शन व्हावे असा व्यवहार करावा.

> **समाज परिवर्तनाची दिशा देतांना परम् पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी पञ्च परिवर्तनाचा विषय सर्वांसमोर ठेवला आहे. हे विषय केवळ भाषणाचे नसून व्यवहाराचे आहेत. त्यातून समाज परिवर्तनाला गती मिळणार आहे.**

ब) 'स्व' चा बोध होणे - कुटुंबातच 'स्व' चा बोध होणे म्हणजे 'आपण भारतीय आहोत' तर आपला व्यवहार कसा असावा हे सर्वांना कळणे. देशातून इंग्रज गेला तरी आपल्या डोक्यातून तो जात नाही. त्यासाठी जागृत होऊन स्वभाषा म्हणजे मातृभाषेसह इतर भारतीय भाषांचाही सन्मान करणे, आपली परंपरागत वेषभूषा, भारतीय व्यंजनांनी युक्त भोजन, भक्ती जागरणासाठी भजन-पूजन, आपल्या भवनात(घर) भारतीय संस्कृतीचे दर्शन व्हावे व भ्रमण म्हणजे कुठेही फिरायला जाताना, सहलीला जाताना केवळ पर्यटन हा उद्देश नसावा तर भारताची गौरवस्थानांना भेटी, सेवा कार्य दर्शन यांसारख्या बोधपूर्ण प्रवास करण्याचा समावेश केला जावा. त्यामुळे जागृतपणे व्यवहार केला पाहिजे. स्वदेशी वस्तूंच्या वापरासह या पूर्व उल्लेखित सहा गोष्टींवरही लक्ष द्यावे लागणार आहे. तसेच स्वभाव, स्वदेश, स्वधर्म, स्वालंबन या गोष्टीचा बोध कुटुंबात, समाजात व विद्यालयात करून देणे आवश्यक आहे. पुढील करणीय गोष्टी यासाठी मदत करतील. १) आग्रहपूर्वक स्वदेशी वस्तू घरी आणणे, २) घरी मातृभाषेत संभाषण करणे, ३) घरातील नामफलक देवनागरीत लिहिणे, ४) आपली स्वाक्षरी मातृभाषेत करणे, ५) भारतीय पद्धतीने वाढदिवस साजरा करून दान करणे, ६) मंगल प्रसंगी भारतीय वेशभूषा परिधान करणे, ७) बाजारातील वस्तू न खाता घरी विविध व्यंजने तयार करणे, ८) भारतीय साहित्य आणि विविध ग्रंथसंपदा घरी उपलब्ध असणे, ९) भारतीय संगीत ऐकणे, १०)स्वतःचे कपडे स्वतः धुणे, ११) घरच्या कामात सर्वांनी मदत करणे, १२) आपले घर हिन्दू घर ही संकल्पना रुजविणे.

क) सामाजिक समरसता - कुटुंबातून दिल्या गेलेल्या संस्कारांचे प्रतिबिंब समाजात दिसले पाहिजे. कुटुंबात हिंदू दृष्टी म्हणजे भारतीय दृष्टी देतांना आपल्या 'धर्माची' कल्पना स्पष्ट करणे गरजेचे आहे. धर्माचा अर्थ उपासना पद्धती नव्हे तर त्याचा अर्थ वेगवेगळ्या पद्धतीने घेतला जातो. गुणधर्म, कर्तव्य असा अर्थ प्रामुख्याने घेतला जातो. भारतीय चिंतनानुसार सर्वांमध्ये परमेश्वराचा अंश आहे. त्यामुळे सर्व एकच आहेत हा भाव म्हणजे, समरसतेचा भाव मनात स्थापित करणे आवश्यक आहे. मनातील संकुचित भाव म्हणजे, जाती, पंथ, भाषा, संप्रदाय, राज्य, गाव इत्यादी मुळे भेदाभेद न ठेवता आपण सगळे एक आहोत, सहोदर आहोत हा भाव निर्माण होणे व व्यवहारात येणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंब व विद्यालयात काही उपक्रम करण्याची आवश्यकता आहे जे पुढे देत आहे. १) स्वच्छता कर्मचाऱ्यांना सन्मान देणे, २) आसपासच्या विविध व्यवसाय करणाऱ्यांना सन्मानपूर्वक घरी भोजनास आमंत्रण देणे, ३) आपण विविध मंगलप्रसंगी शुभेच्छा द्यायला सर्वांकडे जाणे, ४) वस्तीतील सर्व जातींच्या लोकांच्या दुःखद प्रसंगी सहभागी होणे, ५) विद्यालयातील व्यवहार सर्वांशी आत्मीयतेचा करणे, ६) सेवावस्तीत संपर्क करणे, ७) विद्यालयातील विद्यार्थ्यांना सेवा वस्तीचे दर्शन घडविणे, ८) आपल्याशी संपर्कात येणाऱ्या सर्वांशी सहज आणि प्रेमपूर्वक वर्तणूक करणे. ९) याशिवाय गावागावात मंदिरात सर्व जातीच्या लोकांना प्रवेश, एक पाणवठा आणि एक स्मशानभूमी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

ड) नागरी कर्तव्यांचे पालन - समाजाची धारणा ही धर्माच्या पालनाने होते. समाजातील व्यवहार नीट चालावा म्हणून काही नियम व कायदे बनवले जातात. त्या नियम व कायद्यांचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकाने आपापल्या धर्माचे नीट पालन केले तर समाज सुखी, समृद्धी, दोषरहित, सुदृढ व संपन्न होईल. त्यासाठी प्रत्येकाचे मन बनवण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या विषयाची चर्चा कुटुंबात व विद्यालयात करून असे नियमांचे पालन करणाऱ्या व्यक्तींची उदाहरणे समोर दिसणे गरजेचे आहे. त्यामुळे नागरिक कर्तव्यांचे पालन स्वतः पासून प्रारंभ करून अनेकांसमोर आपले स्वतःचे उदाहरण समोर ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठीही ज्या बाबी केल्या पाहिजेत त्याचेही संकलन पुढे देणार आहे. १) संविधानाचे पालन करणे, २) विविधतेत एकता आहे याचे भान ठेवीत आपल्या समृद्ध वारशाचे जतन करावे, ३) सर्व प्रकारचे कर वेळेपूर्वी भरणे, ४) सर्व देयके वेळीपूर्वी भरणे, ५) राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान करणे, ६) वाहतुकीचे नियम पालन करणे, ७) अंध - दिव्यांग - जेष्ठ इ.ना मदत व सेवा करण्याचा स्वभाव असणे, ८) सार्वजनिक स्थानी स्वच्छतेचा आग्रह, ९) सार्वजनिक स्थानी सर्व नियमांचे पालन करणे (रांगांमध्ये जाणे, हळू आवाजात बोलणे, मोबाईलचा आवाज छोटा ठेवणे इ.), १०) प्रवासासाठी साधारणतः सार्वजनिक साधनांचा वापर करणे, ११) समाजाच्या संकटकाळी कटिबद्ध होणे, १२) सार्वजनिक स्थानी अनुशासनाचे पालन होणे, १३) सार्वजनिक स्थानी सभ्य व्यवहार करणे, १४) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करावे, १५) जे कार्य करीत आहोत ते ईश्वरासाठी करीत आहोत या भावनेने कार्य करीत उत्कृष्टतेचे प्रदर्शन करावे.

इ) पर्यावरण संरक्षण व संवर्धन - आज संपूर्ण जग पर्यावरणाबाबत चिंतित आहे. भारतीय म्हणजेच हिंदू जीवन दृष्टी ही व्यष्टी, समष्टी, सृष्टी व परमेष्टी या परस्पर पूरक व परस्पर अवलंबित आहेत असेच शिकवते. त्यामुळे सृष्टीचे शोषण न करता दोहन करणे आवश्यक आहे. सृष्टीतून ओरबाडणे हा भारतीयांचा स्वभाव नाही तर मी सृष्टीला काय देऊन संतुलित राहण्यास पूरक बनू शकतो याचा विचार करणे हा आहे. त्यामुळे जल, जमीन, जंगल, जीव व जानवर या सगळ्यांप्रती आत्मीय भाव निर्माण करून त्यांच्या संरक्षण व संवर्धनाची आपली भूमिका असणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंब व विद्यालयात उपक्रम करणे आणि उदाहरणे उभी करण्याची आवश्यकता आहे. प्रत्यक्ष काय करावे याबाबत पुढे देत आहे. १) सर्वच भारतीय सण व उत्सव हे पर्यावरणाशी जोडले गेलेले आहेत ते आवर्जून साजरे करणे, २) तुळशीचे रोप आवर्जून सर्वत्र लावण्याचा आग्रह धरणे, ३) विजेचा आणि पाण्याचा वापर काटकसरीने करणे, ४) प्लास्टिकचा वापर न करणे, ५) पाठकोरे कागद वापरणे, ६) रसायनिक खतमुक्त शेती करणे, ७) भूमी सुपोषणासारखे कार्यक्रम आयोजित करणे, ८) विविध प्रकारच्या वृक्षांचा परिचय करून द्यावा (वृक्षतोड होणार नाही), ९) पशु-पक्षी, प्राणीमात्रांवर दया करणे शिकविणे, १०) ध्वनी प्रदूषण टाळणे, ११) कागद, थर्माकोल किंवा प्लास्टिक जाळू नये, १२) प्लास्टर ऑफ पॅरिसचा उपयोग करू नये, १३) ई कचरा व्यवस्थापन करणे.

उपरोक्त व्यवहारामुळे समाजात परिवर्तन येईल हे निश्चित आहे. समाजातील हे बदल व्यवस्था परिवर्तनासाठी समाजाच्या मन:स्थितीला तयार करतील, हेच अपेक्षित आहे. त्यातूनच समाजाची सुसंघटित अवस्था निर्माण होईल जी चिरकाल टिकेल. ही व्यवस्था कायम असावी व समाजाचे चिंतन योग्य दिशेने सुरू राहावे म्हणून डॉक्टर हेडगेवार यांनी दिलेल्या तंत्रातून योग्य चिंतन करणारे कार्यकर्ते तयार करावे लागणारच आहेत. मूळ कार्य करीत राहतांनाच समाजात योग्य चिंतन सुरू राहावे यासाठी पञ्च परिवर्तनासाठी प्रयत्न करावे लागतील.

**शैलेश श्रीराम जोशी**
विद्या भारती विदर्भ व देवगिरी प्रांत संघटन मंत्री
मोबाईल -७७४४९४१२३३




*उन्हाळयाची चाहूल लागली असल्याने हळूहळू आंब्याचा मोहोर बहरला आहे...*

# 'महाशिवरात्री : शिवाच्या प्रत्येक नामतत्त्वाची उपासना'

आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक जीवनात मनःशांती, स्थैर्य आणि सकारात्मकतेची गरज प्रत्येकालाच भासते. अशा काळात भारतीय संस्कृतीत पूज्य मानलेले भगवान शिव हे केवळ देव नसून, ते जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन करणारे तत्त्व आहेत. संयम, त्याग, करुणा आणि अंतर्मुखता ही मूल्ये शिवतत्त्वातून सहज समजतात. म्हणूनच आधुनिक युगातही शिवउपासना अधिक अर्थपूर्ण ठरते.

आपल्या हिंदू धर्मात शिवनवरात्र कृष्णपक्ष पंचमी ते माघ कृष्णपक्ष चतुर्दशीपर्यंत, म्हणजे ५ ते १५ फेब्रुवरी एकूण अकरा दिवस साजरे केले जाते. या काळात शिवाच्या विविध नावांमधील अध्यात्मिक अर्थ समजून घेऊन उपासना करण्यास विशेष महत्त्व आहे.'शिव' शब्दाचा अर्थ 'शिव' हा शब्द 'वश' या शब्दापासून वर्णव्यत्यास पद्धतीने तयार झाला आहे.'वश' म्हणजे प्रकाश. जो स्वतः प्रकाशस्वरूप आहे आणि संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो, तो शिव होय.शिव म्हणजे मंगलमय आणि कल्याणकारक तत्त्व. शिव म्हणजे ब्रह्म आणि परमशिव म्हणजे परब्रह्म.



शिवाच्या नावांतून जीवनमार्गदर्शन भगवान शिवाची प्रत्येक नावे ही केवळ नाव नसून, ती जीवनासाठी एक संदेश देतात.शंकर हे नाव सर्वांचे कल्याण करण्याची भावना शिकवते.महाकालेश्वर काळाचे भान ठेवून जगण्याचा बोध देतो.महादेव परिपूर्ण पावित्र्य, ज्ञान आणि साधना यांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो.भालचंद्र संयम व अंतर्मुखतेचे प्रतीक आहे, गंगाधर संकटे शांतपणे पेलण्याची शिकवण देतो, करपूरगौर शुद्धता व सात्त्विकतेचे दर्शन घडवतो.

पिंगलाक्ष त्रिकालदर्शी दृष्टीकोन दर्शवतो, अघोर भय व चिंता यांपासून मुक्त राहण्याचा संदेश देतो, तर नीलकंठ दुसऱ्याच्या दुःखासाठी त्याग करण्याची प्रेरणा देतो.आशुतोष भक्ती, नम्रता आणि श्रद्धेचे महत्त्व अधोरेखित करतो.शिवरात्रीचे विशेष महत्त्व शिवरात्रीच्या काळात शिवतत्त्व पृथ्वीतलावर हजार पटीने अधिक प्रमाणात कार्यरत असते, असे शास्त्रात सांगितले आहे. त्यामुळे या काळात 'ॐ नमः शिवाय' हा नामजप केल्यास उपासकाला अधिक आध्यात्मिक लाभ होतो. शिवपूजेत बिल्वपत्र अर्पण करताना १०८ वेळा नामजप करून ती अर्पण करावीत. तसेच शिवाला पांढरी फुले अर्पण करावीत.शिवाच्या नावांमधील अर्थ समजून श्रद्धेने उपासना केल्यास मानसिक शांतता व स्थैर्य प्राप्त होते. तणाव, भीती व चिंता कमी होतात. करुणा, संयम आणि सकारात्मकता वाढते.जीवनाकडे पाहण्याचा कल्याणकारी दृष्टिकोन तयार होतो.या शिवनवरात्रात शिवतत्त्व आत्मसात करून उपासना केल्यास, आधुनिक जीवनातही संतुलन, समाधान आणि मनःशांती निश्चितच प्राप्त होते.

**रमा देशमुख**

# ...तर सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी

वाढती महागाई, वाढता भ्रष्टाचार, वाढता औषधोपचार आणि वाढत्या प्रदूषणामुळे ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे.सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही. आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री , खासदार, आमदार यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील दिड करोड वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली आहे.

अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दु:ख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा, संघटनेचा किंवा संस्थेचा नसून सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत, मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिसून आले.आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.कारण सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.

वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नांवर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की 'आपलाच पैसा आपणच चोर'.

त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्र्न आहे की 'जगावे की मरावे' अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.

**रमेश लांजेवार,**
नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

## जनतेचे मत जाणून घ्यावे

२०२६ च्या बजेटसोबत रेल्वे बजेटही सादर करण्यात आले होते. परंतु या बचतींमध्ये अमृत भारत आणि वंदे भारत गाड्यांव्यतिरिक्त काहीही समाविष्ट नाही. कोणत्याही नवीन गाड्यांची घोषणा करण्यात आली नाही.ज्यामुळे जनता निराश झाली. पूर्वी लोक रेल्वे बजेटचे बारकाईने निरीक्षण करत.परंतु रेल्वे बचतीचे वेगळे सादरीकरण बंद झाल्यामुळे लोकांची निराशा झाली आहे. मी रेल्वे मंत्र्यांना सल्ला देऊ इच्छितो की, रेल्वे बजेट सादर करण्यापूर्वी जनतेचे मत जाणून घ्यावे आणि त्यांच्या सूचना विचारात घ्याव्यात. रेल्वे विभाग लोकांच्या चिंता जाणून घेईल.आशा आहे की, रेल्वे मंत्री याकडे लक्ष देतील.

**राजेश पी. कारिया**
अकोला

# रोजगार सेवकाला हटवण्याचा डाव उधळला

■ सावरगावात ग्रामसभेत '४५ विरुद्ध १४' स्पष्ट बहुमत
■ बबन मुळे यांना ग्रामस्थांचा ठाम पाठिंबा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव येथे गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या रोजगार सेवक बबन मुळे यांना पदावरून काढण्याचा कट अखेर उघडकीस येत पूर्णपणे फसला आहे. गेल्या तीन वर्षांपासून कथितपणे रचलेल्या षड्यंत्रातून बिनबुडाच्या तक्रारी करून त्यांना हटवण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र, चौकशीत एकही आरोप सिद्ध न झाल्याने प्रशासनालाही आजवर कोणतीही कारवाई करता आलेली नाही.

दरम्यान, रोजगार सेवकाला हटवण्याच्या उद्देशाने २६ जानेवारी २०२६ रोजी ग्रामसभा बोलावण्यात आली होती. मात्र ग्रामस्थांनी या ग्रामसभेकडे ठामपणे पाठ फिरवल्याने कोरमअभावी ती तहकूब करावी लागली.



त्यानंतर ३ फेब्रुवारी रोजी पुन्हा ग्रामसभा घेण्यात आली. या सभेत बबन मुळे यांना पदावरून काढण्याचा विषय थेट मांडण्यात आला. मात्र येथेच 'डाव उलटा' ठरला. उपस्थित ग्रामस्थांपैकी तब्बल ४५ ग्रामस्थांनी रोजगार सेवकाच्या समर्थनार्थ हात वर करून स्पष्ट भूमिका मांडली, तर त्यांच्या विरोधात केवळ १४ जणांनी हात वर केला. स्पष्ट बहुमत रोजगार सेवकाच्या बाजूने गेल्याने त्यांना हटवण्याचा प्रयत्न अक्षरशः धुळीस मिळाला.

> 'मला पदावरून काढण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून खोट्या व बिनबुडाच्या तक्रारी केल्या जात आहेत. दोनदा ग्रामसभा बोलावूनही ग्रामस्थांनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत माझ्या कामाबाबत समाधान व्यक्त केले. हा माझ्यासाठी मोठा नैतिक पाठिंबा आहे.'
>
> **- बबन मुळे**, रोजगार सेवक

या निर्णयामुळे सावरगावातील ग्रामस्थ रोजगार सेवकांच्या कामावर समाधानी असल्याचे ठळकपणे समोर आले आहे. गावाच्या विकासकामांतील प्रामाणिक सहभाग आणि कामाची दखल ग्रामस्थांनी ग्रामसभेतून घेतल्याने खोट्या तक्रारींच्या राजकारणाला जोरदार चपराक बसली आहे.

# दिवंगत लोकनेते अजितदादा पवार यांना साश्रू श्रद्धांजली

## अकोला येथे अस्थिकलश दर्शनावेळी भावनिक वातावरण



■ प्रतिनिधी | अकोला ■

दिवंगत लोकनेते, महाराष्ट्राच्या राजकारणातील जनतेचे हक्काचे नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. त्यांच्या जाण्याने सर्वसामान्य नागरिक, पक्षकार्यकर्ते तसेच सामाजिक-राजकीय क्षेत्रातील व्यक्तींमध्ये तीव्र शोकभावना व्यक्त होत आहे.

तळागाळातील जनतेच्या समस्या समजून घेणारे, त्यांच्या व्यथांना आवाज देणारे आणि निर्णयक्षम नेतृत्व म्हणून अजितदादा पवार यांची ओळख होती. त्यांच्या निर्भीड भूमिका, ठाम कार्यशैली आणि जनतेप्रती असलेल्या निष्ठेमुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर वेगळी छाप उमटवली होती. त्यांच्या निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह संपूर्ण राज्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

दरम्यान, दिवंगत अजितदादा पवार यांचा अस्थिकलश मंगळवारी जिल्ह्यात दाखल झाला. यानिमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अस्थिकलश दर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या श्रद्धांजली कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध स्तरांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.अस्थिकलशासमोर उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून, दोन मिनिटे मौन पाळत दिवंगत नेत्याला साश्रू श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा उपस्थितांनी भावपूर्ण शब्दांत गौरव केला. यावेळी अनेक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरळताना दिसून आले.

अस्थिकलश दर्शनादरम्यान संपूर्ण परिसरात शोकमय वातावरण असून, 'अजितदादा अमर रहें' अशा भावना व्यक्त होत होत्या. लोकनेते अजितदादा पवार यांच्या आठवणींनी अकोला शहर भावनिक झाले होते.



### दिवंगत लोकनेते अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशांचे विसर्जन

दिवंगत लोकनेते अजित पवार यांच्या अस्थिकलशांचे बुधवारी अकोला जिल्ह्यात शोकमय वातावरणात दर्शन घेण्यात आले. कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दर्शनानंतर आमदार अमोल मिटकरी यांच्या हस्ते अस्थिकलशांचे विधीवत विसर्जन करण्यात आले. या वेळी उपस्थितांनी मौन पाळून लोकाभिमुख नेत्याच्या स्मृतीस आदरांजली अर्पण केली. स्वतःच्या हाताने अस्थी कलश विसर्जित करताना आमदार अमोल मिटकरी भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

# थकित करापोटी मालमत्तेवर सीलची कारवाई

## महानगरपालिकेची पूर्व झोनमध्ये धडक कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेने थकबाकीदार मालमत्ताधारकांविरोधात कठोर पावले उचलत पूर्व झोनमधील एका मालमत्तेवर सीलची कारवाई केली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये व अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहायक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



पूर्व झोन अंतर्गत आठले प्लॉट, मराठा नगर, अकोला येथील वार्ड क्रमांर्क-२ मधील मालमत्ता क्रमांक २५३५ (मालक – श्रीधर मोतीराम खुमकर) यांच्याकडे सन २०१७-१८ पासून आजपर्यंत एकूण १ लाख ८ हजार ९०६ रुपये इतका मालमत्ता कर थकित होता. वारंवार नोटिसा देऊनही कराचा भरणा न झाल्याने अखेर सदर मालमत्तेवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली.

या कारवाईत जप्ती पथक प्रमुख सुधीर मिसुरकर यांच्यासह कर वसुली लिपिक राजेश साळुंखे, संतोष पांडे, दीपराज महल्ले, संतोष वेले, गणेश पद्मने तसेच सुरक्षा रक्षक संगीता शिंदे उपस्थित होते.

दरम्यान, अकोला महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांनी थकित व चालू वर्षाचा मालमत्ता कर तातडीने एकरकमी भरावा, अन्यथा सील, जप्ती व लिलावासारख्या अप्रिय कारवायांना सामोरे जावे लागेल, असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

## शेतकरी आत्महत्या प्रकरणी जिल्हा समितीची बैठक

**अकोला :** जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची सभा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत झाली. त्यानुसार १० प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरविण्यात आली.

निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हरिश देशमुख, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रतिनिधी, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रतिनिधी, पोलीस विभाग प्रतिनिधी यांच्यासह संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत १६ प्रकरणे ठेवण्यात आली. बाबी तपासून विचार करण्यात आला.

# पातुर येथे जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी पोर्टलवरील प्रशिक्षण शिबिर संपन्न

■ प्रतिनिधी | पातूर ■

जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी सी.आर.एस. पोर्टलवरील कामकाज अधिक सक्षम व वेळेत होण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, पातुर येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे आयोजन जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक डॉ. बळीराम गाढवे व पंचायत समिती पातुरचे गटविकास अधिकारी सतिष नायसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



या प्रशिक्षण शिबिरास पातुर तालुक्यातील सर्व ग्रामविकास अधिकारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहायिका, आरोग्य सहाय्यक तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डाटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन इंगळे होते.शिबिरात प्रशिक्षक कु. अंकिता गावंडे (सांख्यिकी अधिकारी), वसीम शेख (सांख्यिकी पर्यवेक्षक) व कु. पल्लवी भुईभार (डाटा एन्ट्री ऑपरेटर) यांनी सी.आर.एस. पोर्टलवर जन्म नोंदणी करताना घ्यावयाची दक्षता, लाभार्थ्यांना वेळेत जन्मदाखले मिळण्यासाठी करावयाच्या नोंदी, तसेच जन्म-मृत्यू नोंदणीस विलंब झाल्यास नियमानुसार करावयाच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती प्रोजेक्टरच्या माध्यमातून दिली.यावेळी टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियानाबाबत नितीन थुटे यांनी मार्गदर्शन केले. तसेच कुष्ठरोग जनजागृती अंतर्गत शपथविधीही पार पडला. प्रशिक्षण व शपथविधी कार्यक्रमास पंचायत समिती पातुर कार्यालयातील आरोग्य विस्तार अधिकारी श्रीमती सुनंदाताई कासार, कांबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन इंगळे, पातुरचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश लोखंडे, डॉ. साक्षी चव्हाण, डॉ. खंडाळे यांच्यासह सर्व आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका तसेच तालुका आरोग्य कार्यालयातील मनोहर घुगे व जुबेर उपस्थित होते.

# जलजीवन मिशनच्या कामात गैरव्यवहाराचा आरोप

## दिग्रस बु. येथील प्रकार; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

तालुक्यातील दिग्रस बु. येथे जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात गंभीर स्वरूपाचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थ मंगेश धोत्रे यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी ४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे. तक्रार अर्जात नमूद केल्यानुसार, प्रत्यक्षात कोणतेही काम न करता केवळ कागदोपत्री काम पूर्ण झाल्याचे दाखवून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांनी शासनाकडून देयके उचलली आहेत. या प्रकारामुळे शासनासह गावाचेही मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या प्रकरणाची दखल घेऊन उच्चस्तरीय समिती नेमून सखोल चौकशी करावी, तसेच दोषी कर्मचारी व पदाधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी मंगेश धोत्रे यांनी केली आहे. दरम्यान, तक्रारीची दखल न घेतल्यास जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या तक्रारीची प्रत मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री तसेच जिल्हाधिकारी अकोला यांना पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

# अकोल्यात शुक्रवारी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

नोकरी इच्छूक उमेदवारांना खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने दि. ६ फेब्रुवारी रोजी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.

मेळाव्यात ३ नामांकित कंपनीव्दारे एकूण ८५ पदांची भरती करण्यात येत आहे. यामध्ये दहावी, बारावी, आयटीआय, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. मेळाव्यासाठी ऑनलाईन अर्ज https://rojgar.mahaswayam.gov.in/#/home/index या वेबपोर्टलच्या करावा. दि. ६ फेब्रुवारीस मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्यास प्रत्यक्ष सकाळी ११ ते २ या वेळेत उपस्थित राहावे.

**ऑनलाईन सहभागासाठी प्रक्रिया :** www. mahaswayam. gov.in या संकेतस्थळाला भेट द्या. स्ज्न्दब्सहू या टॅबवर क्लिक करा. व्दं एावे हा पर्याय निवडून आपला सेवायोजन नोंदणी क्रमांक किंवा आधार क्रमांक व पासवर्ड वापरुन साईन इन करा. आपल्या होम पेजवरील Job Fair हा पर्याय निवडा. District Akola जिल्हा निवडून Filter बटनवर क्लिक करा नंतर दिनांकीत मेळावा निर्दनास येईल त्यासमोर असलेल्या Action बटनाच्या खाली View keApply बटन दिसेल. तद्नतंतर मेळाव्यास उपस्थित राहणारे उद्योजक व त्यांच्याकडील पदांबाबत माहिती दिसेल. आपल्या पात्रतेनुसार पदाची निवड करुन Apply बटनवर क्लिक करा. I Agree हा पर्याय निवडा. शेवटी Successfully Applied for the Job असा मॅसेज दिसेल.

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०८/२०२६ — प्रोसेस नं.८६०/२०२६
चौ.ता. ०५/०३/२०२६ — दिनांक : १९/०१/२०२६

**अर्जदार :** १. हरिभाउ नारायण वानखडे २. रामदास नारायण वानखडे दोघे रा. उगवा, ता. जि. अकोला. ३. कुसुमबाई श्रीराम ढोरे रा. मु. वरखेड, पो. सिंदखेड मोरेश्वर, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. ४. देविदास नारायण वानखडे मयत ४ अ. वेणुताई देविदास वानखडे ४ ब. मंगेश देविदास वानखडे ४ क. मनोज देविदास वानखडे ४. जोत्स्ना देविदास वानखडे लग्नापूर्वीचे नाव ज्योत्स्ना राजेन्द्र काकड लग्नानंतरचे नाव ४अ ते ४ड सर्व रा. उगवा, ता. जि. अकोला. ४ई. मनिषा गोपाल घोरड रा. चिंचोली रूद्रायणी, पो. पाटखेड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण बुलाजी वानखडे
**पत्ता :-** रा. उगवा, ता. जि. अकोला.

या अर्धीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण बुलाजी वानखडे यांचे दि. २६ / १२ / १९७९ रोजी राहत्या घरी, उगवा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जगत कल्याणासाठी भागवत - हभप वराडे

**अकोला :** भागवताची निर्मिती या भूतला वरील सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणसाठी झाली असून जो याचे नित्य श्रवण करेल त्यास प्रभू कृपा प्राप्त होऊन त्यास शाश्वत सुख प्राप्त होते.म्हणून भक्तांनी भागवतचे नित्य श्रवण करण्याचा हितोपदेश बुलढाणा येथील हभप मंगेश महाराज वराडे यांनी केला.

# चांगले संस्कार हेच यशस्वी आयुष्याची गुरुकिल्ली

## भाविकांसाठी दररोज सुरू आहे मान्यवरांची कीर्तन सेवा

■ प्रतिनिधी | बेलखेड ■

आपल्या पाल्यांवर चांगले संस्कार हेच त्यांच्या आयुष्याच्या यशाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन प्रबोधनकार संदीपपाल महाराज यांनी आपल्या कीर्तनातून येथे केले. संदीपपाल महाराजांचे किर्तन ऐकण्यासाठी परिसरातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती. संत श्री गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवानिमित्त आयोजित कीर्तनात ते बोलत होते.



बेलखेड येथे श्री संत गजानन महाराज प्रकट दिन महोत्सवानिमित्त दररोज महाराष्ट्रातील मान्यवरांची कीर्तनसेवा सुरू आहे. २ फेब्रुवारी रोजी या महोत्सवातील दुसरे पुष्प गुंफताना संदीपपाल महाराजांनी जोरदार प्रबोधन केले. १९९५ ते २००५ या दोन दशकांच्या काळात मुलगी नको या अट्टाहासापाई अनेकांनी आईच्या पोटातच मुलींचा बळी घेतला. तेव्हा केलेले हे पाप आता त्रासदायक ठरत असून प्रत्येक गावात उपवर मुलांसाठी मुली मिळणे कठीण झाले आहे, पण अशाही परिस्थितीत सर्वांनी योग्य मार्ग काढावा, युवकांनी व्यसनाच्या आहारी जाऊ नये, युवतींनी आई-वडिलांच्या विरोधात कोणतेही पाऊल उचलू नये असे संदीपपाल महाराज म्हणाले. संपत्ती गेली तर ती पुन्हा मिळवता येते पण एकदा का माणसाचे चारित्र्य खराब झाले तर ही न भरून निघणारी हानी असते, म्हणून प्रत्येकाने आयुष्यात वागताना, बोलताना संस्काराचे भान ठेवायला हवे असे आवाहनही त्यांनी आपल्या कीर्तनातून केले. महापुरुषांचा आणि संतांच्या वचनांचा दाखला देत त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा विचारच हा ग्राम विकासासाठी तारक ठरणारा आहे. त्यासाठी सत्यपाल महाराजांच्या मार्गदर्शनात आपण खंजिरी वादनातून महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्र बाहेरही प्रबोधन करत आहोत, असेही संदीपपाल महाराज म्हणाले.

बेलखेड येथे आयोजित महोत्सवामध्ये १ फेब्रुवारी रोजी हभप विठ्ठल महाराज तेल्हारकर यांचे कीर्तन पार पडले. ३ फेब्रुवारी रोजी हभप संतोष महाराज मनसुटे यांचे कीर्तन झाले तर ४ फेब्रुवारी रोजी हभप योगेश महाराज पाचपोर यांची कीर्तन सेवा पार पडली. ५ फेब्रुवारी रोजी हभप शुकदास महाराज गाडेकर आणि सहा रोजी हभप वैष्णवी किशोरीदीदी राऊत यांचे कीर्तन पार पडणार आहे. या सर्व कीर्तनांचा लाभ घेण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**SANMITRA URBAN CO-OP. BANK LTD. AKOLA**
Main Branch : Ramdas Peth, Akola - 444001

APPENDIX IV [Rule 8 (1)]

**POSSESSION NOTICE** (For Immovable Property)

Whereas, The undersigned being the authorized officer of the Sanmitra Urban Co- op Bank Ltd., Akola, under the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcemant of Security Interest (Second) Ordinance, 2002 (Ord.3 of 2002) and in exercise of powers conferred under section 13 (12) read with rule 9 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 issued a demand notice dated 17/11/2025 calling upon the borrower **M/s Metro Mobile Finance & Services Prop. Bharat Laxmanrao Wankhade** Cash Credit Account No. 175/182 Rs. 7,26,846/- and Borrower Bharat Laxmanrao Wankhade in Housing Loan Account No. 176/84 of Rs. 7,79,267/ total Rs. 15,06,113/ to repay the amount mentioned in the notice being within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrower having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower/surety and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below in exercise of powers conferred on him/her under section 13(4) of the said Ordinance read with rule 9 of the said Rules on this **30th day of January of the year 2026.**

The borrowers in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the Sanmitra Urban Co-operative Bank Ltd., Akola. for an amount Rs. 15,06,113/ along with interest thereon from dt. 16/11/2025.

**DESCRIPTION OF THE IMMOVABLE PROPERTY**

The property situated at Mouje - Naygaon Tq. & Dist. Akola with the limit of Gram Panchayat Shiloda bearing filed survey no. 26/1k converted into non- agriculture purpose vide in revenue case no. NAP/34/Naygaon/68/2003-04 D.O. 23/04/2008 in which passed Layout Plot No. 5 A admeasuring 1097.52 Sq. Ft. [102.00 Sq. Mtr. ] along with construction thereon, which is bonded as under.

East- Another Layout, West -Layout Road, North-Agriculture land of Chaursiya, South- .Plot No. 5 B

Akola
Date-30/01/2026

Seal

**Authorized Officer**
Sanmitra Urban Co-op Bank Ltd, Akola

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ६९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बजाज चौकातील दुभाजक झाले कचराकुंडी

**वर्धा/जनमाध्यम**

स्वच्छ शहर, सुंदर शहर आणि विकासाच्या गाजावाजाखाली वर्धा शहरात सुरू असलेली कामे कागदावरच राहिली असून, प्रत्यक्षात शहरातील मुख्य चौकातच अस्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. बजाज चौकातून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील रस्त्याच्या मधोमध असलेले दुभाजक आज थेट कचराकुंडीमध्ये रूपांतरित झाले आहेत.

या दुभाजकांमध्ये बजाज चौकातील भाजीविक्रेते, फळविक्रेते यांच्यासह काही सफाई कर्मचारीही थेट कचरा आणून टाकत असल्याचे दिसून येत आहे. सडलेल्या भाज्या, फळांचे अवशेष, प्लास्टिक, कचऱ्याचे ढीग यामुळे हा परिसर कायम दुर्गंधीने भरलेला असतो. या कचऱ्यावर मोकाट जनावरे खाद्य शोधत दिवसभर ठाण मांडून बसलेली दिसतात. त्यामुळे या दुभाजकाला आता जनावरांचा तबेला असेच संबोधले जात आहे.बजाज चौक हा शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग आहे. याच मार्गावरून बस स्थानक, रेल्वे



स्टेशन तसेच शहरातील प्रमुख बाजारपेठेकडे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. अशा ठिकाणी रस्त्याच्या मधोमध कचरा, जनावरे आणि दुर्गंधी यामुळे अपघातांचा धोका वाढला असून शहराच्या प्रतिमेला देखील तडा जात आहे.विशेष म्हणजे, यापूर्वी याच दुभाजकात साचलेल्या कचऱ्याला एका माथेफिरू व्यक्तीने आग लावली होती. या आगीत दुभाजकातून गेलेली स्ट्रीट लाईटची वायरिंग जळून खाक झाली होती, ज्यामुळे प्रशासनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले. एवढी गंभीर घटना घडूनही नगरपालिकेने या दुभाजकाकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचे आजही दिसून येत आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की, जर वेळेवर कारवाई झाली नाही, तर भविष्यात मोठा अपघात किंवा आगीची घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरात स्वच्छता मोहिमा, जनजागृतीचे फलक आणि दंडात्मक कारवाईचे फक्त दिखावे सुरू असून प्रत्यक्षात मुख्य चौकातच प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे.बजाज चौकातील दुभाजकातील कचरा तातडीने हटवावा, तेथे कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा आणि दुभाजक स्वच्छ व सुरक्षित ठेवावा, अशी ठाम मागणी आता शहरातील नागरिकांकडून होत आहे. आता तरी नगरपालिकेला जाग येणार का, असा प्रश्न वर्धेकर उपस्थित करत आहेत.

## मद्यधुंद कारची दुचाकीला धडक; दोघे तरुण गंभीर

**समुद्रपूर/जनमाध्यम**

तालुक्यातील उमरेड-हिंगणघाट मार्गावर धोंडगाव शिवारात कारने दुचाकीला मागाहून दिलेल्या जोरदार धडकेत दुचाकीवरील दोघे तरुण गंभीर जखमी झाले. हा अपघात दि. ३ रोजी सायंकाळच्या सुमारास घडला.

प्रवीण चौधरी व हर्षल धोटे हे दोघे दुचाकीने जामच्या दिशेने जात होते. धोंडगाव शिवारात पोहोचताच मागाहून आलेल्या एम.एच. ४६ ए.व्ही. ३०४० क्रमांकाच्या कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघेही रस्त्यावर फेकले गेले असून त्यांना गंभीर दुखापत झाली आहे.अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन जखमींना समुद्रपूर येथील रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच गिरड पोलिसांनी घटनास्थळी भेट देत अपघाताची नोंद घेतली आहे. दरम्यान, संबंधित कार चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याची चर्चा घटनास्थळी होती. पुढील तपास गिरड पोलीस करीत आहेत.

## अपघातस्थळी देवदूत ठरले वाहतूक पोलीस;

### जखमी चालकाला मिळाले नवे आयुष्य

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात माणुसकी अजूनही जिवंत आहे, याची प्रचिती मंगळवारी सायंकाळी पुन्हा एकदा आली. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे पाचच्या सुमारास सेलू-सेवाग्राम-पवनार मार्गावरील पवनार पुलाजवळ दुचाकी स्लिप होऊन एक चालक रस्त्यावर कोसळला. रक्तस्त्राव होत असताना रस्त्यावर प्राणांशी झुंज देणाऱ्या त्या इसमाकडे पाहून क्षणाचाही विलंब न करता वर्धा वाहतूक पोलिसांनी धाव घेतली आणि एका कुटुंबाचा आधार वाचवला.



पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार पेट्रोलिंगवर असलेले पोलीस निरीक्षक विलास पाटील, पोलीस हवालदार किशोर पाटील व चालक स्वप्नील तंबाखे यांनी जखमी राजेंद्र कुबळे (वय ५०, रा. सुरगाव, जि. वर्धा) यांना रस्त्याच्या कडेला सुरक्षित ठिकाणी हलविले. दुचाकी बाजूला करून तात्काळ ॲम्ब्युलन्स बोलावण्यात आली. काही मिनिटांतच जखमीस सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.वेळीच मिळालेल्या प्रथमोपचारामुळे रक्तस्त्राव आटोक्यात आला आणि मृत्यूच्या दाढेतून जखमीला परत ओढून आणण्यात पोलिसांना यश आले. घटनेची माहिती मिळताच जखमीचे भाऊ विजय कुबळे घटनास्थळी पोहोचले. जखमीचे वाहन, मोबाईल व इतर साहित्य त्यांच्या ताब्यात देण्यात आले.आज पोलिस नसते, तरष्ठअसे अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी सांगत कुबळे कुटुंबीयांनी वाहतूक पोलिसांचे मनापासून आभार मानले. दरम्यान, वाहतूक पोलिसांनी नागरिकांना हेल्मेटचा वापर करावा, वाहन सावधपणे चालवावे आणि स्वतःचा जीव जपावा, असे आवाहन केले.

## हिंगणघाटनंतर आता आर्वी पोलिस ठाण्याच्या नव्या इमारतीचा मुहूर्त

### गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेला बळकटी देणाऱ्या पायाभूत सुविधांचा नवा अध्याय सुरू झाला आहे. राज्याचे गृह राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारामुळे हिंगणघाटनंतर आता आर्वी पोलिस स्टेशनच्या नव्या इमारतीचे भूमीपूजन होणार आहे. आज ५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता आर्वी येथे हा सोहळा पार पडणार आहे.

जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या पोलिस स्टेशनच्या इमारती जीर्ण झाल्या असून त्या सध्याच्या प्रशासकीय गरजांसाठी अपुऱ्या ठरत होत्या. ही बाब लक्षात घेऊन डॉ. भोयर यांनी हिंगणघाट व आर्वी पोलिस स्टेशनसाठी नव्या इमारतींचे प्रस्ताव तातडीने पाठविण्याचे निर्देश पोलिस विभागाला दिले होते. त्यानुसार गृह विभागाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना शासनाची मंजुरी मिळून निधीची तरतूदही करण्यात आली. नुकतेच हिंगणघाट पोलिस स्टेशनच्या इमारतीचे भूमीपूजन पार पडले असून आता आर्वी पोलिस स्टेशनच्या इमारतीचा मुहूर्त ठरला आहे.

या भूमीपूजन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून खासदार अमर काळे, आमदार दादाराव केचे, अभिजीत वंजारी, सुधाकर आडबाले, सुमित वानखेडे, समीर कुणावार, राजेश बकाणे, नगराध्यक्ष स्वाती गुल्हाणे, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपवनसंरक्षक हरवीर सिंग, पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.दरम्यान, याच दिवशी आर्वी येथील महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन दुपारी ३ वाजता पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते होणार आहे. या इमारतीसाठी ७०.९५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून या कार्यक्रमास खासदार अमर काळे, आमदार सुमित वानखेडे, दादाराव केचे तसेच महावितरणचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील.तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कारंजा येथे बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी उभारण्यात आलेल्या आकांशा हाट केंद्राचे उद्घाटन दुपारी ४ वाजता डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास आमदार सुमित वानखेडे, दादाराव केचे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

## बौद्ध समाजातील संस्थांसाठी अनुदान योजना : अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत १० लाखांपर्यंत अनुदान मिळवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संस्था धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आवश्यक व नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. संस्थेच्या विश्वस्त, सदस्यांमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त, सदस्य आवश्यक आहे. संबंधित संस्थांना केवळ ५ वेळाच अनुदान अनुज्ञेय राहील.त्यानुसार इच्छुक संस्थांना योजनेचा लाभ घेण्यासाठी नमुद केलेल्या इतर अटी व शर्तीस अनुसरुन विहित नमुन्यातील परिपुर्ण प्रस्ताव आवश्यक कागदपत्रे जोडून जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे २० फेब्रुवारी पर्यंत सादर करावे. योजनेच्या अटी व शर्ती संबंधीची माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अल्पसंख्यांक विकास विभागाच्या ७ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयात देण्यात आली आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी कळविले आहे.

### १४ महिने न्यायाची फरफट

## आधुनिक सावित्रीबाई'वर शिक्षणाधिकाऱ्यांचा अन्याय;

**वर्धा/जनमाध्यम**

रत्नमाला मेंढे यांच्या पर्यवेक्षक पदोन्नतीचा आणि त्या पदाच्या वेतनाचा प्रश्न गेल्या १४ महिन्यांपासून जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवत शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने प्रशासनालाच नव्हे, तर माणुसकीलाही आव्हान दिल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. पदोन्नती असूनही वेतन नाकारून एका शिक्षिकेला मानसिक, आर्थिक आणि सामाजिक छळ सहन करावा लागत आहे.

न्याय मिळावा यासाठी मेंढे यांनी दि. ८ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान धरणे आंदोलन केले. मात्र शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांच्यावर त्याचा कोणताही परिणाम झाला नाही. अखेर या अन्यायाच्या विरोधात २६ जानेवारी २०२६ रोजी भीम आर्मी सेनेच्या जिल्हाध्यक्षांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर जिल्हाधिकारी वर्धा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तातडीची बैठक घेत शिक्षण अधिकाऱ्यांना सौ. मेंढे यांना न्याय देण्याचे स्पष्ट निर्देश दिले.याच पार्श्वभूमीवर मा. उपसंचालक, शिक्षण विभाग (माध्यमिक), नागपूर यांनी दि. २९ जानेवारी २०२६ रोजी अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या निर्णयासह स्वतःच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे लेखी आदेश दिले. यासोबतच खासदार अमर काळे, तसेच शिक्षण राज्यमंत्री व पालकमंत्री पंकज भोयर यांनीही प्रकरणात लक्ष घालून न्याय देण्याचे निर्देश दिले होते.तरीही शिक्षण अधिकाऱ्यांनी या सर्व आदेशांना केराची टोपली दाखवत १ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकरण मला मान्य नाही, असे धक्कादायक पत्र काढले आणि मेंढे यांनी न्यायालयात दाद घ्यावी, असा पळवाटीचा सल्ला दिला. वरिष्ठांचे आदेश न पाळणे, स्वतःला वरिष्ठांपेक्षा मोठे समजणे आणि जिल्ह्यात तणावाची परिस्थिती निर्माण करणे, असे गंभीर आरोप शिक्षण अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आले आहेत.या पार्श्वभूमीवर शिक्षण अधिकारी डॉ. गजभिये यांची तात्काळ बदली करून कठोर कारवाई करावी, अन्यथा भविष्यात मेंढे यांच्या जीवितास काही बरेवाईट झाल्यास मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी पुरोगामी व परिवर्तनवादी संघटनांचे समन्वयक नंदकुमार कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी **FOUZIYA TAZEEN KHAN** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील **FAUZIYA TAZEEN SALIM KHAN** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे. पत्ता :- महादेवपुरा वर्धा ४४२००१

# हिंगणघाट नावा मागचा इतिहास आणि निसर्गाशी तुटत चाललेली नाळ

**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाट हे वर्धा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. कापूस व्यापार, उद्योगधंदे आणि वाढते शहरीकरण यामुळे शहराची ओळख विस्तारत असली, तरी या शहराच्या नावामागचा इतिहास आजही तितकाच महत्त्वाचा आहे. वर्धा जिल्हा गॅझेटिअरनुसार हिंगणघाट शहराचे नाव हिंगणबेट (Balanitis aegyptiaca) या वनस्पतीवरून पडले असल्याची नोंद आहे. ही माहिती केवळ



ऐतिहासिक नाही, तर हिंगणघाटच्या निसर्गाशी असलेल्या नात्याची साक्ष देणारी आहे.

पूर्वी हिंगणघाट परिसरातील वना नदीच्या काठावर हिंगणबेटची झाडे मोठ्या प्रमाणावर आढळत होती. स्थानिक नागरिक दैनंदिन वापरासाठी नदीवर जात आणि हिंगणबेट फळांच्या साहाय्याने कपडे धुत असत. या फळांमध्ये असणाऱ्या सॅपोनिन घटकामुळे साबणासारखा फेस तयार होत असे. 'हिंगण' या वनस्पतीचा आणि नदीकाठावरील 'घाट' या भौगोलिक घटकाचा संयोग होऊन 'हिंगणघाट' हे नाव अस्तित्वात आल्याचे अभ्यासक सांगतात.हिंगणबेट ही सुमारे १५ फूट उंच वाढणारी, काटेरी व सदाहरित वनस्पती आहे. तिच्या फळांना हिंगणबेट, हिंगोट किंवा हिंगोल अशी नावे आहेत. आयुर्वेदिक आणि पारंपरिक औषधोपचारात या वनस्पतीला विशेष स्थान आहे. त्वचारोग, खोकला, पोटातील जंत, जखमांवरील उपचार तसेच बियांपासून मिळणाऱ्या तेलाचा सौंदर्यप्रसाधनात वापर केला जातो. विशेष म्हणजे नाजूक व रेशीम कपडे धुण्यासाठी हिंगणबेट फळांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असे. त्यामुळे ही वनस्पती केवळ निसर्गसंपदा न राहता लोकजीवनाचा भाग बनली होती. मात्र ज्या वनस्पतीवरून शहराचे नाव पडले, तीच हिंगणबेट आज हिंगणघाट परिसरातून हळूहळू नामशेष होत आहे. वाढते शहरीकरण, नदीकाठावरील अतिक्रमण, वृक्षतोड आणि संवर्धनाचा अभाव यामुळे या झाडांची संख्या झपाट्याने घटत आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाकडे होत असलेले दुर्लक्ष चिंताजनक असल्याचे चित्र आहे.कोणत्याही शहराचे नाव हे त्या शहराच्या इतिहासाची आणि ओळखीची खूण असते. हिंगणघाटचे नाव निसर्गाशी जोडलेले असताना त्या निसर्गाचे जतन करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. हिंगणबेट वृक्षांचे संवर्धन,जनजागृती आणि पुनर्लागवड यावर भर देणे आवश्यक आहे.शहरभूषण प्रवीण कडू यांनी अभ्यासातून मांडलेली ही माहिती हिंगणघाटच्या नागरिकांना त्यांच्या शहराच्या मूळ ओळखीची जाणीव करून देणारी आहे.

## संक्षिप्त

### पैशाच्या वादातून मारहाण; एक जखमी

**वर्धा -** पैशाच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर थेट मारहाणीत झाल्याची घटना समतानगर, वरुड येथे घडली. या प्रकरणी सेवाग्राम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वरुड येथील नितेश आनंद वानखेडे यांच्याकडे गोपाल चवरे याने ५० रुपयांची मागणी केली होती. मात्र पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वाद वाढताच गोपालने नितेश यांना मारहाण केली. या मारहाणीत नितेश वानखेडे जखमी झाले. जखमीच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधिताविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### मालवाहूच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वर्धा -** राष्ट्रीय महामार्गावर मालवाहू वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना वडनेर परिसरात घडली. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.शिवा चिन्ना रेड्डी (रा. जमलमडगू, जि. कडप्पा) असे मृताचे नाव आहे. ते वडकी येथे साहित्य खरेदीसाठी गेले होते. परतीच्या प्रवासात शिरूरकडे जात असताना मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीस धडक दिली. धडकेनंतर शिवा रेड्डी गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. वडनेर पोलिस तपास करीत आहेत.

### ट्रकच्या अपघातात चालक जखमी

**वर्धा -**.सेलसुरा शिवारात ट्रकचा अपघात होऊन चालक जखमी झाल्याची घटना घडली. या अपघाताने परिसरात एकच खळबळ उडाली होती.भास्कर राघोबाजी कांबळे (वय २९, रा. पिंपळदरी, जि. नांदेड) असे जखमी चालकाचे नाव आहे. ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्यालगत पलटी झाले. या अपघातात चालक भास्कर कांबळे गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करून त्यांना रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून अपघाताचे नेमके कारण शोधण्यास सुरुवात केली आहे.

### दुचाकीवरून पडल्याने महिलेचा मृत्यू

**वर्धा -** दुचाकीवरून तोल जाऊन पडल्याने गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना उमरी (मेघे) परिसरात घडली.बेबी अरुण वाढोणकर (वय ६२, रा. त्रिमूर्तीनगर, उमरी मेघे) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या दुचाकीवरून प्रवास करीत असताना अचानक तोल जाऊन रस्त्यावर कोसळल्या. या घटनेत त्यांना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. रामनगर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### सावंगी मेघेत व्यक्तीची आत्महत्या

**वर्धा -** सावंगी (मेघे) येथे गळफास घेऊन एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.महेश राहुरकर (वय ४३, रा. भीमनगर, सावंगी मेघे) असे मृताचे नाव आहे. त्यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### सेलू काटे येथील युवकाची आत्महत्या

**वर्धा -** नजीकच्या सेलू काटे येथील युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.अंकुश महादेव पेंदोर (वय २६, रा. सेलू काटे) असे मृत युवकाचे नाव आहे. त्यांनी राहत्या घरात गळफास घेतल्याचे कुटुंबीयांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच सावंगी (मेघे) पोलिस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

### कीटकनाशक प्राशनाने व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा -** शेतात कीटकनाशक प्राशन केल्याने एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना वडगाव (पांडे) शिवारात घडली. अमित विश्वेश्वर डाखोरे (वय ४६, रा. सायखेडा, ता. आर्वी) असे मृताचे नाव आहे. शेतात काम करत असताना त्यांनी कीटकनाशक प्राशन केल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी त्यांना तत्काळ सावंगी येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

### विहिरीत पडून युवकाचा मृत्यू

**समुद्रपूर -** तोल जात विहिरीत पडल्याने युवकाचा मृत्यू झाल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील बोडखा येथे घडली. विठ्ठल भीमराव आडे (वय २८, रा. बोडखा) असे मृत युवकाचे नाव आहे. विहिरीजवळ काम करत असताना त्याचा तोल गेला आणि तो थेट विहिरीत कोसळला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी मदतीचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत युवकाचा मृत्यू झाला होता. समुद्रपूर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ७१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आज पत्रकारांसाठी मोफत आरोग्य शिबिर
## आयुष्मान कार्ड काढण्याची सुविधा

**अमरावती :** पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्यांसाठी अमरावती जिल्हा पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात होणार आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकार, प्रसारमाध्यम कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी शिबिर पूर्णतः मोफत असणार आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्यांना विविध तपासण्यांची सुविधा एकाच छताखाली मिळणार आहे. आरोग्यविषयक चाचण्यांमध्ये संपूर्ण रक्त तपासणीसाठी लिपीड टेस्ट, फुल बॉडी चेकअप, नेत्र तपासणी आणि दंत चिकित्सा यांचा समावेश आहे. याठिकाणी केवळ तपासणीच नाही, तर तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्याबाबत मार्गदर्शनही केले जाणार आहे.

यासोबतच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिबिरात 'आयुष्मान कार्ड' काढण्याची विशेष सोय करण्यात आली आहे. यासाठी पत्रकारांनी आपले रेशन कार्ड, आधार कार्ड आणि आधारशी लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील पत्रकारांनी आपल्या कुटुंबासह याचा लाभ घ्यावा, तसेच अधिक माहितीसाठी ९०२८६ ५५५५९, ९८२२४ ९६९७२ किंवा ९८८११ ०२०८० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पालकमंत्री कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# शहरात कलम ३८ लागू

**अमरावती :** जिल्ह्यात आगामी काळात सण, उत्सव साजरा होणार आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलीस अधिनियमांतर्गत शहरात कलम ३८ लागू झाले आहे. आगामी काळात विविध धर्मियांचे सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातील. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३८ नुसार सर्व ग्रामीण जिल्ह्यामध्ये परिसरातील व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना (पोलीस आयुक्तलांचे क्षेत्र वगळून) आजपासून, दि. २ फेब्रवारी ते ३१ डिसेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण विशाल आनंद यांनी दिले आहे.

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Quotation/Enquiry Notice**

Separate sealed quotations in prescribe forms are invited for execution of enquiry for ,, 1) Labour contract work for sweeping and cleaning of 33 KV Rahatgaon, Navsari, Congress Nagar & section offices in S/Stn premises, Vidhyut Bhavan, Wadali S/Stn under O&M Urban S/Dn No. I under Urban Division, MSEDCL, Amravati. **(EE/U/Amt/T/368 Dt. 03.02.2026) Last date for Submission of quotation -10.02.2026.**

EXECUTIVE ENGINEER,
PRO. 39/2026 URBAN DIVISION, MSEDCL, AMRAVATI

**JIJAU COMMERCIAL CO-OP BANK LTD. AMRAVATI.**
"Jijau" Plot No.33, 34, Walcut Compound, Amravati
Phone No.2560057, 2570056,
Email Id : itm@jijaubank.bank.in | Web site : www.jijaubank.bank.in

**Quotations Calling For UPS Purchasing**

Jijau Bank invites quotations for purchasing Online UPS – 3 KVA/72V(01 Qty.) for our Achalpur Branch. Experience vendor can submit their quotation on or before 09/02/2026 at Head Office between office time10.00 A.M. to 5.00 P.M. or mail your proposal on **itm@jijaubank.bank.in.**

Chief Executive Officer

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८/२०२६
**श्रीमती पंचफुला अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.२८.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Panchfula Narayanrao Wadhai (Wife) Age 78 Yrs. Occu.: Household
2. Dnyaneshwar Narayanrao Wadhai (Son) Age 61 Yrs. Occu.: Labourer
3. Ganesh Narayanrao Wadhai (Son), Age 55 Yrs. Occu.: Labourer
4. Laxman Narayanrao Wadhai (Son), Age 49 Yrs. Occu.: Labourer
   Appli.No.1 to 4 R/o Kalyan Nagar Lane No.10, Amravati.
5. Lata Hanuman Shende (Daughter), Age 57 Yrs. Occu.: Household
   R/o Hawaldar Pura, Gujrati Bhawan, Wardha, Tq.Dist.Wardha
6. Sunanda Vitthalrao Mahadole (Daughter) Age 65 Yrs. Occu.: Household
   R/o Opposite Gram Panchayat Sindi Meghe, Wardha, Tq.Dist.Wardha

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नारायण सोमाजी वाढई** हे दिनांक 16.10.2021 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पंचफुला अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पंचफुला अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.३४४/२०२५ ने.ता.०७.०२.२०२६

**अर्जदार :** १. चित्रा अनिलराव तायडे
२. रेवती अनिलराव तायडे
३. पार्थ अनिलराव तायडे
सर्व रा.वार्ड नं.३, नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावता

-- विरध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत अनिल दत्तात्रय तायडे** यांचा मृत्यू दिनांक १२.०८.२०१२ रोजी नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे. अर्जदार नं.२ ही मुलगी व ३ हा मुलगा आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,क.स्तर
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४/२०२६ ने.ता.१०.०३.२०२६

**अर्जदार -**
१. मेघनाताई प्रशांतराव वानखडे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. चि.युवराज प्रशांत वानखडे, वय १३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
द्वारा अज्ञान पालनकर्ता आई सौ.मेघनाताई प्रशांतराव वानखडे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
दोघेही रा.धरमालपुरा. तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- वि --

**गैरअर्जदार - निरंक**

**अर्ज - हिंदू मायनॉरिटी आणि गार्डीयनशिप अधिनियम १९५६ चे कलम ८ व सह गार्डीयनशिप आणि वार्डस् अधिनियम १८९० चे कलम २९ अन्वये अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नांवे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता ट्रान्सफर करण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा न्यायाधीश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे--

**संपत्तीचे वर्णन**

नोंदणी पोटतुकडी भातकुली विभाग जिल्हा परिषद, अमरावती ग्रामपंचायत राजेगावचे हद्दीतील मौजा राजेगांव, ता.भातकुली, जि.अमरावती च्या हद्दीतील शेत गट नं.३६, भोगवटदार वर्ग-१, आकार रु.९.२२ पैसे मधील शेत ज्याचे संपूर्ण क्षेत्रफळ १ हे.५६ आर, पोटखराब १२ आर, खाते नं.५५८ शेतजमीन, कोरडवाहू सालीम झाडाझुडपासह व इत्यादी तदंगभूत वस्तू ज्याची सदरची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

पुर्वेस - रस्ता
पश्चिमेस - श्री.तंतरपाळे यांचे शेत
उत्तरेस - श्री.ओळंबे यांचे शेत
दक्षिणेस - श्री.सोळंके यांचे शेत

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द व मालमत्तेबाबत कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकास जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी दि.१०.०३.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०४.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३१/२०२६
**श्याम व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२४.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shyam Mahadevrao Deshmukh, Age 65 Yrs. Occu.: Business
2. Khush Shyam Deshmukh, Age 20 Yrs. Occu.: Education
   All R/o Shriram Apartment 1, Dastur Nagar Road, Lalit Yoga Colony, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वर्षा श्याम देशमुख** हे दिनांक 26.08.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्याम व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **स्श्याम व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५५/२०२६ ने.ता.०७.०३.२०२६

**अर्जदार -** १. श्री.शशांक बबनराव ठाकरे,
वय ५८ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
रा.माळीपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
ह.मु.तपोवन गेटजवळ गंगोत्री नगर, कॅम्प, अमरावती ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे बबन मारोतराव ठाकरे** हे दि.**१४.१२.२०२१** रोजी अमरावती, ता. जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारांची आई नामे **लिलाबाई बबनराव ठाकरे** ही दिनांक **२७.०६.२०२२** रोजी अमरावती, ता. जि.अमरावती येथे मयत झाली. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.०२.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८७९/२०२५
**सोनल -वि- निरंक**
पुढील ता. / /२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sonal Subhashrao Funde @ Smt.Sonal Sagar Darade
   Age 34 Yrs. Occu.: Housewife
   R/o C/o Subhashrao Funde Udapurkar Layout Ambika Nagar, Amravati
2. Shivadnya Sagar Darade, Age 05Yrs. Occu.: Education
   Appli.No.2 being minor through legal guardian mother i.e.Appli.No.1
   R/o Shri Jai Amba Garden City Mogra Building V.M.V.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सागर रामनाथ दराडे** हे दिनांक 22.10.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सोनल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोनल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि.अमरावती याचे न्यायालय**

आर.एम.जे.सी.क्र.१७/२०२६ ने.ता.०२.०३.२०२६

**जाहिरनामा**

**अर्जदार :**
१. **छाया गोपाळ वानखडे,** वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.युनिट नं.४, प्लॉट नं.१०५,श्री गणेश निवास, सेक्टर १२, नवी मुंबई,वाशी ठाणे
२. **मुकुंद पुरुषोत्तम शिलणकर**, वय ६८ धंदा - शेती
रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. **संध्या प्रकाश वानखडे,** वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बी.६०२, दिपाश्री को है सोसायटी लिमिटेड, वीर देसाई रोड अंधेरी स्पोर्ट्‌स कॉम्प्लेक्स जवळ, अंधेरी वेस्ट, मुंबई आझाद नगर
४. **अनंत पुरुषोत्तम शिलणकर**, वय ६४ वर्षे, धंदा - शासकीय सेवानिवृत्त
रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
५. **हेमंत पुरुषोत्तम शिलणकर**, वय ६० वर्षे, धंदा-शेती
रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

या नोटीसव्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, छाया गोपाळ वानखेडे व इतर यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २, अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **पुरुषोत्तम गोविंदराव शिलणकर**, यांचा मृत्यू दिनांक २६/०९/२०१६ रोजी व **प्रमिला पुरुषोत्तम शिलणकर** यांचा मृत्यू दिनांक ११/११/२०२४ रोजी मौजा घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचे शिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही. असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरील प्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.०२ माहे फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

## चौकशीची जाहीर नोटीस

**(नमुना क्र.०२)**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती २ रा मजला, मालटेकडी समोर, टोपे नगर गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती**

| | |
|---|---|
| फेरफार अहवाल/अर्ज क्र. | **255/2025** |
| सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक | **स्व.विनायकराव उपाख्य दादासाहेब कोरडे स्मारक सेवा समिती करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** |
| बाबत अर्जदार - | **प्रतिक साहेबराव भुसारी** |

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) **जंगम मिळकत (वर्णन) :- ५०००/-**
(ब) **स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक १४.०१.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक, (न्यायशाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४३/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार :**
१. शेख रफिक शेख आजम, वय ७० वर्षे, धंदा - शेती
२. शेख शम्बीर शेख आजम, वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी
३. शेख साबीर शेख आजम, वय ५८ वर्षे, धंदा - शेती
४. शेख युनुस शेख आजम, वय ५० वर्षे, धंदा - शेती
५. शेख युसुफ शेख आजम, वय ४४ वर्षे, धंदा - शेती
६. शेख रशीद शेख आजम,वय ५३ वर्षे, धंदा - नोकरी
७. हूर जहा शेख हबीब,वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
८. दानिश कमर शेख हबीब, वय २४ वर्षे, धंदा - शिक्षण
९. आवेज कमर शेख हबीब, वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार क्र.१ ते ९ रा.बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक शेख आजम शेख आमद** यांचा **मृत्यू दिनांक २०.०८.२०११** रोजी रा.कुसुमांजली हॉस्पिटल, ता.जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक अफशन बी शेख आजम** हिचा **मृत्यू दि.०७/०५/२०२५** रोजी बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला.**तसेच मृतक शेख हबीब शेख आजम यांचा मृत्यू दि.११.०४.२०२३** रोजी रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.क्र.४३/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२९.०१.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**वि.२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४९/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार :**
१. राजेंद्र मारोतराव जवंजाळ, वय ६८ धंदा - शेती
रा.रतनपूर सायखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. गौकर्णा गिरधर गाठे, वय ७८ धंदा - घरकाम
रा.पांढरी खानमपूर, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत मारोतराव पायराजी जवंजाळ** हे रतनपूर सायखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे राहत होते. यांचा मृत्यू दिनांक **१८.१०.२०१२** रोजी रतनपूर सायखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मयत लक्ष्मीबाई मारोतराव जवंजाळ** ही रतनपूर सायखेडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे राहत हाती. त्यांचा मृत्यू दिनांक **१४.१०.२०१९** रोजी पांढरी खानमपूर, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती येथे झाला. त्यामुळे **मारोतराव पायराजी जवंजाळ व मयत लक्ष्मीबाई मारोतीराव जवंजाळ** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.०९.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०४८/२०२५
**सैफुला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Saifullah Khan Ahmad Ali Khan
   Age 71 Yrs. Occu.: Business
   R/o Sayyadpura, Nandgaon Peth, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शहाजहान उर्फ साजन बी** हे दिनांक 29.05.2021 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सैफुल्लाह विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सैफुल्लाह विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं.३४६/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०३.०२.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.५२/२०२६ दिनांक ०२.०३.२०२६

**अर्जदार -**
१. **सुमन शंकरराव वानखडे,** वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.राधाकृष्ण नगर, कन्हान सिवरा, नागपूर, ता.जि.नागपूर
२. **वंदना निर्गुण गवई,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
३. **किरण शांतारक्षक गवई,** वय ३९ वर्षे, धंदा - मजुरी
अ.क्र.२ व ३ रा.आराळा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. **अजय अंबादास सिरसाट,** वय ३३ वर्षे, धंदा - मजुरी
५. **मिंटू अंबादास सिरसाट,** वय ३२ वर्षे, धंदा - मजुरी
६. **निर्मला अंबादास सिरसाट,** वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
७. **सुजाता सुधीर ढोके,** वय ३९ वर्षे, धंदा - घरकाम
अ.क्र.४ ते ७ रा.दिल्ली

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार-**
१. **अरुणा विजय थोरात,** वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
२. **पल्लवी विक्की जामनिक,** वय २१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लाखपुरी, ता.मुर्तिजापुर, जि.अकोला
३. **रविराज विजय थोरात,** वय २३ वर्षे, धंदा - शिक्षण
गै.अ.क्र.१ व ३ रा.सांगळुद, ता.दर्यापूर, जि.अमरावती

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **मंजुळा जानराव थोरात** हया दिनांक ०६.०१.२०२५ रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मंजुळा जानराव थोरात** यांचे नांवे मौजा हिंगणी मिर्झापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क्र.१९४ येथील शेत जमिन होती. ती जमीन विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी धरणासाठी संपादित केली आहे.

आज दि.०३.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

प्रोसेस नं.३३६/२०२६
दिवाणी न्यायालय व स्तर, दर्यापूर
दि.०३.०२.२०२६

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.५३/२०२६ ने.ता. ०६.०३.२०२६

**अर्जदार -**
१. मुकीदा महादेव मनोहर, वय ५० वर्षे, धंदा - मजुरी
२. निरंजन महादेव मनोहर (मनवर), वय ६२ वर्षे, धंदा - मजुरी
दोन्ही रा.हिंगणी मिर्झापुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. बहिणाबाई नानाभाऊ वानखडे, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.ओवाळे आर्धाले मवाळ पुणे, ह.मु. लाईत, ता.मुर्तिजापुर, जि.अकोला

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **महादेव पुंडलिक मनोहर** हे **दिनांक १०.०५.२०१३ रोजी व** त्यांची पत्नी **कुसुम महादेव मनोहर** हया **दिनांक ११/०१/२०२३** रोजी मरण पावलेले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४३/२०२६ ने.ता.०४.०३.२०२६

**अर्जदार -** १. **धनराज अजाबराव डाखोरे,** वय ६५ वर्षे, धंदा - शेती
रा.दापोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**निल**

वरील अर्जदाराने विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s **२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट**-(८), **१८२७** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे वडिल **नामे अजाबराव नारायण डाखोरे** यांचा दि.**१६.११.२००२** रोजी दापोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच अर्जदार यांची आई नामे **सरस्वताबाई अजाबराव डाखोरे** यांचा दिनांक **०५/०२/२०२१** रोजी दापोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३१.०१.२०२६**

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, मोर्शी**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५६/२०२६ ने.ता.०७.०३.२०२६

**अर्जदार -**
१. सौ.शालिनी मनोहरराव सिसट, वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्रीमती शोभा नरेंद्रराव सिसट, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
दोघीही रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. सौ.शिलाबाई सुभाषराव संभावित, वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे मोतीराम कृष्णाजी यावले** हे दि.**२४.१२.२०१७** रोजी काटपूर (ममदापूर), ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारांची आई नामे **रंगुबाई मोतीरामजी यावलकर (यावले)** ही दिनांक **२४.०१.२०२५** रोजी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मयत झाली. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०४.०२.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०२/२०२६
**पद्मा खरात व तीन -वि- निरंक**
पुढील ता.२८.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Padma Shankar Kharat, Age 49 Yrs. Occu.: Housewife
2. Prasad Shankar Kharat, Age 31 Yrs. Occu.: Business
3. Om Shankar Kharat, Age 25 Yrs. Occu.: Education
   Appli.No.1 to 3 R/o Madhav Nagar, Near H.V.P.M.Amravati
4. Shraddha Rajiv Kawale, Age 34 Yrs. Occu.: Household
   R/o House No.286, MHADA Colony, N-2 CIDCO Sambhaji Nagar, (Aurangabad)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shankar Laxmanrao Kharat हे दिनांक 21.01.2025 रोजी **नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार Padma Shankar Kharat + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Padma Shankar Kharat + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## संक्षिप्त



### महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टतर्फे संजय वाघुळे यांचा सत्कार

**अमरावती-** महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट दर्यापूरच्या वतीने सत्यशोधक महात्मा जोतिराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह २०२५ च्या निमित्ताने खुल्या निबंध स्पर्धेचने आयोजन करण्यात आले होते. त्याचा बक्षीस वितरण सोहळा तथा कला, साहित्य, सामाजिक, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार सोहळा नुकताच दर्यापूर येथे उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमात खुल्या निबंध स्पर्धेत उल्लेखनीय यश प्राप्त केल्याबद्दल आ. गजानन लवटे तथा शिवाजी शिक्षण संस्था कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ यांच्या हस्ते प्रशस्त पत्र, पुष्पगुच्छ तथा गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन सौजन्याने स्मृतीचिन्ह देऊन संजय वाघुळे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी ट्रस्ट वतीने मार्गदर्शक अन्नसाहेब अढाळकर, निळकंठ बोरोळे, प्रदीप लांडे, रवींद्र ढोकणे आदी उपस्थित होते.



### तलाठी कार्यालयात महसूल मंडळाची ई-केवायसी कार्यक्रम


**कुऱ्हा-** वऱ्हा येथे तलाठी कार्यालयात वऱ्हा महसूल मंडळाची ई-केवायसी चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तलाठी कार्यालयात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या वऱ्हा महसूल मंडळातील २० गावातील शेतकऱ्यांची ई-केवायसी विषेश शिबिराचे आयोजन करण्यात आले शिबिराला मागदर्शन उपविभागीय अधिकारी दादासाहेब दरोडे तिवसा तालुका दंडाधिकारी तहसीलदार मयुरजी कळसे साहेब यांनी वऱ्हा मंडळातील २० गावातील शेतकऱ्याना मागदर्शन केले ई-केवायसी तसेच ई पिक पाहणी बाबत शेतकऱ्यांना माहिती दिली ज्या शेतकऱ्यांची ई के वाय सी व्हायची बाकी होती त्या शेतकऱ्यांना याच शिबिरात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली तसेच सेतू सुविधा केंद्र उपलब्ध करून देण्यात आले कार्यक्रमाला यावेळी गावातील पोलिस पाटील सुरेशभाऊ क्षिरसागर सरपंच सौ निलिमाताई गजाननराव समरित सेतू सेवा केंद्राचे संचालक सागरभाऊ उताणे पत्रकार अतुल खुळे मंडळ अधिकारी संयजजी झाढोक साहेब ग्राम महसूल अधिकारी रवीद्रजी आर परतेती (वऱ्हा) सुरजजी गेडाम (धोत्रा) शुभांगीताई आठवले (अनकवाडी) ग्रामविकास अधिकारी एस.ए केने महसूल सेवक मनिष कोरडे, श्रध्दा भोबे अवधूत चव्हाण, राजेंद्र सपाटे, उमेश तायडे, मुरली इंगोले गावकरी कार्यक्रमाला उपस्थित होते.



### संत गजानन प्रगटदिन महोत्सवात महापारायन

**ब्राम्हणवाडा थडी -** येथिल संत गजानन महाराज सेवा समिती व गावकऱ्यांच्या वतिने संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सवाचे आयोजन केले असुन या महोत्सवामध्ये श्रीमद्भागवत कथेसह किर्तन ,भारुड व गजानन विजय ग्रंथाचे महापारायन सोहळा झाला आहे. या सोहळ्याचे व्यासपीठ नेतृत्व शभदा मेटकर अमरावती यांनी केले असुन महापारायनामध्ये एकहजारावर भाविकांनी सहभाग घेतला. तसेच दररोज दुपारी २ते ६ या वेळेमध्ये श्रीमद्भागवत कथा असुन कथा प्रवक्ते प.पु.आचार्यश्री स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज, मधापुरी यांचे सुमधुर वाणीतुन होत आहे. त्याचप्रमाणे रात्री ८ते९ यावेळेत विविध किर्तनाचे आयोजन करण्यात आले. प्रा.डा.प्रशांत महाराज ठाकरे अकोला, ह.भ.प.पवन महाराज रोहनकर, झाडगाव, यांचे बहुरंगी भारुड, दि.४ ला ह.भ.प.ओम महाराज पाथरे जवळा, यांचे किर्तन, दि.५ला ह.भ.प.नारायण महाराज शिंदे, यवतमाळ व दि.६ला ह.भ.प.कु.कृष्णाई पाटिल लाजुरकर, देवरी तसेच काल्याचे किर्तन प.पु.आचार्यश्री स्वामी गजेंद्र चैतन्य महाराज यांचे दि.८ ला दु.१ते १२ या वेळेत होणार आहे. व महाप्रसाद दुपारी १२ते सांयपर्यंत आहे. तरी या पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संत गजानन महाराज सेवा समितीने केले.

### राजेंद्र याउल यांची अमरावती जिल्हाध्यक्षपदी निवड



**चांदूरबाजार -** अखिल भारतीय बारी समाज महासंघाच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा संचालक, शिरजगाव कसबा येथील रहिवासी राजेंद्र याउल यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील बारी समाजाच्या संघटनात्मक बांधणीला नवे बळ मिळणार असून समाजाला एकत्रित दिशा देण्याची मोठी जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर आहे.अखिल भारतीय बारी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेशचंद्र घोलप, महासंघाचे सचिव रुपेश याउल. तसेच महाराष्ट्र राज्याचे प्रमुख अनिल हिस्साल यांनी राजेंद्र याउल यांच्या, नेतृत्वगुणांवर आणि सामाजिक कार्यातील अनुभवावर विश्वास ठेवत ही निवड केली. यामुळे ते बारी समाजातील परिचित नाव मानले जाते. त्यांची निवड ही समाजाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

# राजकमल उड्डाणपुलाच्या कामाला मिळणार गती

## खा.बळवंत वानखडे यांची पत्रकाद्वारे माहिती : प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळणार लवकरच

**अमरावती/का.प्र.**

शहराची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या राजकमल रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्रचनेचा मार्ग आता मोकळा झाला असून, या महत्त्वाकांक्षी नवनिर्माणाला रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः संमती दर्शविली आहे. लोकसभेच्या शून्य काळात प्रकल्पाच्या खासदार बळवंत वानखडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी ही महत्त्वाची माहिती दिली. तांत्रिक आणि प्रशासकीय स्तरावरील अंतिम मंजुरी मिळताच प्रत्यक्ष बांधकामाला वेग दिला जाईल, अशी ग्वाही यावेळी केंद्र सरकारकडून देण्यात आली. गेल्या



ऑगस्ट महिन्यापासून सुरक्षेच्या कारणास्तव हा पूल वाहतु कीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आल्याने अमरावतीकरांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे.

नागरिकांच्या वाढत्या अडचणी लक्षात घेता खासदार वानखडे यांनी हा विषय संसदेत लावून धरला. राज्य



शासनाच्या सुरक्षा मूल्यांकन अहवालानुसार जुना पूल पाडून त्या जागी नवीन पूल बांधणे अनिवार्य आहे. या प्रक्रियेला गती देण्यासाठी खासदार वानखडे पुढील आठवड्यात रेल्वे मंत्री आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची विशेष भेट घेणार आहेत. पुलाच्या पाडकामासाठी निधीची तरतूद झाली असली, तरी प्रत्यक्ष कामाची प्रतीक्षा आता संपण्याची चिन्हे आहेत.

### प्रशासकीय प्रक्रियेचा वेग वाढणार

राजकमल उड्डाणपुलाचे काम तांत्रिक मान्यतेच्या टप्प्यावर असून, खासदार बळवंत वानखडे यांच्या पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाला नवी दिशा मिळाली आहे. अमरावतीकरांचा दैनंदिन प्रवास सुसह्य करण्यासाठी रेल्वे मंत्रालय आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वय साधून लवकरच या पुलाचे भूमिपूजन होण्याची शक्यता असून, यामुळे शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.

## स्व.श्री.गोविंदराव माहोरे गुरुजी पुण्यतिथी महोत्सव



**कुऱ्हा-** तिवसा तालुक्यातील शेंदूरजना (माहोरे) येथील स्व. श्री. गोविंदराव म. माहोरे गुरुजी स्मृती 'त्रिमूर्ती पुण्यतिथी महोत्सव' मानवता मंदीर येथे संत महात्म्यांच्या पुण्यतिथी प्रित्यर्थ तीन दिवसांचा पर्यंत हरिनाम कीर्तनाचा मंगळ सोहळा. गोपाल काल्याचे किर्तन ह.भ.प. पकंज महाराज महल्ले (कौंडण्यपूर) यांचे अमृतवाणीतून विविध धार्मिक विषयावरून हरि किर्तन करण्यांत आले. त्यांना संगत साथ विणेकरी अतुल दिवाकर ठाकरे, मृदंग वादक निखिल ठाकरे, हार्मोनियम वादक बाळा ठाकरे, गायक कवाडगव्हाण, शेंदुरजना, कौंडण्यापूर वारकरी मंडळी यांचा सहभाग होता. यावळी संत लहानुजी महाराज संस्थान अध्यक्ष बाबासाहेब पावडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कौंडण्यपूर विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे उपाध्यक्ष वसंत डाहे विश्वात अतुल ठाकरे, इतर मान्यवरांचे स्वागत सत्कार करण्यात आला. सर्व वारकरी मंडळी व संपूर्ण गावकरी यांनी लाभ घेतला.

## स्पर्धा परीक्षेसाठी प्रशासकीय महाविद्यालयाचे अभ्यासक्रम उपयुक्त-खा.डॉ.बोंडे

**अमरावती/का.प्र.**

आजच्या बदलत्या आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसमोर स्पर्धा परीक्षांचे आव्हान अधिक तीव्र होत असताना योग्य अभ्यासक्रम, सक्षम मार्गदर्शन आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी प्रशासकीय महाविद्यालयांचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरत आहेत' असे प्रतिपादन खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले.

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्याशी सलग्नित सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित विशेष शैक्षणिक कार्यक्रमात ते अध्यक्षीय भाषण करताना बोलत होते. या



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान खा. डॉ. अनिल बोंडे यांनी भूषविले, तर कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. संगीता शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रोशन अलोने (कुलसचिव, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक), डॉ. केशव मोहरीर (परीक्षा नियंत्रक, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक), विजेंद्र पांडे (उपकुलसचिव, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक), डॉ. संतोष बनसोड (सिनेट सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ),प्रा. डॉ. सिकंदर मनवरे (अध्यक्ष, कमल विद्या प्रसारक मंडळ, शेंदुर्जना) तसेच यशवंत मनवरे (उपाध्यक्ष, कमल विद्या प्रसारक मंडळ, शेंदुर्जना), प्राचार्य डॉ. रजनी भाकरे यांची मान्यवर उपस्थिती होती.राज्यसेवा, केंद्रीय सेवा तसेच इतर विविध स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले विषयज्ञान, विश्लेषणात्मक विचारशक्ती आणि उत्तरलेखन कौशल्य या अभ्यासक्रमांमधून विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. संगीता शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी यशवंत मनवरे, प्राचार्य संजीवनी मनवरे, डॉ. रजनी भाकरे यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला प्रा. सुमेध गावंडे, प्रा. स्वप्नील ईखार, प्रा. शांता गाडगे, प्रा. शिल्पा गजभिये, प्रा. कल्पना राऊत, प्रा. निलेश डोंगरे, प्रा. पंकज गजभिये, आकाश मेश्राम व बाळू सोळंके यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन साक्षी पवार व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शिल्पा गजभिये यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## इग्नो अभ्यासक्रमांसाठी १५ फेब्रुवारी मुदतवाढ

**अमरावती/क्रा.प्र.**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्रांतर्गत जानेवारी, २०२६ पासून सुरू झालेल्या सत्रातील एम.ए. (इंग्रजी, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, ग्रामीण विकास, दूरशिक्षण, तत्वज्ञान), एम.कॉम. एम.बी.ए., (फायनान्स, ह्युमन रिसोर्स, मार्केटिंग, ऑपरेशन, सर्वीस मॅनेजमेंट प्रवेश परीक्षेशिवाय), बी.ए., बी.कॉम.सामान्य, बी.ए.टुरिझम, बी.ए.ऑनर्स (अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, लोकप्रशासन, समाजशास्त्र, इंग्रजी, हिंदी), बी.कॉम. (लेखा व वित्त), पदव्युत्तर पदविका (ग्रामीण विकास, इंटरनॅशनल बिझिनेस ऑपरेशन, अॅग्री बिझिनेस, ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, फायनान्सीयल मॅनेजमेंट, ऑपरेशन्स मॅनेजमेंट आणि मार्केटिंग मॅनेजमेंट), डिप्लोमा (पर्यटन, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन), सर्टिफिकेट (आपत्ती व्यवस्थापन, फुड अँन्ड न्युट्रीशन, ह्युमन राईट्स, गायडन्स, न्युट्रीशन अॅन्ड चाईल्ड केअर, कंझुमर प्रोटेक्शन, फंक्शनल इंग्रजी, ग्रामीण विकास, टिचींग ऑफ इंग्लीश, टुरिझम, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन) इत्यादी अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेण्यास १५ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

इच्छुकांनी इग्नोच्या www.ignou.ac.in वेबसाईटवरून तसेच https://ignouadmission.samarth.edu.in/ हा लिंकवरून अर्ज सादर करावेत. अधिक माहितीकरिता इच्छुकांनी इग्नो अभ्यासकेंद्र, मुलीचे वसतीगृहाजवळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात संपर्क साधावा असे डॉ.वर्षा नाठार, समन्वयक, इग्नो अभ्यासकेंद्र, अमरावती यांनी कळविले आहे.

## इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षार्थ्यांसाठी समुपदेशन सुविधा

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी (SSC) व बारावी (HSC) परीक्षेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत समुपदेशन व मार्गदर्शन सेवा सुरू करण्यात आली आहे.

परीक्षा काळात विद्यार्थ्यांवर येणारा ताण, तणाव, भीती तसेच अभ्यासासंबंधी अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी समुपदेशकांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहे, याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे राज्य मंडळ पुणे चे सचिव दीपक माळी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.या समुपदेशन सेवेमध्ये तज्ञ समुपदेशकांकडून दूरध्वनीद्वारे विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

परीक्षा तयारी, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास वाढवणे, मानसिक तणाव कमी करणे आदी विषयांवर विद्यार्थ्यांना मदत केली जाणार आहे.सदर समुपदेशन सुविधा परीक्षा कालावधीत सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत उपलब्ध असून विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य मंडळाकडून करण्यात आले आहे.

समुपदेशकांची संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे आहे ९९६०६४४४११, ७९७२५७३७४२, ९८३४०८४५९३, ९३५९९७८३१५, ८१६९२०२२१४, ९३७१६६१२५५, ७२०८४२९३८१, ७७०९११६०६८, ८४२११५०५२८, ९४०४७८३९९६ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. असे विभागीय सहा.सचिव, विभागीय मंडळ अमरावती संगीता साळुंके यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. उपरोक्त संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा. असेही राज्य मंडळाद्वारे कळविले आहे.

## अमरावती येथे 'हे मना...! पुस्तक प्रकाशन सोहळा

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

जीवन यथार्थपणे जगण्याचे भान देणारी आणि आत्मबोधाचा प्रकाश पेरणारी साहित्यिक साधना: 'हे मना....!' मनाशी केलेल्या आत्मीय संवादातून अध्यात्माचा सूक्ष्म अर्थ उलगडणारे, अंतःकरणाला तेजोमय करणारे विचारमय शब्द: 'हे मना....!' गजानन देविदास पातुर्डे लिखित एक आध्यात्मिक जीवन दृष्टिकोन हे मना...! या आध्यात्मिक पुस्तकाचाप्रकाशन सोहळा २८ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता अभियंता भवन, शेगाव नाका, अमरावती येथे होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज, इंदौर हे भूषविणार असून उद्घाटक म्हणून चंद्रशेखरे बावनकुळे महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री (नागपूर, अमरावती) हे राहणार आहे. तसेच विशेष उपस्थिती मा.सौ. नवनीत राणा माजी खासदार, अमरावती लोकसभा, विकासजी महात्मे पद्मश्री तथा राज्यसभा खासदार, दीपकजी बोराळे मल्हार योद्धे, महाराष्ट्र राज्य तर प्रमुख उपस्थिती डॉ. अनिलजी बोंडे राज्यसभा, खासदार,हरिभाऊ भदे माजी आमदार, अकोला पूर्व,शरदभाऊ बसतकार,उपाध्यक्ष धनगर महासंघ, महा.राज्य, अरुण पडोळे जिल्हाप्रमुख (शिंदे गट) अमरावती जिल्हा, दिलीप एडतकर संपादक, दै.मतदार, संगिता बोंडे (शिंदे) विभागीय संयोजक, विदर्भ भाजपा शिक्षक आघाडी, रवीभाऊ राणा आमदार, बडनेरा,आ.प्रवीणभाऊ पोटे पाटील माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,काशीरामजी साबळे माजी जि.प. सदस्य तथा कार्याध्यक्ष वंचित बहुजन आघाडी,आ. स्वामी जितेंद्रनाथजी महाराज श्रीनाथ पीठाधिश्वर श्री क्षेत्र अंजनगाव सुर्जी जि.अमरावती, महाराष्ट्र,माधवराव अवघड जिल्हाध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, अम. जिल्हा, सोपानदादा कनेरकर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते,नागेश बसतकार संस्थापक अध्यक्ष, राजमाता अहिल्यादेवी वैदर्भीय धनगर समाज ट्रस्ट हे मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहे.या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने गजानन देविदास पातुर्डे, नेहा गजानन पातुर्डे,डॉ. प्रमोद साहेबराव पातुर्डे यांनी केले आहे.


## मेमूचा कालावधी आता तीन महिने वाढवला

**अमरावती-** अमरावती, बडनेरावासीयांसाठी उपयोगी, शेगावसह भुसावळ, नाशिकपर्यंत जाण्यासाठी उपयोगी अनारक्षित बडनेरा-नाशिक रोड मेमूचा कालावधी आणखी तीन महिने वाढवला आहे. या मेमू ट्रेनच्या १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत एकूण १८० (जाणे-येणे) फेऱ्या होणार आहेत. मेमू क्र. ०१२११ बडनेरा-नाशिक रोडची मुदत ३१ डिसेंबरपर्यंतच होती. या मेमूमध्ये शेगावला जाणाऱ्या भाविकांची सर्वाधिक गर्दी असते. सोबतच मूर्तिजापूर, अकोला, नांदुरा, मलकापूर या ठिकाणीही जाण्यास ही मेमू उपयोगाची आहे. त्याचप्रमाणे नाशिक रोड-बडनेरा मेमू क्र. ०१२१२ ही १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीपर्यंत धावणार असून, ९० फेऱ्या करणार आहे. नाशिक रोड येथून रात्री ९.१५ वाजता ती निघते. तसेच बडनेरा स्टेशनवर पहाटे ४.३५ वाजता पोहोचते. त्यामुळे नाशिक रोड येथून प्रवाशांना आरामात रात्री झोप घेत बडनेरा, अमरावतीपर्यंत पोहोचता येते. केवळ स्लीपर बर्थ नसल्यामुळे आसनावरच झोप घ्यावी लागते. त्यामुळे शेगावसह त्र्यंबकेश्वर येथे नियमित जाणे-येणे करणाऱ्या प्रवाशांसाठी ही सोयीस्कर मेमू आहे.

## युवक हाच राष्ट्र उभारणीचा खरा आधारस्तंभ-प्रा.डॉ प्रमोद गारोडे

### भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाचे रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबीर

**परतवाडा :** स्थानिक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे आठ दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबीर चिखलदरा तालुक्यातील जैतादेही येथे सुरू आहे. या शिबिरात बौद्धिक सत्रात' राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका' या विषयावर प्रा.डॉ.प्रमोद गारोडे यांचे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.सुनील खांडेकर होते. या कार्यक्रमाला प्रा.डॉ.सतीश भागवत, प्रा.डॉ.मंगेश शेळके, प्रा.पूजा घुलक्षे, प्रा.कु.भिंगारे व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अंकुश तुरखडे उपस्थित होते.यावेळी 'राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. प्रमोद गारोडे यांनी युवकांच्या शक्तीचे आणि जबाबदारीचे अत्यंत प्रभावी विवेचन केले. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी करत सांगितले की, 'मला काही सशक्त तरुण द्या, मी जग बदलून दाखवीन' हा विचार आजही तितकाच समर्पक आहे. युवक हाच राष्ट्राचा खरा आधारस्तंभ



असून त्यांच्या विचारांवर, कृतीवर आणि मूल्यांवर देशाचे भविष्य अवलंबून आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. आज देशातील बहुसंख्य लोकसंख्या ही युवकांची आहे, ही बाब केवळ आकड्यांची नसून ती संधीची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. युवकांनी केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम, शिस्त, नैतिकता आणि सेवाभाव या मूल्यांचा अंगीकार केला पाहिजे.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सुनील खांडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांच्या विचारांना दुजोरा दिला. त्यांनी सांगितले की, राष्ट्र उभारणी ही केवळ सरकारची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची, विशेषतः युवकांची जबाबदारी आहे. युवकांनी आपल्या ऊर्जा, ज्ञान आणि कौशल्याचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी केला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ अंकुश तुरखडे यांनी केले. सुरवातीला कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलन व वैराग्यमूर्ती गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. रासेयो स्वयंसेवक शिबिरार्थी उपस्थित होते. कार्यक्रमचा शेवट सानेगुरुजी यांच्या प्रार्थनेने झाला.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी १२ हेक्टर जागा मंजूर!

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय

## -१०० विद्यार्थी प्रवेश,४३० खाटांचे रुग्णालय

### तीन वर्षांत बांधकाम पूर्ण करण्याची अट -जागा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत

**मुंबई/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालयाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे, अमरावती जवळील



आलियाबाद येथील ११.२९ हेक्टर जमिनीचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे सोपवण्यास महसूल विभागाने मंजुरी दिली. याबाबतचा निर्णय बुधवारी जारी करण्यात आला आहे. या जागेवर १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय(पान २ वर)



’ या निर्णयामुळे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण पश्चिम विदर्भातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होईल.जिल्ह्यातील नागरिकांची ही मागणी होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मिळू शकले. आरोग्यसेवा म्हणजे ईश्वरसेवा, हा सरकारचा ध्यास आहे. पालकमंत्री या नात्याने मुख्यमंत्र्यांचे मी मनपूर्वक आभार मानतो. ’

-**चंद्रशेखर बावनकुळे,** महसूल मंत्री, पालकमंत्री अमरावती

# डिजिटल व्यवहाराच्या नावाखाली क्यूआर कोडचा बनाव

## देवळीतील सराफाची ३२ हजारांची फसवणूक

### -दोघे अमरावतीतून गजाआड

**वर्धा/प्रतिनिधीः-** डिजिटल व्यवहाराच्या नावाखाली क्यूआर कोडचा बनाव रचत देवळी येथील सराफा व्यावसायिकाची फसवणूक करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमरावती येथून अटक केली. आरोपींकडून एक सोन्याची अंगठी व मोबाईल असा एकूण ४७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

देवळी येथील सराफा व्यावसायिक विवेक कांकरिया (वय ५०) यांच्या दुकानात दोन



अनोळखी इसम अंगठी खरेदीसाठी आले होते. त्यांनी २ ग्रॅम २३० मिली वजनाची, ३२ हजार ३०० रुपये किमतीची सोन्याची अंगठी पसंत केली. आरोपींनी कांकरिया यांच्याकडून बँकेचा क्यूआर कोड मागून मोबाईलद्वारे स्कॅन केला व पैसे पाठवल्याचा बनावट व्यवहार दाखविला. मोबाईल ॲपमध्ये राईट टिक चिन्ह दिसताच कांकरिया यांनी विश्वास ठेवून सोन्याची अंगठी व बिल दिले. त्यानंतर दोघेही दुकानातून निघून गेले.


काही वेळाने बँक खात्याची पाहणी केली असता रक्कम जमा न झाल्याचे लक्षात येताच आपली फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. कांकरिया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडे देण्यात आला. तपासादरम्यान उमेर मिर्झा जफर बेग (पान २ वर)

# महापौर - उपमहापौर पदासाठी तीन-तीन उमेदवार रिंगणात

## ६ फेब्रुवारी रोजी निवडणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेत निवडणूक होणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरू होताच उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात येणार आहे. यानंतर उमेदवाराला पंधरा मिनिटं दिले जाणार असून या १५ मिनिटांमध्ये त्यांना निवडणूक मतदानात राहाचे आहे की माघार घ्यायची आहे याचा निर्णय घ्यावा



लागणार आहे. नगरसेवकांना हात उचलून आपले मत द्यायचे आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी तीन-तीन उमेदवार रिंगणात उतरले आहे. पक्षीय बलाबलकडे लक्ष दिले तर मनपामध्ये महायुतीची सत्ता स्थापित होणार आहे. भाजपा २५, युवा स्वाभिमान १५ व राष्ट्रवादी काँग्रेस ११ असा ५१ चे संख्याबळ महायुतीकडे आहे. सत्ता काबीज करण्यासाठी ४४ सदस्यांची संख्या असणे गरजेचे आहे. भाजपाकडून महापौर पदासाठी श्रीचंद तेजवानी, काँग्रेसकडून प्रा.संजय शिरभाते व बसपाने इस्माईल कासम लालूवाले यांना रिंगणात उतरवले आहे. उपमहापौर पदासाठी युवा स्वाभिमानचे सचिन ओंकारराव भेंडे यांनी नामांकन दाखल केले आहे. तर काँग्रेस कडून लुबना तनवीर सय्यद मखदुम व बसपाचे सचिन वसंतराव वैद्य मैदानात आहे. आता उद्या ६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीत बसपा उमेदवार रिंगणात राहतात की पाठिंबा देतात याकडे नजरा लागलेले आहे. अमरावती महानगरपालिकासाठी १५ जानेवारी रोजी मतदान झाले.१६ जानेवारी रोजी मतमोजणी झाली आणि मनपाच्या २२ प्रभागासाठी ८७ (पान २ वर)

# ’श्री रामचंद्र दीक्षित चॅरिटेबल ट्रस्ट’ची इमारत जमीनदोस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील पश्चिम झोन क्र. ५ अंतर्गत येणाऱ्या भाजीबाजार, साबनपुरा परिसरातील एका अत्यंत जीर्ण आणि धोकादायक इमारतीवर आज अमरावती महानगरपालिकेने धडक कारवाई केली. ’श्री रामचंद्र दीक्षित चॅरिटेबल ट्रस्ट’ची ही इमारत सुरक्षेच्या कारणास्तव पूर्णपणे पाडण्यात आली आहे.

इंद्रभुवन थिएटर, साबनपुरा भागात असलेली ही इमारत अत्यंत शिकस्त (जीर्ण) झाली होती, ज्यामुळे परिसरात मोठा धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका



आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आज, ४ फेब्रुवारी २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. इमारतीची गंभीर स्थिती पाहता प्रशासनाने कडक भूमिका घेत संपूर्ण इमारत निष्कासित केली.

ही कारवाई उपअभियंता विवेक प्र. देशमुख यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत पोलीस प्रशासन आणि महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले. कारवाईच्या वेळी वडगांवकर (वरिष्ठ पोलीस निरीक्षक), योगेश कोल्हे (प्रमुख, अतिक्रमण पथक),शैलेश बोरकर (सहाय्यक अभियंता), प्रवीण भेंडे, नाझीम खान, संकेत वाघ,शाहजेब अहमद,फरहान खान (कनिष्ठ अभियंता) याव्यतिरिक्त महानगरपालिकेचे इतर कर्मचारी आणि पोलीस ताफा घटनास्थळी उपस्थित होता. कोणतीही अनुचित घटना न घडता ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.

# अंजनगाव पोलीस स्टेशन गुन्हे अन्वेषण विभागाची कामगिरी

## दहा दिवसांत तीन घटनेचा पर्दाफाश

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन मार्फत गेल्या काही दिवसात घडलेले गुन्हे दहा दीवसात उघडकीस आणून आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.यामध्ये दोन विधीसंघर्षीत बालकासह एक घरफोड्या व एका मोटारसायकल चोरट्याचा समावेश आहे. तालुक्यात चोरी घरफोडी ईत्यादी घटनेत वाढ होत असताना स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कौशल्यपुर्ण कारवाईत ग्राम भंडारज येथील



घरफोडीच्या गुन्हयात दोन विधी संघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडुन गुन्ह्यातील १० हजार रुपये त्यांच्या पालकासमक्ष जप्त करण्यात आले.तर दुचाकी वाहन चोरी मधील आरोपी शेख इरफान शेख ईमदाद (वय ३७ ) रा. करजगाव, ता. चांदुरबाजार जिल्हा अमरावती यास परतवाडा येथुन गोपणीय खब-या कडुन मिळालेल्या माहितीनुसार ताब्यात घेवुन अटक करण्यात आली व त्याच्या (पान २ वर)

# जल जीवन मिशन कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद

## प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वच्छ भारत मिशनच्या दुसऱ्या टप्प्यात जल जीवन मिशन अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधन व भविष्यातील वितरणा संबंधी लेखी हमी व सेवा सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या मागणी साठी आज बुधवार ४ फेब्रुवारी रोजी कंत्राटी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद समोर काम बंद आंदोलन केला. पाणीपुरवठा विभागाच्या प्रधान सचिवाना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ऑक्टोबर २०२५ ते



जानेवारी २०२६ या कालावधीतील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन तात्काळ अदा करा. मार्च २०२६ पर्यंत प्रलंबित तसेच मासिक मानधन वितरणासाठी स्पष्ट लेखी आदेश देण्यात यावे. जिल्हास्तरीय सल्लागारांसाठी वेतन वाढ, ईपीएफ मेडिकल सुविधा, वार्षिक रजा व आकृतीबंध तयार करणे, दीर्घकाळ सेवा केलेल्या(पान २ वर)

# राज्यस्तरीय सर्पमित्र संमेलन १६ रोजी

## मानव-सर्प संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना

**अमरावती/प्रतिनिधीः-** सर्प संवर्धन, पर्यावरण




संरक्षण व जनजागृती या उद्देशाने राज्यस्तरीय सर्पमित्र संमेलनाचे आयोजन १६ फेब्रुवारी रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले आहे. या संमेलनात सर्प संरक्षण, मानव सर्प संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना तसेच सर्पमित्रांच्या कार्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती आज बुधवार ४ फेब्रुवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की संमेलनाचे उद्घाटन उद्योगपती व वरिष्ठ समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पीसेठ जाजोदिया यांच्या हस्ते होणार आहे. (पान २ वर)

## वाळू तस्करांवर पोलिसांची कारवाई

# ६ ट्रक सह दीड कोटीचा मुद्देमाल जप्त

### १५ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या निर्देशाने वाळू तस्करांच्या विरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत पथकाने आज बुधवार ४ फेब्रुवारी रोजी मोर्शी, तळेगाव, चांदुर रेल्वे आणि शिरसगाव कसबा पोलीस ठाणे हद्दीत कार्यवाही करून वाळू आणि ६ ट्रक सह एकूण १



कोटी ५० लाखांचा मुद्देमाल जप्त केला तसेच १५ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार ग्रामीण गुन्हे शाखेच्या (पान २ वर)

# २२ रोजी रिफॉर्म्स क्लबची निवडणूक

## ॲड.सुनील देशमुख निवडणूक अधिकारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील प्रतिष्ठित रिफॉर्म क्लबच्या २०२६ ते २०२६ च्या नवीन कार्यकारणी साठी निवडणूक येणाऱ्या २२ फेब्रुवारी रोजी होणार आहेत. एड. सुनील देशमुख यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार अध्यक्ष, सचिव सह ११ सदस्यांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. रिफॉर्म क्लबचे अध्यक्ष डॉ. सोमेश्वर निर्मल आणि सचिव राजेश राघानी आहे. निवडणुकीसाठी सर्वसाधारण सभा रविवार २२ फेब्रुवारी रोजी



सकाळी ११ वाजता बोलावली आहे. आवश्यकता असल्यास दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. नामांकन प्रक्रिया सोमवार पासून सुरू होणार आहे. ७ आणि ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत रिफॉर्म्स क्लबचे सदस्य ३०० रुपयांमध्ये नामांकन घेऊ शकणार असून ९ आणि १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत नामांकन दाखल करता येणार आहे. बुधवार ११ फेब्रुवारी रोजी नामांकनाची पडताळणी केली जाणार असून सायंकाळी ७ वाजता वैध नामांकनाची यादी क्लबच्या नोटीस बोर्डवर (पान २ वर)

# तरुणावर प्राणघातक हल्ला

## चिकन-मटन व्यवसायाच्या वाद -कठोर नाका परिसरात गोंधळ



**अमरावती/प्रतिनिधीः-** चिकन - मटन व्यवसायाच्या वादात एका तरुणावर प्राण घातक हल्ला करण्यात आल्याची घटना आज बुधवार ४ फेब्रुवारीच्या दुपारी गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या कठोरा नाका परिसरात घडली. यामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला. राजू मदनेकर असे या हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर(पान २ वर)

# जलतरण तलाव बनले शोभेची वस्तू....

## -अचलपूर न.प. प्रशासक राजमध्ये दुरुस्तीच्या नावावर कोट्यवधीचा खर्च

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील कल्याण मंडपम् मधील (तरणताल) जलतरण तलावाच्या दुरुस्तीचा नावावर अचलपूर नगर परिषद प्रशासक राज मध्ये कोट्यवधी रुपयांचे खर्च करून आजही जलतरण तलाव शोभेची वस्तू बनलेला आहे . या कामाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. जलतरण तलावाचे दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्याची माहिती समोर आली आहे . पण कोट्यवधी रुपयाचा खर्च करण्यात आला तरी कुठे ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे आता तरी



जुळ्या शहरातील नागरिकांसाठी जलतरण तलाव खुला करावा, अशी मागणी विद्यार्थी व खेडाळू कडून पुढे येत आहे.

अचलपूर नगर परिषदे कडून वैशिष्टयपूर्ण निधी अंतर्गत स्थानिक कल्याण मंडपम् येथे जवळपास दोन कोटी २८ लाख ४२ हजार ३०० रुपये खर्च करून भव्य दिव्य तरणताल जलतरण तलाव सुरू करण्यात आला होता. बरेच वर्षे जलतरण तलाव नियमित सुरू होता. मात्र नंतर देखभाल (पान २ वर)

# घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वितरणाचा शुभारंभ



**धारणी/प्रतिनिधीः-** तालुक्यातील मोखा येथील लिलाव झालेल्या रेती घाटावरून घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वितरणाचा शुभारंभ मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार केवळराम काळे यांच्या हस्ते आज मंगळवार, दि.४ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आला. घरकुल लाभार्थ्यांना दिलासा देणारा व महत्त्वाचा असा हा उपक्रम असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या प्राथमिक टप्प्यात धारणमहू गावातील तीन घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेतीचे वितरण करण्यात आले. यामध्ये भागरती खडके, मनोज धुर्वे व रामू मावसकर या लाभार्थ्यांचा समावेश असून, आमदारांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष रेती वितरणास सुरुवात करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार केवळराम (पान २ वर)